नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी
१९८६

के.भा, ए.म, गुजु, ऑ ...-15...

महिला विशेषांक



फेब्रुवारी-मार्च १९७६
माघ-फाल्गुन शके १८९७


युगवाणी

'प्रियदर्शिनीं यशोयुतां वन्दे।'



श्रीमती इंदिरा गांधी
प्रधानमंत्री, भारत शासन

'धन्यासि वैदर्भि गुणैरुदारैः।'



श्रीमती **प्रभा राव**
शिक्षण, युवक सेवा व क्रीडा मंत्री,
महाराष्ट्र राज्य

---

* संपादकीय अंकाच्या शेवटच्या पृष्ठावर पहा.

** मुखपृष्ठावरील चित्र पवनार येथे सापडलेल्या वाकाटककालीन शिल्पांपैकी भगवती गंगामाईच्या शिल्पाचे आहे. (नागपूर विद्यापीठ, प्राचीन इतिहास व संस्कृती विभागाच्या सौजन्याने.)

अनुक्रमणिका

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

या मासिकाला वापरलेला कागद हा महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने उपलब्ध करून दिलेला सवलतीच्या दरातील कागद आहे.

विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय सारस्वती जगाम्

फेब्रुवारी-मार्च १९७[illegible]
माघ-फाल्गुन शके १८[illegible]७
महिला विशेषांक

युगवाणी

संपादक मधुकर आष्टीकर
कार्यकारी संपादक वसंत खेरडीकर

मूल्य तीन रुपये

वर्ष ३१ अंक ११-१२

माननीय शिक्षणमंत्री सौ. प्रभा राव यांचे मनोगत

मंत्री
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

शिक्षण, युवक सेवा व क्रीडा मंत्री
महाराष्ट्र शासन
सचिवालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ३ एप्रिल १९७६

महिला विषेशांक काढण्याचा आपला उपक्रम स्तुत्य वाटला. स्त्रियांचे प्रश्न, सुख दुःख, समाजातील त्यांचे स्थान याबाबत आपल्या देशातील स्त्रियांचेच दृष्टीने नव्हे तर जगातील इतरही स्त्रियांचे दृष्टीने, अभ्यास करण्याची संधी मला प्राप्त झाली.

माझा असा विश्वास आहे की, जगातील इतर देशांचे मानाने भारतातील स्त्रिया सर्वसामान्यपणे जास्त सुखी आहेत. आपले संविधान स्त्रियांचे विरुद्ध नसून त्यांचे बाजूने विचार करणारे आहे. कोणत्याही कायदेशीर किंवा सामाजिक बाबीत स्त्रियांबाबत दुजाभाव केलेला नाही. परंपरेने स्त्रीबद्दल असलेल्या आदराच्या भावनेचे हे प्रतीक आहे.

परंतु भारतीय स्त्रीला कोणतीही तक्रार करण्याचे कारण नाही असे मात्र यावरून समजणे योग्य होणार नाही. तिचे बहुतांशी दुःख हे पुरुषांमध्ये व स्त्रीमध्ये भेद केल्यामुळे आहे अशी परिस्थिती नसून गरीबी व अज्ञानामुळे प्रामुख्याने स्त्रियांच्या अडचणी आहेत. आयुष्यातील उत्तम संधि, शिक्षण, आरोग्याची काळजी, सकस अन्न, याबाबत पालकांना मुलामुलीत भेद करून मुलींना वंचित करण्याची जी पाळी येते ती गरिबीमुळे. तसेच हुंडा, पत्नीला मारहाण किंवा स्त्रियांचे वरील अन्याय, पिळवणूक यांच्यासारख्या वाईट प्रथा अज्ञानातून निर्माण होतात.

आणि म्हणूनच मेक्सिको येथे युनायटेड नेशनच्या आंतरराष्ट्रीय संघटनेने भरविलेल्या परिषदेत भारताने मांडलेल्या भूमिकेत स्त्रीची पुरुषापासून मुक्तता असा पाश्चिमात्य पद्धतीत विचार मांडला नसून स्त्रियांची गरीबी व अज्ञान तसेच कायदेशीर व सामाजिक विषमता यातून मुक्तता अशी भूमिका मांडली.

भारतीय स्त्रीला शिक्षण व त्यातून मिळणारी विविध प्रकारची संधी असावी म्हणजे राष्ट्राच्या उन्नतीकरिता व उभारणीकरिता ती पुरुषाला मदत करू शकेल. निर्णय करताना प्रत्येक स्तरावर तिला प्रतिनिधित्व असावे म्हणजे देशाचा ५० टक्के भाग प्रतिनिधित्वाविना राहणार नाही. पूर्णत्वाचा एक भाग म्हणून, मोठ्याचा एक लहान वाटा म्हणून समाजाचा एक जबाबदार घटक या दृष्टीने तिला अस्तित्व पाहिजे आहे. खाळीत टाकलेला, दूर ढकललेला असा समाजाचा घटक म्हणून राहण्याची तिची इच्छा नाही. स्त्रीने घ्यावयाची ही नवीन जबाबदारी तिची पारंपारिक जबाबदारी राखून व जास्तीची म्हणून घेणे योग्य आहे. ही मनोभूमिका एकदा स्त्रियांना स्पष्ट झाली म्हणजे पुरुषांनाही समाजातील स्त्रियांचा दर्जा सुधारणे सुलभ होईल व समजण्यास मदत होईल.

स्त्री व पुरुष ह्यांच्यात सहकार्य, सहभाव व सामंजस्य आणण्याचा हा एक उपाय आहे.

आपल्या विशेषांकाकरिता माझ्या सदिच्छा.

प्रभा राव

अनुक्रमणिका

याशिवाय 'रसिक पत्रे', कार्यवृत्त, साभार पोच इत्यादी.



तुकाराम आणि कला

मालती पाटील

“कलावंत हा विशिष्ट प्रकारचा माणूस नसतो पण प्रत्येक मनुष्य मात्र विशिष्ट प्रकारचा कलावंत असतो.”[1] याच दृष्टीने सर्वसामान्य जीवनमार्गावरून अलौकिक भक्तिद्वारे परतत्वापर्यंत प्रवास करणारे तुकाराम विशिष्ट प्रकारचे कलावंत आहेत. या महान कलावंताने श्रेष्ठ दर्जाच्या कलेचा आदर्श अगदी अभावितपणे रसिकांसमोर मांडला आहे.

उरली हे कळा जीवनाची :

कवितेत कलात्मकता यायची तर आधी जीवन कलात्मक हवे. जीवनाची कला आधी अवगत असायला हवी. वास्तवातील कलात्मक जीवनातून पाझरणारी कलाच काव्यातून अभिव्यक्त होते. आपल्या जीवनकलेचा अप्रतिम व अभूतपूर्व नजराणा हाती घेऊनच तुकाराम देवाला व संतांना सामोरे गेले आहेत. तुकाराम एका अभंगात म्हणतात—“युक्ति तंव जाल्या कुंटित सकळा । उरली हे कळा जीवनाची ॥” (२५५४). युक्तिप्रयुक्तीची धाव मंदावली. कृत्रिम बनावट विचारांचे चालेनासे झाले. केवळ जीवनाची कला हातात राहिली. तीच साथीला घेऊन कवितेच्या निमित्ताने तुकाराम परमार्थाकडे वळले. जीवनाच्या कलेचा उपासक असणाऱ्या या महापुरुषाने स्वतःच्या जीवनालाच अद्‌भुत काव्य करून टाकले आहे व त्यामुळेच ते खरे कवी व कलावंत ठरले आहेत.[2]

तुकारामांच्या कलामीमांसेचा परामर्ष घेताना तुकारामांना अभिप्रेत असणारी जीवनाची कला म्हणजे काय हा प्रश्न साहजिकच समोर येतो. याचे उत्तर तुकारामांनी आपल्या अनेक अभंगांमध्ये देऊन ठेवले आहे. “सत्य असत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमतां ॥” (१३३३), अस वागणाऱ्या तुकारामांनी कुणाशीही सल्लामसलत न करता, कुणाच्याही ओंजळीने पाणी न पिता, स्वतःच स्वतःच्या जीवनाचा आलेख आखला आहे. त्यातील विविध रेखांनी रेखांकित केलेले एकमेव रेखाचित्र म्हणजे तुकारामांची ही

१. “An artist is not a special kind of man but every man is a special kind of artist.”

—कुमारस्वामी

२. टॉलस्टाय, साने गुरुजी यासारख्या विचारवंतांनीही जीवनकलेचा काव्यात अनुवाद करणाऱ्या कलावंताला श्रेष्ठ मानले आहे. साने गुरुजी म्हणतात—“जो स्वतःच्या जीवनालाच अद्‌भुत काव्य करतो तोच खरा कवि. महापुरुष जीवनाच्या कलेचा उपासक असतो. जीवनाची कला ही परमोच्च कला.”

साने गुरुजी, *कला म्हणजे काय ?*, [*महर्षी टॉलस्टॉयच्या ग्रंथाचा अनुवाद*], प्रस्तावना पान ११, प्रथमावृत्ती १९४३.

जीवनकला होय. आलेखातील विविध बिंदूंना जोडणाऱ्या एखाद्या रेखेनं आपल्या प्रवासमार्गाच्या शेवटी उत्कर्ष-बिंदू दर्शवलेला असतो. तुकारामांच्या जीवनातील विविध घटना जोडणारी जीवनकला त्या रेखेप्रमाणेच भक्तीचा व काव्यकलेचा उत्कर्षबिंदू गाठूनच स्थिरावते. तुकारामांचे भरदार, बहुरंगी व्यक्तिमत्वच तिचे प्राणभूत सूत्र आहे. मानवी भावविकारांनी विनटलेले, विलक्षण प्रभावशाली पण वैशिष्ट्यपूर्ण असे हे व्यक्तिमत्व म्हणजेच ही जीवनकला! या संपन्न जीवनकलेची हृदयंगम अभिव्यक्ती म्हणजे तुकारामाची कविता. तुकारामांच्या खास व्यक्तिमत्त्वातून आकारलेली जीवनकला व त्यांचे काव्य यात अभेद आहे.

तुकारामांच्या कवितेतून सहजगत्या व्यक्त झालेला हा विचार आजही निःसंशय उद्बोधक व मार्गदर्शक ठरण्यासारखा आहे. जीवनकलेच्या तेजात वाटचाल करणारा साहित्यिक सर्वश्रेष्ठ व सामर्थ्यसंपन्न साहित्य निर्माण करू शकतो असे दिसते. जीवनाची कला साथीला घेऊनच कुठल्याही क्षेत्रात प्रवेश केला पाहिजे हा धडाच जणू तुकारामांनी स्वतःच्या उदाहरणाने घालून दिला असून हा विचार अतिशय मोलाचा आहे.

रविप्रभाकळा वर्ते जन :

कलानिर्मितीच्या क्षणी कलावंताची चित्तवृत्ती कशी असते व असावी यावरही तुकारामांनी मर्मभेदक प्रकाश टाकला आहे. लोभी मनुष्य कलावंत होऊच शकत नाही. देव देवळात व चित्त खेटरात यानुसार मन कुठेतरी भरकटते आहे व मनुष्य काव्यसाधना करतो आहे हे योग्य नाही. "आशापाशीं गुंतला गळा । तेणें कळाहीन जालों ॥" (३७९४). मोहपाशात अडकल्यामुळे कला आपल्याला दुरावली असे तुकाराम सांगतात. खरी कला तुकारामांच्या मते विशेष प्रकारच्या जीवनपद्धतीतून आकार घेते. माणसाने जगात व जीवनात कोणत्या कलेचा आदर्श ठेवून वावरावे हे विशद करताना त्यांनी मोठा बहारदार दाखला दिला आहे. "तम नासी परि वेव्हारा वेगळा । रविप्रभाकळा वर्ते जन ॥" (२४४३). सूर्यकिरण अंधःकाराचा नायनाट करतात पण ते त्या अंधारापासून अगदी अलिप्त असतात. संताने सुद्धा काव्यात्म भक्ती करताना रविप्रभाकळा अनुसरावी. तुकारामांनी सांगितलेले हे जीवनमूल्य आदर्शवत साहित्यनिर्मितीतील एक महत्त्वाचे तत्त्व आहे. श्रेष्ठ साहित्यिकही साहित्यनिर्मितीच्या क्षणी 'रविप्रभाकळे'नुसारच वर्तत असतो. तो आपल्या कलाकृतीच्या आकाराशी तादात्म्य पावतो. तिच्यातील आशयाशी विलक्षण समरस होतो. परंतु त्याची स्वतःची भूमिका तटस्थाचीच असते. आपली ही भूमिका कायम ठेवूनच तो कलाकृती निर्माण करतो. तुकाराम म्हणतात– "तोडी जाणिवेची कळा । होई वृत्तीसी वेगळा ।"(२९५२). कलावंतही कलानिर्मितीच्या वेळी जाणिवेचे विसर्जन करतो. कलाकृतीतच तो तल्लीन होतो. जागतिक व्यवहाराच्या वृत्तीपासून तो वेगळा होतो. जगाची जाणीव विसरतो. स्वतःला विसरतो. हे सारे करताना तो 'रविप्रभाकळे'प्रमाणेच वर्तत असतो.

सकळ ही कळा सर्वोत्तमी

एक खरा कलावंतच दुसऱ्या श्रेष्ठ कलावंताची कला जाणत असतो. परमेश्वर हा सर्वश्रेष्ठ कलावंत आहे. "सकळ ही कळा सर्वोत्तमीं ।" (३७०८), ही त्यांची श्रद्धा आहे. त्याची कला जाणून घेण्याच्या जिज्ञासेने, कधी ती आत्मसाथ करण्याच्या उद्देशाने, तर कधी तिच्या तेजाने दिपून जाऊन तिचे पूजन करण्याच्या हेतूने, तुकाराम आपल्या जीवनकलेसह देवाचिये द्वारी उभे राहतात व परमेश्वराच्या कलात्मक गुणांचे चित्र रेखाटतात. तुकारामांनी चितारलेल्या ह्या व्यक्तिचित्राचे अवलोकन केले असता, कला शब्दाचे विविध अर्थ तुकारामांना अभिप्रेत असलेले दिसतात.

कला म्हणजे कळ, यंत्राची कळ किंवा चावी. देव असा कलावंत आहे की त्याने "एकदेहीं भिन्न ठेवियेल्या कळा ।" (२९२३). जिव्हेने चव घेता येते. डोळ्यांनी बघता येते. तोंडाने बोलता येते. मनाला सुखदुःख जाणवते. नाकाने वास येतो. कानाने ऐकू येते. हे सारे देवाने एकाच देहात निर्माण केले आहे. एका ठिकाणी तुकाराम म्हणतात – "सूत्रधारी जैसा हालवितो कळा । तैसा तो पुतळा नाचे छंदें ॥ बोलतसें जैसे बोलवितो देव । मज हा संदेह कासयाचा ॥" (२९४७). येथेही कळा म्हणजे यंत्राची चावी हाच अर्थ अभिप्रेत दिसतो.

कला म्हणजे कौशल्य किंवा युक्तिचातुर्य. परमेश्वराच्या कलात्मकतेचा म्हणजेच कुशलतेचा ठाव कुणालाही लागत नाही. पाय नसलेल्या पांगळ्याला

तो चालायला लावतो. " तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । चालवी पांगळा पायांविण ।। " (२९५०).

कला शब्दाद्वारे शक्तिसामर्थ्य हा सुद्धा अर्थ तुकारामांनी व्यक्त केला आहे. " आनंदाचा थारा । सुखें मोहरला झरा ।। ऐसी प्रभुची ज्या कळा । त्याच्या कोण पाहे वाळा ।। " (३५०६). परमेश्वराच्या कलेचे सामर्थ्य म्हणजे आपल्या भक्ताला तो सदैव आनंद आणि सुख देतो.

कला म्हणजे रहस्य, गुपित. परमेश्वरप्राप्तीच्या कलेचे मूलभूत वर्म देवच भक्ताला सांगतो. " बीजकळा-वर्म तुमचें दान । " (३७१८).

कला म्हणजे स्वरूप. देव भक्ताच्या अंतरंगातील कलेचा जाणकार आहे. तो भक्ताची कलात्मकता म्हणजेच भाववैभवाचे स्वरूप पारखतो. " जाणसी तूं कळा अंतरींची ।। " (३९३१).

कलेचा अर्थ गुणधर्म असाही केला आहे. देवाची कलात्मकता भक्तामध्ये पूर्णपणे अवतरते कारण " कळा बिंबाऐसीं प्रतिबिंबीं ।। " (३६२३). बिंबाची कळा प्रतिबिंबातही उतरते असे म्हणताना कळा म्हणजे गुणधर्म हा अर्थ गृहीत धरला आहे.

कला म्हणजे काय हे समजून घेण्याच्या प्रयत्नांचा इतिहास पाहिला तर तुकारामांना कला शब्दांचे अभिप्रेत असणारे हे विविध अर्थ टीकाकारां-नाही मान्य असल्याचे दिसते ![1]

कलांचे हृद्गत व सामर्थ्य

तुकारामांच्यामते भावपूर्ण हरीनामसंकीर्तन हेच सर्व कलांचे हृद्गत आहे. " बीज आणि फळ हरीचें नाम । सकळ पुण्य सकळ धर्म । सकळां कळांचे हें वर्म । निवारी श्रम सकळ ही ।।" (६४५). सर्वोत्कृष्ट कला देवविषयकच असते. " तुका म्हणे कळा । देवाविण अमंगळा ।।" (१३१०). म्हणूनच आपली सारी शक्ती प्राणपणाला लावून तुकाराम त्यांच्या स्वभावधर्मा-नुसार भगवंताची पराकाष्ठेची कलात्मक भक्ती करतात.

खऱ्या कलेचे सामर्थ्य व महात्म्य तुका-रामांच्या दृष्टीने परमेश्वराची जोड करून देणारे आहे. मात्र यासाठी कलेची उभारणी आंतरिक प्रेमाच्या उमाळ्यावर व्हायला हवी. " आपण व्हावे एकीकडे । देव कळेवरी जोडे ।। " (१८५१). देवाची प्राप्ती कलात्मकतेमुळे होते. कलेचे अलौकिक सामर्थ्य येथे कथन केले आहे.

जातिवंत कलात्मकता ही काही पैशापासरी मोलाची सवंग चीज नाही. श्रेष्ठ कलेचाही आढळ विर-ळच होतो. " उचिताच्या कळा । नाही कळत सकळा ।। " (२८९८). कला निर्मिती करणारे सारेच खरे कला-वंत नसतात. ह्या प्रखर सत्यावर तुकारामांनी येथे बोट ठेवले आहे.

राग कला नहीं जाणत तुका :

कलेबद्दल इतके सूक्ष्मातिसूक्ष्म ज्ञान प्रगट करूनही आपण कलेचे जाणकार नाही, कला म्हणजेच काय तेही आपल्याला ठाऊक नाही, अशी विलक्षण विनम्र भूमिका तुकारामांनी स्वीकारली आहे. " राग कला नहिं जानत तुका ।। " (११५१), " गाऊं नेणें कळा कुसरी । " (२९५६) अशी विनयशील भाषा हा श्रेष्ठ कलावंत बोलतो.

बेगडी कला

कला व सौंदर्य यात कलाकोविदांनी अभेद मानला आहे. " कला म्हणजेच सौंदर्य व सौंदर्य म्हण-जेच कला. "[2] याच दृष्टीने काव्य असुंदर करणाऱ्या बाबी तुकारामांनी अकलात्मक व म्हणून त्याज्य ठर-वल्या आहेत. तुकारामांनी आपल्या कवितेत केवळ ' शब्दाच्या कुसरी ' (४०३) निर्माण करून केलेले निर्जीव

---

१. एनसायक्लोपिडिआ ब्रिटानिकामध्येही कला शब्दाचा जुना अर्थ कुशलता किंवा शक्ती असल्याचे सांगितले आहे. " The old meaning, in its widest sense, of the Greek Texvn, the latin arts, the German kunst (derived from Konnen), implied skill and ability, acquired through patient pratice . . . . "— Encyclopaedia Britannica, Volume – 2, Page 440.

2 "Art and beauty may be regarded as well–high identical." —C. G. Shaw

काव्य, " उष्टचा पत्रावळी करुनियां गोळा । दाखविती कळा कवित्वाची ॥ " (१२८४) असे वाङमयचौर्य करून कवित्वाची कळा प्रदर्शित करणारे शिळे काव्य, देवेतर आलतुफालतु विषयावरील काव्य (१३१०), " शिकों कळा शिकों येती । प्रेम नाहीं कोणा हाती ॥ " (२११९) असे प्रेमहीन, भावशून्य काव्य, ' चातुर्याच्या अनंतकळा ' प्रगट करणारे सत्यहीन काव्य (२१८२), " दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयाचा सोहळा ॥ " (४३१०) असे दांभिक काव्य या सर्वांचा कडकडून निषेध केला आहे. अशी कला काय कामाची ? " काय करूं कळा युक्ती या कुसरी । " (२१२०) असे त्यांना वाटते. अशी कला निरुपयोगी ठरवून ते निर्णय देतात–"तुका म्हणे कळा गुंडून ठेवी कुसरी ।"(२२७३).

खरी कला ही तत्त्वांचा समन्वय साधण्यातच सामावलेली आहे असे तुकारामांनी सुचवले आहे. वादकाच्या कलेचा विचार करताना त्यांनी एककल्लीपणाचा झडझडून त्याग केला आहे. " हेचि वादकाची कळा । नाही येऊं येत बळा ॥. . रिघावें पोटांत । पाया पडोन घ्यावा अंत ॥ तुका म्हणे वरि । गोडा आणावा उत्तरीं ॥ " (३६७७). कलावंताने एकेरीवर न येता दुसऱ्याच्या पोटात शिरून त्याचे अंतःकरण समजून घ्यावे. मधुर गोडव्याने भरलेली उत्तरे द्यावीत. अर्थात कलेने समतोल साधावा, सुसंगती स्वीकाराधी हा महत्त्वाचा विचार येथे सुचवला आहे.

विराणी

रक्तात गोंदली स्पर्शाची रे गाणी
परि स्वप्न राहिले अजुनी कसे अनवाणी ?
या कातरवेळी कशास फुटल्या लाटा
खुळि दिशांस पुसते स्वप्ननगरिच्या वाटा !
ते सगूणकूजन घुमटा पार विरावे
अन् शब्द अचानक मुके पारवे व्हावे
कधि फुलून येई हिरवी पहाटगाणी
उमलत्या कळीची की निश्वास विराणी. . . .

––मृणाल चिंचाळकर

अस्तित्व

वाटेला जोपासता जोपासता
आयुष्य तुडवले गेले
हे कधी कळलेच नाही
परतीच्या मार्गाकडे आता
डोळे लावणे इष्ट वाटत नाही,
कारण बाळमुठी उघडल्या आहेत.
बंड पुकारणे जीवाच्या आत जमत नाही,
मनात सहारा वाळवंट असले
तरी एखादा उंट पाण्याचे
कुंभ घेऊन उभा असेल
ही आशा सुटत नाही.
धड सूर्योदयहि नाही नी सूर्यास्तहि नाही
अशा लोंबकळणाऱ्या बिंदूवर,
अस्तित्व अजून जीव धरून आहे,
कुठला तरी किनारा खूडून
घेता येइल म्हणून.

––सुलभा हेर्लेकर

भोवरा

पद्मिनी बिनीवाले

त्यांचं पाच वाजता पुलाखाली असलेल्या खांबाजवळ भेटायचं ठरलं होतं. तो लोकलमधून उतरला तेव्हा पावणेपाच वाजले होते. त्याला खूप थकल्यासारखं वाटत होतं. तो अतिशय अस्वस्थ झाला होता. हातातली ऑफिसबॅग उगीचच या हातातून त्या हातात घेत होता. कासावीस होऊन परत परत कपाळावर येणारा घाम पुसत होता. तिला पाहिल्यावर आपला निश्चय तर ढळणार नाहीना अशी त्याला भीती वाटत होती. आता या गाठीभेटी हिंडणं फिरणं हसणं झुरणं, सारंच त्याला संपवून टाकायचं होतं. मला माझ्या संसारातून बाहेर पडता येत नाही. तू लग्न करून मोकळी हो असं सांगायचं होतं तिला! तिच्याविना आपल्याला क्षणभरही चैन पडणार नाही हे त्याला माहीत होतं. तरीही आज त्याला हे करायचंच होतं. उरलेलं आयुष्य तिच्याबरोबर काढण्याची अतीव इच्छा होती. पण तिला जवळ करायची म्हणजे दोन मुलं आणि पत्नी यांची जीवनं विस्कटून टाकण्यासारखं होतं. मनानं तो त्यांच्यात कुठंही नव्हता, तरीही त्यांच्यावर अन्याय करणं त्याला नको होतं. आपण तिला लाभलो नाही तर तिचंही आयुष्य कुठंतरी भटकत जाईल हे त्याला माहीत होतं. नुसती मैत्री मैत्री म्हणता म्हणता ती दोघं एकमेकांत चांगलीच गुंतली होती. ती नसली तर आपल्या आयुष्याला अर्थ नाही ते तो जाणत होता तरीही आज तो तिला सांगणार होता, "हे बघ, तसा मनानं मी जन्मभर तुझाच आहे. तुलाही कोणाचं होता येणार नाही हे माहीत आहे मला. आणि तरीही मला असं वाटतं की तू कोणाशी तरी लग्न करावंस. केवळ जगण्यासाठी! मी या संसारातून बाहेर पडणं म्हणजे मुलांवर अन्याय आणि तुला असं अधांतरी जगायला लावणं म्हणजे तुझ्यावर अन्याय. झाल्या गोष्टीला इलाज नाही. जमिनीवर सांडलेलं पाणी आपल्याला टिपून घेता येत नाही तसेच आयुष्यातले निसटलेले क्षण आपल्याला वस्तुस्थितीपासून वेगळे करता येणार नाहीत..!" असंच काहीसं आज तो तिला सांगणार होता. त्याला माहीत होतं ती रडेल, वैताग करील तरीही त्यानं तिला हेच सांगायचं ठरवलं होतं. आज घरी जातांना त्याला, तिला पूर्ण विसरून जायचं होतं. तिचं रूप, तिचे गुण सारं विसरून! परत ती आपल्याला पुन्हा कधी भेटणार नाही हे मनाला शिकवत त्याला आज घराची पायरी चढायची होती. केवळ त्या घरातल्या माणसांशी, वस्तूंशी नातं असल्यासारखं जगायचं होतं त्याला! त्याला बायकोचा वैताग नको होता, मुलांचे हाल बघवत नव्हते.

त्यानं पाहिलं पाचला पाच कमी होते, तिनं त्याला बजावलं होतं, "ए! पाच म्हणजे बरोबर पाचला तिथं अस बरं का, नाहीतर उशीर करशील मग मला वेड्यासारखं होईल. मला रस्त्यात असं बावळटासारखं उभं राहायला आवडत नाही!"

त्याचे पाय संकेत स्थलाकडे ओढ घेऊ लागले अन् मन विचार करू लागलं. आपण नकोच तिथं जायला, इथंच कुठंतरी आडोशाला उभं रहावं. ती आली की पाच मिनीटांनी जावं, उशीर झाला की ती सुरवातीपासून रागावेल आणि मग आपल्याला आपले विचारही जरा वेगळ्या मूडमध्ये बोलून दाखवता येतील. त्याच्या पायांनी त्याच्याशी संगनमत केलं. तो तिथंच एका दुकानाच्या फळीआड पण तो खांब दिसेल अशा बेतानं उभा राहिला

कुठल्यातरी घड्याळात पाचचे ठोके पडले आणि समोरच्या रस्त्यावरून ती येतांना दिसली. धापा टाकत, कपाळावरचे केस मागे सारत, हातातली पर्स सावरत! गेली पाचसहा वर्षं ती अशीच धपापत जगत होती त्याच्यासारखी....

काय छान दिसत होती ती. त्याला वाटलं असंच पुढं जावं आणि..पण त्यानं आपल्या मनाला खडसावलं, 'काय ठरवलं आहेस लक्षात आहे ना?' तो तसाच उभा राहिला. इतक्या लांबून तिच्यावर नजर खिळवत.

किती आशेनं आली ती खांबाजवळ. तो तिथं दिसला नाही म्हणून तिच्या चेहऱ्यावर केवढी निराशा पसरली. ती कावरीबावरी होऊन इकडे तिकडे पाहू लागली, खांब तो केवढा त्याच्या आड तो थोडाच दडून राहणार होता? पण तिनं त्या खांबाला एक प्रदक्षिणा घातली. हातातल्या घड्याळाकडं पाहिलं. काहीतरी घड्याळाशी चाळा केला. बहुतेक आपलं घड्याळ पुढं आहे असं समजून तिनं ते मागं केलं असावं, बिचारी काहीशा निश्चयानं त्या खांबाला टेकून उभी राहचली.

आता मात्र त्याला आपल्याजागी उभं राहवेना. तो झपाझप पाऊले टाकत तिच्याकडं आला. पण तरीही तिच्याशी बोलण्याचा निश्चय पक्का करूनच. त्याला वाटलं होतं ती त्याला पाहिल्याबरोबर चिडणार, कपाळाला आठ्या घालणार पण ती त्याला पाहताक्षणी केवढी सुखावली. इतका वेळ ताणला गेलेला तिचा चेहरा एकदम सैल पडला. ती नजरेनंच त्याला बिलगली आणि आपला हात पुढं करत म्हणाली, 'आण ती बॅग इकडे. खूप दमलेला दिसतोस. अगदी धावपळ करत आलास ना माझ्यासाठी! तू इथं दिसला नाहीस मला वाटलं मीच जागा चुकले!'

तोंडानं अशी काही बडबड करत ती त्याच्या हातातली बॅग घेऊ लागली तेव्हा त्याला उगीचच अपराध्यासारखं वाटू लागलं. तो म्हणाला, 'नको! नको, तू कसली बॅग घेतेस? लोक हसतील.'

'लोक?' ती खुदूखुदू हसत म्हणाली, 'तू भेटलास की लोकबिक काही माहीत नसतं मला!

त्याला, तिला आज खेळकर मूडमध्ये जाऊन द्यायचं नव्हतं, तो तुटकपणं म्हणाला, "बरं आपण कुठं जायचं बोल फिरायला?"

'कुठंही' ती समजूतदारपणं म्हणाली, 'आपल्या आवडत्या टेकडीवर! चालेल? पण काय रे तू आज असा दमल्यासारखा का दिसतोस? बरं नाही का वाटत? ताप आला आहे का?'

तो तिला बाजूला सारल्यासारखं करतो. टॅक्सी थांबवतो. 'ग्रीन हील' टॅक्सी ड्रायव्हरकडं तोंड वळवून म्हणतो अन् टॅक्सी धावत असता एका कोपऱ्यात सरकून बसल्यासारखा बसतो. कुठं तरी बाहेर बघत मनातले शब्द जुळवत राहतो.

जरा वेळानं हा नेहमीच्या मूडमध्ये येईल असं तिला वाटतं. तिची बडबड चालूच असते. एखाद्या दुकानातल्या शो-केसमध्ये लावलेल्या साडीकडं बघून ती म्हणते, 'ए ती बघ मला छान दिसेल नाही? ती बोगनवेल पाहिलीस फाटकावरची? रंग काय सुंदर आहे नाही? अरे! मेट्रोला चांगलं पिक्चर आलं आहे आपण केव्हा जायचं?'

'छान! सुंदर! जाऊ केव्हा तरी!' अशी काही तुटक उत्तरे तो देतो अन् मग तिचं तिलाच लाजल्यासारखं होतं. ती नुसतीच त्याच्या हातावरून हात फिरवत राहते.

टॅक्सीचे पैसे चुकते करून ती दोघं चालू लागतात. ते त्याच्या आवडीचं ठिकाण असतं. तिथं पसरलेल्या लहानमोठ्या हिरव्यागार टेकड्या, त्यावर पडलेलं संध्याकाळचं फिकट ऊन, दूरवर पसरलेल्या झोपड्या, इकडे तिकडे बागडणारी पांढरी स्वच्छ कोकरं, त्यांच्याकडं कुतूहलानं पहाणारी नागडीउघडी पोरं, हे सारं ती असोशीनं बघते. त्याला दिसतं तिच्या डोळ्यांनी आजुबाजूच्या रंगच्छटा टिपलेल्या असतात. तिच्या वृत्ती बहरून आलेल्या असतात. त्याला जास्तच बिलगून चालत ती म्हणते, 'ती मुलं बघ आपल्याकडं कशी बघताहेत. हास की जरा आता. रागावला आहेस का माझ्यावर? चुकलं का माझं काही?' अन् मग मध्येच एक उसळी घेत समोर बोट दाखवत ती म्हणते, 'ए! ती झोपडी बघ किती छान आहे' आणि मग इकडे तिकडे बघत, 'ए! इथंच बसू या छान आहे ही जागा!' असं म्हणत फतकल घालून बसते आणि त्याचा हात धरून त्यालाही ओढते. तोही बसतो. त्याची बॅग, आपली पर्स काहीशा रागानंच दूर सारते, तिला आता त्याच्या वाचून दुसरे काहीच नको असते. त्याच्या उभ्या गुडघ्यावर हनुवटी टेकत ती लाडीकपणं म्हणते, 'आपल्या आयुष्याचे काही दिवस अशा झोपडीत घालवायचं ठरवलं आहे ना आपण?'

तो तिला थोपटल्यासारखं करतो. पण लगेच स्वत:ला सावरून म्हणतो, 'हो त्याचाच विचार करायचा आहे आज.'

'एवढंच ना' त्याचा मूड एका मिनिटात बदलू अशा विश्वासानं ती म्हणते. 'मग त्यात इतकं गंभीर कशाला व्हायला हवं? ते तर आपलं ठरलंच आहे की,

आपण एक छोटस घर घ्यायचं, घरापुढं छोटीशी बाग करायची, बागेत एक साधा झोपाळा लावायचा आणि"

तिच्या मनात थुईथुई नाचणाऱ्या कारंजात तोही भिजू लागला. तेव्हा वेगळाच विषय काढून त्यानं ते कारंजं बंद करून टाकलं. तो म्हणाला, 'अग परवा आमच्या ओळखीतल्या एक बाई गेल्या !'

'गेल्या म्हणजे !

'गेल्या म्हणजे वारल्या, केवढी धिप्पाड बाई ! एकाएकी गेली. दोन मुलं नवरा—सारा अर्धवट संसार . .'

'अरेरे ! अगदी जवळच्या नात्यातल्या होत्या का ? त्यासाठी का तू उदास होतास ? मग आल्या-आल्याच नाही का मला सांगायचं ?'

'त्यासाठी नव्हे ग' तिला अडवत तो म्हणाला, 'वाईट तर वाटलंच मला पण त्याचा काही दोनतीन दिवस परिणाम राहिला नसता माझ्यावर, पण. '

'मग ?' तिचा अधीरा प्रश्न.

'मग काय, घरी आल्यावर हीचं ओक्साबोक्शी रडणं सुरू झालं.'

'साहाजिकच आहे रे. बायका हळव्या असतात आणि तो प्रसंगच तसा विचित्र असतो.' उत्तर देण्याची आणि तो विषय संपविण्याची तिला घाई असते.

"ते सारं ठीक आहे पण घरी आल्यावर हीनं जो हंबरडा फोडलान् 'देवा त्या बाईला नेण्याऐवजी मला का नाही नेलंस, बिचारी सुखाच्या संसारातून गेली. देव तरी कसा पहा. सुखात असलेल्यांना नेतो. आणि आमच्या सारख्यांना आणखी दुःख भोगायला मागं ठेवतो.' एक अन् दोन तिनं असा धिंगाणा घातलान्."

"अगबाई ! मग रे ?" तिनं बावरून विचारलं

"तिनं हातपाय आपटले, डोकं आपटून घेतलं कॉटवरच्या उशा भिरकावल्या. . . "

त्याला वाटलं ती आता हवी तशी आपल्यामागं येऊ लागली. तो सांगतच राहिला. 'काही विचारू नकोस. इतकंच नाही तर अंगणात खेळत असणाऱ्या मुलांना फराफरा ओढत आणून आपटत मारत म्हणाली, 'कारट्यांनो तुमच्यासाठी इथं पिचत कुढत मरावं लागतं नाहीतर केव्हाच वीष खावून जीव दिला असता मी, कशाला आलात जन्माला' असं म्हणत ती त्यांना आपटायला लागली. मला तर वाटलं ही जीवच घेणार त्यांचा. धाकटा तर अगदी काळानिळा पडला.'

'बिच्चारी पोरं. . . .'

"अग हे काही आजचं नाही. नेहमीचंच आहे. तिला चिडायला वैतागायला एवढंसं कारण पुरतं. मग तुझ्यामाझ्या मैत्रीची अनेकवार उजळणी होते. 'तुम्ही तिला काय घेऊन दिलंत ? तिच्याकडं केव्हा गेला होतात ?' तेच तेच प्रश्न विचारत राहते. मग घरात आठआठ दिवस अबोला आणि सगळ्यात वाईट म्हणजे ती माझा राग मुलांवर काढते. त्यांच्या खाण्यापिण्या-कडे दुर्लक्ष करते."

'माहीत आहे रे सारं' ती एक उसासा टाकत म्हणते.

"आज आता ती तापानं फणफणत पडलेली आहे आणि मी इथं तुझ्याजवळ."

"मग तुला वाईट वाटतय का ? नाईलाजानं बसला आहेस का तू ?" स्वरात नाराजी येते. डोळे खोल गेल्यासारखे दिसतात. कपाळावर एक सूक्ष्मशी आठी येते तरी स्वतःला सावरत ती म्हणते 'ए मग उठ. लवकर घरी जा. तिचा ताप बघ तिला औषध दे. आज तू मला विसरून सगळा तिथला हो, मग तर झालं ?"

"तसं नव्हे ग" आपलं बोलणं तिला लागलं याचं त्याच्या मनाला फार वाईट वाटलं. तिच्या गाला-वर हात फिरवत तो म्हणाला, 'पण हे सारं आता जाचक व्हायला लागलं आहे. तिकडं तिचा वैताग, जीव देण्याच्या धमक्या, मुलांचे हाल — इकडं तुझ्याकडं यायला जमलं नाही की तुझा राग. मी घरी रमलो असेन असा संशय ! दोन्ही सांभाळणं जमत नाही आता, त्यातून बाहेर पडावं हेच बरं.' तो पाठ केल्या-सारखं बोलून टाकतो. अन् एक सुटकेचा श्वास टाकतो.

त्याला वाटतं ती नेहमीसारखं रागावून म्हणेल 'दे सोडून मला.' पण ती पट्कन त्याच्या गळ्यात हात टाकत म्हणते, 'हे बघ तिला बरं वाटू दे मग आपण या साऱ्याचा सोक्षमोक्ष लावून टाकू. माझ्यासुद्धा एकटं राह्यचं आता अगदी जिवावर आलं आहे. मला तुझ्या मुलांचे हाल कळतात, बायकोचं दुःख कळतं तरीही मला वाटतं याच्यावर खरा हक्क माझाच आहे.' त्याच्या

डोळ्यात वाकून बघत ती म्हणते, "कारण तू खराखुरा माझाच आहेस हो ना रे ?"

"होय ग! अगदी खरं" तो नकळत बोलून जातो आणि मग ती बोलतच राहते.

"एखाद दिवशी वाटतं यावं तुझ्या घरी आणि बसावं तिथंच मांडा ठोकून ! हक्कानं सांगावं मी इथंच राहणार आहे. हे त्याचं म्हणजे माझंच घर आहे. तुम्हाला राहायचं असेल तर सुखानं समाधानानं रहा." क्षितिजावर संध्याकाळचे विविध रंग पसरलेले असतात; तिच्या चेहऱ्यावरचे भावही पटापट बदलत असतात. तो एकटक तिच्याकडं पहात असतो. खरंच ती एखाद्या हट्टी बालीश मुलीसारखी दिसत असते. ती मध्येच त्याचे दोन्ही दंड धरून त्याला हलवत म्हणते, "मी किनई तुझ्या मुलांचं बायकोचं सगळ्यांचं सारं काही करीन पण तू मात्र सगळा सगळा माझा हवास हं ! करायचं का आपण असं ? आपण सगळेच एकत्र राहू, नाही तरी तू म्हणतोसच ना की जगाला आपल्याकडं पाहायला वेळ नसतो, जगाला रोज नवीन विषय लागतो म्हणून....!"

त्याच्या मागं येता येता परत ती नको त्या रस्त्याला जाते. तिला कशी थांबवावी हेच त्याला कळत नाही. एवढंच नाही तर तिची गती घेऊन आपलंही मन धावायला लागल्याचं त्याच्या लक्षात येतं. तिच्या शेवटच्या प्रश्नानं तो काहीसा भानावर येतो. स्वतःला सावरतो. आपण आज काय ठरवलं होतं ते त्याला आठवतं. मघाचाच धागा पकडत तो म्हणतो, 'त्या भांडणानंतर मी लगेचच निघालो होतो तुझ्याकडं यायला, एकदा या प्रश्नाचा निकाल...!"

'अरे ! मग का नाही आलास ?' ती अधीरपणे विचारते.

'आलो होतो ना, पण आपण कुठं होतात घरात' त्याच्या शब्दांत काहीसा उपहास काहीसा राग असतो. 'आम्ही तुमच्या दारात आलो तर भलं मोठं कुलूप. रस्त्याकडं पाहिलं तर कोपऱ्यावरून वळतांना दिसलात आपण !' तो रागावून म्हणाला 'आणि त्या दिवशी बरोबर कोण होतं तुझ्या ?' तुला कोणी मित्र भेटला असेल तर तोच निर्णय मलाही मान्य आहे असं सांगायचं ठरवलं होतं त्यानं पण नकळत त्याच्या शब्दांत राग डोकावतो.

'माझ्याबरोबर ?' बारीक डोळे करून ती आठवण्याचा प्रयत्न करते. आणि मग मिस्किलपणे हसत, दोन्ही हातानं त्याचे केस धरून त्याचं डोकं मागपुढं हलवत म्हणते, "अस्सं म्हणून रागावली होती हो स्वारी मघापासून" अन् मग हसतच राहते.

त्याला तिच्या चिडविण्याचा राग आलेला असतो. त्याला तिला सांगायचं असतं, 'तुला कोणी जोडीदार मिळत असेल तर लग्न करून सुखी हो.' पण ती दुसऱ्याची होणार दुसऱ्याचा संसार करणार, दुसऱ्याची मुलं खेळवणार हे अजून त्याच्या मनाला पटत नसतं. त्याच्या मनातली हक्काची जाणीव उफाळून येते. त्याला वाटतं मी हीच्या वर जिवापाड प्रेम केलं. हीला माया लावली, हीच्यासाठी संसारं विसरलो, प्रतिष्ठा गमावली, हीला मी दुसऱ्याची नाही होऊ देणार, ही माझी आहे कायमची माझीच राहिली पाहिजे.

तो आता बायको मुलं सारं विसरलेला असतो. तो आता फक्त तिचा प्रियकर असतो.

संध्याकाळ झालेली असते. मघाचं ऊन एकदम नाहीसं होतं, त्याला उगीचच काही तरी हरवल्यासारखं वाटतं. तिचे दोन्ही दंड पकडून काहीशा हुकुमी आवाजात आणि काहीशा चिडखोरपणानं तो म्हणतो, 'हसतेस का अशी ? कोण होता तो माणूस ?'

तिला अजूनही हसू येत असतं पण तो आता चांगला रागावेल हे तिला माहीत असतं. जवळच्या गवताची काडी दातात धरून ती म्हणते, 'अरे तो आमचा फडतूस बॉस रे !'

'कशाला आला होता तो ? परवा पण एकदा आला होता ना ? हे मला चालणार नाही हं !'

'तसं काहीच काम नव्हतं त्याचं. घरावरून चालला होता तो आत शिरला इतकंच, आणि खरं सांगू त्यानं फार वेळ घरात बसू नये म्हणून मीच बाहेर काढलं त्याला; बाहेर जाण्याचं निमित्त करून.' आता त्याची खात्री पटली असेल असं वाटून ती त्याचा चेहरा न्याहाळते. आणि अजूनही त्याचा राग गेला नाही हे पाहून दोन्ही तळव्यात त्याचं तोंड पकडून म्हणते, 'ए असं रागवायचं नाही हं. नोकरी करायची म्हटली की असं काही तरी घडणारच नाही का ?'

भोवतालच्या अंधुक प्रकाशात ती आणखीनच छान दिसते. आल्यापासून प्रथमच तिचे हात आपल्या

हातात घेतो, म्हणतो 'आपली आयुष्यं आता इतकी एकमेकात मिसळली आहेत की ती काळाशिवाय कोणा-लाच दूर करता येणार नाहीत. तुझ्यासाठी मी आणि माझ्यासाठी तू हेच खरं.'

बोलता बोलता दोघंही भारावून जातात, सगळी-कडं शांत झालेलं असतं. गुरं टेकडीवरून परतलेली असतात, त्यांच्याकडं कुतुहलानं बघणारी मुलंही आपा-पल्या झोपड्यात परतलेली असतात. झोपड्यातून लुकलुकणाऱ्या दिव्यांसारखे तिचे डोळेही चमकत असतात. तो तिला आपल्या कुशीत ओढून घेतो, तिची हनुवटी आपल्या बाजूला करत म्हणतो 'तू म्हणतेस ते खरं आहे. आपण एकमेकाला सोडणं म्हणजे मरण ओढवून घेण्यासारखे आहे. पण एखाद दिवशी वाटतं एकापेक्षा एक चांगली माणसं असतात जगात, आपल्याला लाभलेलं हे स्वप्न हातातून निसटता कामा नये!'

'नाही रे तू मुळीच काळजी करू नकोस, तुला काळजी वाटत असेल ना तर उद्याच मी त्या बॉसला सांगते माझ्याकडं येऊ नकोस म्हणून! त्याच्याशीच काय कोणाशीच बोलणार नाही मी. अगदी नोकरीसुद्धा सोडून देईन.'

दोघंजणं एकमेकाकडे समाधानानं पाहतात आणि त्याच नादांत उठतात. तो आपली बॅग घेतो. ती साडी सारखी करते, पर्स घेते, त्याचा हात तिच्या खांद्यावर असतो. चालता चालता पुढे पडणाऱ्या दोघांच्या सावल्या गंमतीदारपणं पुढं पसरत असतात.

खळा

झाला चुरना धानाचा
गेली शेवटची रास
मोकळ्याशा खळ्यामधी
मेढ सागाची उदास
पडवीत बांधलेला
गोरा सुटला मोकाट
तनशीच्या ढीगावर
मन्या लवते झोकात.
माती खंदली गड्यानं
पाटापाटच्या मेऱ्याची
कशी डोलाया लागली
रोपं वांग्यामिरच्याची
थोडी तोडली डुईंग, थोडी पोपट, लाखोरी
भाज तनशीवर गा, करू जराशी न्याहारी.
बैल जुपं गाडीले गा, झाकं पडली पाहय नं
कसा गेला गा दिवस, होती आत्ताच तपन.

□

वझाडं वझाडं !

रानच्या वाटेनं
जमीन पड्यार
रुसून कवाची
मिरुगाची सर
आमराई खाली
गाईचा गोहन
भोवताली जसी
इसत्याची उन
थंड्या सावलीत
मन ईचारात
जवळच आला
पेरावाचा घात
ढगाची अमदा
चुकली का वारी?
घरात धानाची
रिकामी वखारी
वझाडं वझाडं
भोवती आभाळ
वझाडला आता
मनाचा बी तळ.

□

ओल

वेड पांघरुनी झाडं
उभी रांगेमधी दाट
मागे टाकुनी आखर
मन सुटले मोकाट
मासे पकडाया जळी
कुणी टाकलेला गळ
खोड काढता पानांची
खोल रुते सळसळ
ओल फुटे पदरात
हात पोटाशी धरता
गंध मातीचा जाणवे
रान हिरवे जपता.
कुठे नाही कुजबूज
पाय असा घसरला
गाळ पसरण्याआधी
जसा पूर ओसरला.

□

—रंजना विगम

तांब्यांचा प्रकाशमय निसर्ग



आशा अरविन्द सावदेकर

तांब्यांची काव्यदृष्टी ही एका सौंदर्यप्रेमी, प्रेमतत्त्वावर गाढ श्रद्धा असणाऱ्या रसिक कवीची दृष्टी आहे. तांबे भावकवीच आहेत. त्यांचे काव्य सहजोद्गारी आहे. कधी ते त्यांचे मनोगत आहे तर कधी इतरांचे, तर कधी तो दोहींचा संवाद आहे. तांब्यांच्या काव्याचे स्वरूप असे का बनले असावे? केवळ आपले भाव चारचौघात व्यक्त करणे अशक्य म्हणून ते वस्तुनिष्ठ दृष्टी स्वीकारत नाहीत. सगळ्यांची सुखदुःखे अनुभवावीत, रंगवावीत ही त्यांची भूमिका. सर्वव्यापकतेची ही भावना त्यांच्या काव्यात महत्त्वाची आहे. व्यक्ति विस्ताराची ही कल्पना व 'I see myself in all I see' या टेनिसनच्या युक्तीवरील अढळ विश्वास यामुळे तांबे आपल्या भावनांबरोबर इतरांच्या भावनाही तितक्याच समरसतेने रंगवू शकतात.

त्यांच्या वृत्तीला प्रकाशाचा ध्यास आहे. अंधाराचा अनुभव आहे पण त्यामुळे त्यांची श्रद्धा, आशावादित्व मालवू शकत नाही. तांबे केवळ ईश्वरावर श्रद्धा ठेवणारे असते तर त्यांचे काव्य भक्तिभावाच्या पलिकडे जाऊ शकले नसते. तांबे जीवनावर, जीवनातील सौंदर्यगाभ्यावर प्रेम करणारे, प्रेमभावनाच जगाच्या बुडाशी आहे असे मानून सौंदर्यावर, प्रेमावरच प्रेम करणारे आहेत. केवळ प्रेम नव्हे तर चराचरातील अवघ्यांना अदृश्यपणे बांधणाऱ्या प्रेमसूत्राचा त्यांना ध्यास होता.

सौंदर्याचे कण टिपता टिपता विश्वात्म सौंदर्याला अभिमुख होण्याची धडपड कवी वारंवार करतो. मग ते मानवी सौंदर्य असो वा निसर्गसौंदर्य असो. त्यातून अंतिम सौंदर्यदर्शनाची वाट तांब्यांना गवसते.

त्यांच्या काव्यात सौंदर्याचा शोध हाच अनेकदा शिवत्वाचा शोध बनतो. ज्या सौंदर्याने, ज्या चुटपुटत्या सत्यदर्शनाने कवी मोहित होतो, त्याच प्रकाशाचा दीप करून अवघ्या ब्रह्मांडाचा ठाव घेवू पाहाणारा हा कवी आहे. तत्त्वज्ञानाची पुटे बाजूला सारून जीवनरहस्याला समोरे जाण्याची वृत्ती ते अनेकदा प्रकट करतात.

'सूर्यचंद्र अगणित नक्षत्रे,
गिरि, सागर, तरू असंख्य पात्रे,
सजुनि नटे जो लीलामात्रे,
शिवसत्याचा ठावा.' ('भैरव')

वेड लावणारे सौंदर्य निर्माण करणारा किती आनंदमय, सौंदर्यमय असेल या जाणीवेने मन त्याकडे, अंतिम विश्वात्म सत्यस्वरूपाकडे ओढ घेते. म्हणून निसर्गातील सौंदर्यापलीकडचे बघण्यासाठी कवीमन आसुसते.

'दिनोद्गमी रविमुखी धनरेषा
पूर्णचंद्रि लांछन दे क्लेशा,
शुकमुखा दे तम परिवेषा,
ही न्यूने आता दूर करा.'
('घट भरा शिगोशिग')

तांब्यांची निसर्गदृष्टी अशा सौंदर्यदर्शनाकडून कवीच्या आध्यात्मिकतेला वाट फोडणारी आहे. निसर्गसौंदर्याच्या ध्यासातून केवळ अपूर्णतेच्या जाणीवेने काजळून जाणारी निसर्गदृष्टी प्रकाशप्रेमी तांब्यांच्या काव्यात नाही. मानव व निसर्ग यांच्या नात्यांची उकल करण्याचा, त्या सर्वांच्या बुडाशी असलेल्या सच्चिदानंद स्वरूपाचा वेध घेण्याचा तांब्यांना छंदच आहे. आणि तेच रूप आपल्या अंतःकरणात वसले आहे असा त्यांचा विश्वास आहे.

'तेच फुलांच्या मार्दवि फुलले
सुवर्णवर्णी उषेत खुलले,

सायंतनि तरू गिरि घनि झुलले,
रे, उघड नयन, बघ नीट पुरे !
....मंदिरी मना तव गान भरे !'

तांब्यांची ही विचारसरणी अस्सल भारतीय आहे. Nature Mysticism असे पाश्चात्यांप्रमाणे वेगळे नाव न देता भारतीय दृष्टी निसर्गात, मानवात व अनुभवातीत, अगम्य, अनाकलनीय अशा प्रत्येक घटनेत ईश्वरी अंश बघत असते. हे भारतीय अध्यात्म Nature mysticism पेक्षा सखोल कसे हे सांगताना एका लेखकाने म्हटले आहे–

'The nature mystic of the West, however does not in general soar from nature to the God in nature and beyond it. His experience has to be stabilised by spiritual practice. Higher mysticism is the communion between the self of man and the In-dwelling self and nature mysticism is a halfway house to it and not the goal or the final stopping place. In the mysticism of Valmiki, Kalidas and other Indian poets, there is no boundary line between nature, human nature, and God in all things as well as in man and also his transcendence.'

तांब्यांच्या काव्यात त्यांचे व्यक्तित्व, समोरची व्यक्ति, भोवतालचा निसर्ग या सगळ्या गोष्टी अंतःसंगतीने एकरूप झालेल्या दिसतात.

'अंधुक श्यामल वेळ, टेकडी,
झरा, शेत, तरु, मधे झोपडी,
त्यांची देवी घारहि काढी,
का स्वप्नभूमि बिंबुनि मिसळे ?'
('ते दूध तुझ्या त्या घटातले')

निसर्गदृश्यांमधून तांबे कित्येकदा अंतर्मुख होतात. नवनवे भावानुभव नोंदवू पाहातात.

'ते संध्यामेघावरी
चमकती किरण पळभरी,
परि जाति कुणिकडे सांग आम्हाला चटका ते लावुन ?'
('या परी असे जीवन')

निसर्गसौंदर्याच्या भंगुरतेत त्यांना आपल्या जीवनाची अशाश्वतता दिसते पण तरी प्रकाशमयी प्रेमश्रद्ध वृत्तीमुळे ते व्याकुळत नाहीत तर 'जायचे अम्हा त्या न घरी...तरी न बघु असुनि अम्हा लोचन' या वृत्तीने जीवनसन्मुख होतात. 'क्षिप्राचमळासंगम' मधून अनावर प्रेमाच्या भरतीचा तर 'घन तमी शुक्र बघ राज्य करी' मधून आशावादी प्रेममय वृत्तीची पुकार तांबे करतात.

निसर्गसौंदर्याला वाटाड्या बनवून कवीमन त्याहीपुढे असलेल्या चिरंतन सौंदर्याकडे धाव घेते. सौंदर्यदर्शनातूनच गूढ अध्यात्मदर्शनाला तांब्यांच्या काव्यात वाट फुटते ती अशी ! त्या निसर्गदृश्यामागील शक्तीचा, प्रेममय अनंतरूपाला साक्षात्कार होणे, प्रत्यय येणे, त्यामुळे आनंदलीन होणे, हीच तांब्यांची दृष्टी त्यांच्या निसर्गकाव्यातून दिसते.

रूपारूपात व्यापूनही रूपातीत परमेश्वररूपाची अद्वैती जाणीव तांब्यांच्या रोमारोमात भिनली आहे म्हणून निसर्गातून त्याच्या खुणा निरखीत 'तुझी ही कृती रे मनोमोहना' अशा निराकाराकडे जाण्याचा वेध त्यांना लागतो. प्रेमसूत्राने आपण व निसर्ग यांना बांधणारा नियंता 'मूर्तप्रेम' रूपात त्यांना वेड लावू लागतो. मग तीव्र आर्ततेने कविमन म्हणू लागते –

'कधि चंद्राच्या मिषें घालिशी डोळा मजवरती
प्रेमकळहि तू रागावुनि कधि सूर्यमिषे बघशी'
('रे चेटक्या !')

निसर्ग व मानव यातले नाते कवीला आकळते व त्यामागील शक्तीचा प्रत्यय निसर्गातील लहानशा गोष्टीतूनही कवींना येऊ लागतो.

'तृणाचे पाते, हालते डोलते वाते.
— — — —
तुम्हापरि पवन गाइ या गाणि
बघा हे नाते.'
('तृणाचे पाते')

प्रसन्न निसर्गाच्या सान्निध्यात त्यांच्या काव्यातील प्रीतीचे क्षण बोलके होतात. मग निसर्ग केवळ पार्श्वभूमीरूप उरत नाही तर भावनेने रंगून जातो.

'कनक गोल हा मरीचिमाली जोडी जो सुयशा
चक्रवाल हे पवित्र, ये जी शांत गभीर निशा,
त्रिलोकगामी मारुत, तैशा निर्मल दाहि दिशा
साक्षी असे अमर करुनि हे तव कर करि धरला'–
('तीनी सांजा सखे मिळाल्या !')

बालगीतातला निसर्ग बालमनाला कुतूहलजनक भीती वाटेल असाच आहे.

'झाडांच्या ओळीत – वेळूंच्या जाळीत
दिवसा दुपारी – जांभळी अंधारा
मोडके देऊळ – त्यावरी पिंपळ'
('*हे कोण गे आई !*')

निसर्गप्रतीकांमधून, रूपकांमधून भावना रंगविण्याचे कसब तांब्यांनी अनेकदा दाखविले आहे.

'ढळला रे ढळला दिन सखया
संध्याछाया भिवविति हृदया'
('*रिकामे मधुघट*')

तांब्यांच्या नाट्यगीतांमध्ये निसर्ग वर्ण्य भावाशी समरस होतो. 'आज तो कुठे जिवाचा चोर' मधील निसर्ग नायिके प्रमाणेच 'तटस्थ पाने – तटस्थ राने.... टवकारुनिया पाती कणसे कुणास बघति समोर ?' अशा प्रतीक्षेत व्याकुळ झाला आहे. तर 'घट भरे प्रवाही' मध्ये नायिकेची थट्टा करण्यात कवींना सामील झाला आहे.

'वेलि हसति तुज फुलुनि बघ फुले,
डोलती विनोदे तरु बघुनी !'

निसर्ग अशा सुंदर प्रकाशमय स्वरूपातच त्यांना दिसलेला आहे. निसर्गाचे रौद्र, भीषण रूप बघूनही त्यांना नवनिर्मितीचा आनंद मिळतो.

'धडघडा फोड तट
...धगधगित अग्निमधि उजळ भद्रा.'
('*रुद्रास आवाहन*')

याचे कारण हृदयाच्या भावभट्टीत रसरूप होऊन वास्तव काव्यात पुनर्जात होते हा त्यांचा विश्वास असल्यामुळे वास्तवातील हीण नाहीसे होऊन निसर्गाचे निव्वळ प्रकाशमय रूप उरते. त्यांच्या काव्यातील निसर्ग त्यांच्या काव्यदृष्टीशी नाते सांगणारा आहे. तांबे निसर्गाकडे बघता बघता त्याशी तल्लीन होत राहात नाहीत तर निसर्ग मानव – अनंत अशा एकाच प्रेमसूत्राची संगती लावण्याचा प्रयत्न करतात. तांब्यांच्या निसर्गदृष्टीमागे अद्वैतावर, प्रेमस्वरूपावर विश्वास ठेवून प्रेमरज्जूने दृश्य वस्तूला बांधू पाहाणारे प्रेमश्रद्ध मन आहे. म्हणूनच ते निसर्गात मानवी भावना शोधू शकतात. एका ठिकाणी ते लिहितात–

'सृष्टीच्या भव्य, विशाल, उदात्त सौंदर्याचे वर्णन करीत असताना देखील आम्ही मानव जीवनाला विसरत नाही, उलट आमचे स्वतःचे जीवन व सृष्टीचे जीवन आम्ही एकमेकात गुंतवून टाकतो' (वाग्वसंत – प्रस्तावना.)

पृथ्वीवरील मानवी दुःखांच्या जाणीवेमुळे सौंदर्यप्राप्तीचा त्यांचा आनंद डागळत नाही. कारण ते प्रेमश्रद्ध आहेत.

'प्रसवे अवस सुवर्णा अरुणा
ऊषा प्रसवते अनंत किरणा'
('*घन तमी शुक्र बघ राज्य करी !*')

अशा श्रद्धेमुळे प्रकाशयात्री तांबे दुःखे पचवून प्रकाशाचीच स्वप्ने पहातात, प्रकाशाचीच गीते गातात. 'अपूर्व सुंदर नाटक हे जग' अशा भावनेने करुण रसाचाही आनंद लुटतात. व्यक्तिगत कोषातून बाहेर पडण्यासाठी झगडत राहतात, 'ये बाहेरि अंडे फोडुनि, शुद्ध मोकळया वातावरणी' असे मनाला शिकवीत राहातात. म्हणूनच निसर्गातूनच त्यांना 'कलेचे हृद्गत' गवसते.

'रूपारूपामधुनि निघे हा अनहत तव नाद
भाग्यहीन मी बधिर पडेना कानी पडसाद.'
('*कलेचे हृद्गत*')

प्रेमातच सौंदर्य बघणारे, त्याची पूजा बांधणारे तांबे सौंदर्याच्या अंतिम फलाचा, आनंदाचा निर्मलतेत शोध घेतात. खरे तर तो त्यांच्या आनंदयात्री, प्रकाशयात्री व्यक्तित्वात दडला आहे.

'आकाशी आनंद वरी
भरे धरेवरि त्याचपरी
आनंदाचा सागर भरला घ्याच बुड्या स्वच्छंद'
('*आनंदी आनंद*')

या आनंदाने 'फुकाऱ्यासह जाति उडोनी क्रोध, लोभ, हेवा' असा त्यांचा अनुभव आहे. म्हणूनच अंधार पचवून प्रकाशाकडे ते उत्साहाने वळून प्रकाशाचाच जयजयकार करू शकतात. हीच प्रकाशप्रेमी तांब्यांची प्रकाशमय निसर्गाकडे बघण्याची दृष्टी आहे.

'अपूर्व सुंदर नाटक हे जग
मांगल्याचे आगर सोभग,
कसे म्हणावे दुःखमूल मग ?
जयजयकार करावा !'
('*भैरव*')

थोडक्यात, तांब्यांच्या काव्यातील निसर्ग निर्मात्याच्या शैलीचे, सौंदर्याचे अंशभूत दर्शन घडविणारा, त्यातून संपूर्ण सौंदर्याचा वेध घेण्याची इच्छा प्रबळ करणारा, अध्यात्ममार्गाकडे नेणारा वाटाड्याच आहे. म्हणूनच तांब्यांची निसर्गदृष्टी पृथगात्म मानावी लागेल.

एक्स्टेन्शन

मालती निमखेडकर

पंचावन्नावे वर्ष संपले. उद्या कदाचित रिटायर्ड-मेंटची ऑर्डर मिळेल. मथुरेनं आपलं डोकं हलवलं. कानाला लावलेल्या हेडफोनची जाणीव झाली. आवाज आला.

'Exchange please.'

'Yes. One Nine Seven.'

'I want Afle's No.

'Yes. 24497.'

तोच मागून खो मिळाला. ऊठ मथूताई बारा वाजले. तुझी वेळ संपली, मधुरेनं तिच्या कानाचा हेडफोन आपल्या कानाला लावीत म्हटलं.

मथुरा आणि मधुरा, आयुष्याच्या दोरीच्या दोन टोकाला उभे असलेले दोन जीव. पण दोघींनीहि संसाराला नुकतीच सुरवात केलेली. मधुरेनं पंचेवीशित तर मथुरेनं पन्नाशीत. पुरे पंचेवीसचे अंतर.

मथुरा उठली. तिच्या गुडघ्यात दुखले. गुडघ्यावर हात देत ती कशीबशी उभी राहिली. 'अयाऽई'!

मधूनं खुर्चीवर बसल्याबसल्या हात लांब करून तिच्या हातात ऑर्डर दिली.

'बॉसनं दिली, अयाऽई करू नकोस. अजून तीन वर्ष काढायची आहेत तुला. ५८ कंप्लीट होइस्तोवर. जा पलंगावर पडून विश्रांती घे. तुझ्याकरता डबा आणलाय मी.'

तीन वर्षाचं एक्स्टेन्शन, आनंद मानावा की दुःख. मथुरेनं पिशवी विश्रांतीकक्षेच्या कपाटात ठेवली. मधूनं आणलेल्या चिवड्याचे चार दाणे तोंडात टाकले. दाढेतून जबरदस्त कळ आली. तशी चूळ भरून ती कॉटवर पडली. ४ ते १२ च्या रात्रपाळीतून मोकळ्या झालेल्या तिच्याचसारख्या कर्मचारी बिछान्याची ऊब घेत पहुडल्या होत्या. मायानं उशी पोटाशी घेत यजमानांच्या कुशीत रमण्याची स्वप्नं पहायला सुरवात केली होती तर प्रियाची काचोळी तान्ह्या मुलाच्या आठवणीनं ओली झाली होती.

टेलिफोन एक्स्चेंजचे ते ऑफीस म्हणजे महिला नगरीच. मथुरेला आठवलं आपण लागलो तेव्हा हे ऑफीस इथे नुकतेच उघडले होते. आपल्याबरोबर पुरुषहि काम करायचे. पुढे ह्या कामाला महिलाच लायक असं ठरल्यावर हे ऑफीस म्हणजे पुरुषपात्र विरहित असलेलं रोजचं तीन अंकी नाटकाचं स्टेजच बनलं, आठ आठ तासाच्या ड्युटीत रंगलेलं.

आता विवाहित स्त्रियांना घेतात. आमच्या कडून करार करून घेतला होता. 'लग्न करणार नाही, केल्यास नोकरी सुटेल.'

नोकरीसाठी कां आपण अविवाहित राहिलो? आपलं लग्न झालं नाही की आपण केलंच नाही?

मथुरेनं पाय लांब केले. पाच फुटी पलंगाच्या खाली सहा इंच पावले लोंबतच होती. साडेपाच फूटापेक्षाहि जास्त उंची, आडवा देह. खूप गोरेपण, पायापर्यंत केस, तसाच तगडा जवान मिळणार कसा?

जे भेटले ते तिला आवडलेच नाहीत. बाकीच्यांनी हिलाच नापसंत केले. वीस ते पंचेवीस वयापर्यंत ह्याच आवर्तात ती सारखी फिरत होती. शिक्षण संपलं. बी. ए. झाली पुढे काय?

पुढे, पुढे, पुढे. मोठ्या बहिणीचा नवराच पळून गेला कुठे तरी लांब, हिमालयात. काम करायचा कंटाळा आला. दिलेल्या बीणेला पोसायचे जीवावर आले. बहीण मुलांना घेवून माहेरी आली. भाऊ बायकोला घेवून वेगळा निघाला. मधल्या बहिणीचा नवरा तिर्रसिंगराव. हम करेसो कायदा, तुपातली माशी पिळणारा.

मथुरेनं डोळे किलकिले केले. एक प्रसंग तिच्या डोळ्यात अलगद शिरला. ती मधल्या बहिणीकडे, मि. जोगांकडे गेली होती, शांतीला बोलवायला. तिनं नवऱ्याकडे बोट दाखवलं आणि धुण्याची बादली घेवून ती विहिरीवर चालती झाली.

मथुरा शिष्टाई करायला पुढच्या खोलीत आली. मि. जोग दिवाणावर बसून सुपारी कातरीत होते.

'भाऊसाहेब, शांताताईला पाठवा नं घरी. आईचा निरोप आहे. उद्या सकाळीसच पाठवीन तिला.'

'पण आजचं काय? इथे दुसरं कोण आहे तिच्याशिवाय'?

'दोन्ही वेळचा स्वयंपाक करून जाईल ती. एका रात्रीचाच तर प्रश्न आहे'

भाऊसाहेब खदखदून हसले. 'घ्या सुपारी घ्या खास कोकणातून आणली.' बारीक सुपारी त्यांनी मथुरेच्या हातावर ठेवली आणि तिचा हात आपल्या मुठीत गच्च पकडीत म्हटले. 'प्रश्न फक्त एका रात्रीचाच आहे गं! तूं रहातेस तिच्या बदल्यात. तू तर तशी मोकळीच आहेस.' तिच्या छातीवर दृष्टी लावीत ते बोलत होते. तिच्या अंगाला दरदरून घाम सुटला. आताहि तिला गुदमरल्यासारखे झाले, तिने उठून पंख्याची स्पीड वाढवली. पुन्हा कॉटवर पडून ती विचार करू लागली. त्यानंतर पुन्हा आपण शांतीकडे गेलोच नाही. घृणा आणि घृणा. आणखीन अशीच एकदा पाल पडली होती. अंग अंग किळसले होते.

मैत्रिणीच्या घरी ती रहायला गेलेली असते. मैत्रिण नर्स होती. अंगणात खाटा टाकून सारी झोपलेली. तिच्या बाजूच्या खाटेवरून तिच्या अंगावर एक हात पडतो. तो मैत्रिणीचा हात नाही, ती वळून पहाते. तिच्या मैत्रिणीचे यजमान तिच्याकडे पाहून हसत असतात. सकाळचे चार वाजलेले. मैत्रिण ड्यूटीसाठी लवकर उठून स्वयंपाकघरात लुडबुडत असते.

'मथू, फक्त one kiss, I love you.' मथुरा ताडकन उठते. त्यानं घेतलेलं जबरदस्तीचं चुंबन आजहि तिच्या ओठावर ठणक्यासारखं बसलं असतं. आणि त्यानंतरचे त्याचे शब्द. 'लग्न म्हणजे काय? लग्न केल्यानंच सुखी होणार आहेस काय? त्याशिवाय सुद्धा...' No, No, No' लग्न करायचेच नाही, मला खरोखरच ते सुख नको. मी माझ्या ताईंची मुलंच आपली समजणार आणि मथुरा नोकरीला लागली वयाच्या तिसाव्या वर्षी. इथे टेलिफोन ऑफीस निघालं आणि ती इथे कायमची चिकटली. मग फक्त नोकरी, बाजार, स्वयंपाकाचे बघणे. स्वतःला शरीर आहे हे ती विसरली. आणि तिच्या आयुष्यात 'ते' आले. बाबासाहेब. एक बडं प्रस्थं. सुशिक्षित जमीनदार. दोन मोटरी जवळ बाळगून असलेले. चार मुलांचे जाणते पालक.

मथूच्या डोळ्यासमोर ती आंबराई उभी राहिली. बाबासाहेब एका डेरेदार वृक्षाखाली उभे होते. पांढरे स्वच्छ धोतर आणि नेहरू शर्ट. भरदार शरीर. तिला एकदम वाटलं 'हा पुरुष आपल्यासाठीच जन्माला आला असावा.'

'आपल्यासाठी कसा? तो तर केव्हांच दुसरीचा झाला होता! तसं पाहिले तर बाबासाहेब तिचे दूरचे नातलग. पण तिच्या आयुष्यातच उशीरा आले.

एका हुरडापार्टीच्या निमित्ताने ती त्यांच्याकडे आली होती आणि मग त्यांच्या बंगल्यावर तिच्या नेहमीच चकरा होवू लागल्या. त्यांची पत्नी सुधा तिची मैत्रीण बनली. बाबासाहेब तिचे मित्र बनले. बोलणी, जेवणी, हसणे चर्चा हा बाबासाहेबांकडचा तिचा विरंगुळा. ते सुद्धा विवाहित होते. त्यांच्या मनात काय चुकचुकते हे तिला माहीत झाले होते. त्यांच्या मुलांवर ती मनापासून प्रेम करीत होती. त्यांच्या सहवासात रमत होती.

एक दिवस सुधा माहेरी गेल्यामुळे ती मुलांच्यासाठी म्हणून बाबासाहेबांकडे गेली. ते भलतेच खूषीत होते. तिच्या प्रत्येक गोष्टीचे कौतुक करीत होते. सुधा आपल्याला त्या बाबतीत सुखी करूं शकत नाही म्हणून आडपडद्याने सुचवित होते. मथुरा फुलत होती. सुखावत होती. रात्री ते दोघं जवळच्या ग्राउंडमध्ये फिरायला गेले. दोघंही धुंदफूंद होते. बाबासाहेब मात्र त्यातल्यात्यात जागरूक राहूनच तिला फुलवीत होते. पण मथुरेच्या समोर सुधा उभी रहायची, तिची मुलं उभी रहायची.

ती घरी आली ती एक प्रकारच्या निर्णायक अवस्थेत. सारी रात्र बाबासाहेबांनी प्रयत्न करूनहि तिने दाद दिली नाही. तिने शेवटी त्यांच्या खांद्यावर मान टाकून अश्रूपूर्ण स्वरात कबुली दिली 'मी तुम्हाला पती मानते. मला तुम्ही आवडता. पण मी माझं शरीर तुम्हाला कधीच देणार नाही. मला असंच..असंच.. राहू द्या.'

त्यानंतर वयाची पन्नाशी येईपर्यंत मथुरा तशीच राहिली. बाबासाहेबांनी अनेकदा प्रयत्न करूनहि तिनं त्यांना एका विशिष्ट अंतरावरच ठेवलं.

मथुरेच्या अंगावर बाबासाहेबांचे मागे लागणे आठवून आता सुद्धा रोमांच फुलले होते. मग आता बाबासाहेब तिचे झाले तरी सुद्धा ती का फुलत नाही? आता तिचे शरीर त्यांचे होते पण ती मात्र आक्रसली होती.

हो तिचा आणि बाबासाहेबांचा विवाह झाला होता. वयाच्या साठाव्या वर्षी पन्नाशीतल्या मथुरेशी त्यांनी लग्न केले होते. सुधा कसले तरी निमित्त होवून गेली. मुलं लग्न होवून मार्गाला लागलेली. आता लग्न करायला काय हरकत आहे?

मुलं म्हणाली, 'बाबांना म्हातारचळ लागला.' नातेवाईक म्हणाले, 'असं पाणी मुरत होतं तर! बरं झालं विचारी सुधा सुटली.'

तिच्या ऑफीसमधल्या मुली म्हणू लागल्या 'ह्या वोडनवरीला आता रंग सुचू लागलेत.' फक्त मधुरेनं मात्र काहीहि न बोलता म्हाताऱ्या नवरीचे हात आपल्या हातात बराच वेळ धरून ठेवले होते.

मथुरेला आता सुद्धा मधुरेच्याबद्दल विलक्षण आपलेपणा वाटू लागला. तिचा डोळा लागला. जाग आली तेव्हा मधु पायथ्याशी उभी राहून तिला म्हणत होती. 'आठ वाजले. मथुताई किती वेळ झोपलीस? तिकडे बाबासाहेब वाट पाहून थकले असतील. माझी ड्यूटी आटोपली. चल लवकर.'

मथुरा घाई घाईनं उठली. त्या दोघी घराकडे निघाल्या. 'मधुराणी मी एक्स्टेंशन नाकारणार आहे बघ. मला आता कंटाळा आलाय् नोकरीचा. उरलेले काही दिवस आम्ही शांततेत घालवणार आहोत.'

'कुठे? बाबासाहेबांच्या बंगल्यावर की त्यांच्या शेतीवर?' 'दोन्हीवरहि नाही. माझा हक्क नाही त्यांच्यावर, म्हणून तर मी माझे घर सोडले नाही. आम्ही आता तीर्थयात्रेला जायचं ठरवलं आहे. लग्नानंतरचा मधुचंद्र साजरा करायला.'

मधु हसून आपल्या वाटेनं लागली. मथुरा मात्र शांतपणे फुटपाथवरून चालत होती. एकटीच. 'बाबासाहेब माझ्यामध्ये का रमत नाहीत. मी तर त्यांना आता सर्वस्व दिले. की मीच त्यांच्यात रमत नाही?'

आणि तिच्या अंगावर सरसरून काटा आला. तिनं त्यांच्याशी रजिस्टर्ड पद्धतीने लग्न केल्यावर इतके दिवस बाबासाहेबांना जे हवं होतं, तिलाही जे हवं होतं पण ती देवू 'घेवू' शकत नव्हती, ते देण्याघेण्याची वेळ आली. पण त्यावेळी नुसता बर्फ झाला होता. ह्याच्यासाठी आपण एकत्र आलो का? No No No. It is Extention, मुदत संपल्यावरची संधी, कोणीतरी केलेले उपकार. आयुष्याची सेवा कारणी लागल्याची पावती.

आणि असेच पाच वर्ष गेले. बाबासाहेब आपल्या इस्टेटीतून मुक्त झाले नव्हते, पूर्वसंसारातून निवृत्त झाले नव्हते. सुधेच्या जागी मथुरेचे फक्त त्यांनी एक्स्टेन्शन जोडले होते. मथुरेनं तीर्थयात्रेला जाण्याच्या प्रस्तावावर ते फक्त हंसले होते. जीवाला झोंबणारं हसू.

ते हसणं आठवून मथुरा बेचैन होत होती. ती घरी आली. टेबलवर तिला बाबासाहेबांचं पत्र दिसलं. 'मी शेतीवर जात आहे. तिकडेच राहीन म्हणतो. माझं मन ह्या नवीन संसारात रमत नाही. पॅच दिलेल्या जीवनाला मला आपले म्हणता येत नाही. तूं माझीच आहेस. पण मी मात्र तुझा राहू शकत नाही. तीर्थयात्रेचा बेत पुढे कधी तरी. रागवू नकोस.'

दोनतीन दिवसाच्या रजेनंतर मथुरेनं रात्री बारा वाजता मधूला खो देत म्हटलं 'उठ आता माझी ड्यूटी सुरू आहे. एक्स्टेंशन मान्य केलंय् मी.'

राखण

रात रात जागलीची
दूर पाखरांचे थवे
पीक राखतांना उभे
कुणी सोबतीला हवे.
रोप रोप दुधाळले
वर चांदण्याची कोर

पीक बघता बघता
जीवा लागतसे घोर.
कोर ढगात बुडाली
मन भ्याले गारव्यात
डोकं टेकता उशास
झोप सलली डोळ्यात.

—रंजना बिगम

महदंबेचे धवळे

लता म. डोळके

महदंबा : आद्य मराठी कवयित्री

महदंबा, महदाइसा किंवा रूपाई, अशा नावांनी ओळखल्या जाणारी ही मराठीतील आद्य कवयित्री होय. महानुभावांचे आद्याचार्य नागदेव यांची ती चुलतबहीण. महदाइसा लहाणपणीच 'हातरिती' म्हणजे विधवा झाली आणि नागदेव सुरवातीला असाच चंगीभंगी निघाला त्यामुळे नागदेवाचार्याच्या आई-बरोबर महदाइसा विरक्त वृत्तीने रावसगावी गुंफा करून राहू लागली. पुढे हे सर्व कुटुंब चक्रधरांना अनुसरले व तेव्हापासून नागदेव व महदाइसा ही भावंडे प्रसिद्धीस आली. प्रथम चक्रधरांचे व नंतर श्रीगोविंदप्रभु व नागदेव यांचे निकट सान्निध्य महदाइसेस लाभले असून, ज्ञानेश्वरमंडळात जो मान मुक्ताईला तोच चक्रधरमंडळात महदंबेला होता असे दिसते. म्हाइंभटांना लीळाचरित्र रचण्याच्या कामात हिचा बराच उपयोग झाला असावा असे एकांकातील तिने सांगितलेल्या काही लीळांवरून दिसते. महदाइसा मोठी बुद्धिमान, अतिविरक्त व परमार्गमर्म जाणणारी असावी. 'लीळाचरित्रा'तील आत्मचरित्रपर भागाचे बरेचसे श्रेय हिच्याकडे जाते. ती जशी बुद्धिमान् अतिविरक्त तशीच जिज्ञासूहि होती. या जिज्ञासू वृत्तीमुळेच स्वामींनीच "म्हातारी जिज्ञासक : म्हातारी चर्चक: म्हातारी एथ काही पूसतचि असे" (उत्तरार्ध ४९१) असे उद्गार तिच्याविषयी काढले. चक्रधर हे नाव ऐकताच तिला अवर्णनीय आनंद होई. चक्रधरांच्या विरहाने उदास होऊन भानखेडचास निष्चेष्ट पडलेल्या नागदेवास हिनेच 'पाटकुळीस वाउनि' ऋद्धिपुरास आणले. बहिणीच्या या उपकाराची व मोठेपणाची नागदेवाचार्यांनाहि जाणीव होती. 'म्हातारी माझेया धर्मासि रक्षण गा' असा त्यांचा महदाइसेसंबंधी अभिप्राय आहे.

'धवळे' म्हणजे काय ?

'धवळा' हा एक गेय वृत्तप्रकार. त्यात एखाद्या पुरुषाची 'धवल' म्हणजे श्रेष्ठ याशी तुलना करून स्तुति केलेली असते. 'धवळे' म्हणजे लग्नसमारंभात म्हणावयाची वरविषयक गाणी. धवळयाचे वृत्त काहीसे अभंगाच्या स्वरूपाचे असून त्याच्या प्रत्येक कडव्याचे चार चरण आहेत. दोन दोन चरणांचे शेवटी यमक आहे. या वृत्ताला मात्रागणांचा किंवा अक्षरसंख्येचाही निर्बंध नाही. महदंबेच्या दृष्टीने कृष्ण हा श्रेष्ठतम, म्हणूनच 'धवळी गाईन गोविंदराणा' असे ती म्हणते. 'धवल' या वृत्ताची गेयता व कृष्णासारख्या श्रेष्ठ अवताराच्या जीवनातील आख्यायिका यांचा मिलाफ महदंबेच्या 'धवळया'त आढळतो.

'धवळया'ची निर्मिती

'आद्य मराठी कवयित्री' या नात्याने महदंबेचे ग्रंथकर्तृत्व प्रसिद्ध आहे. 'धवळे', 'मातृकी-रुक्मिणीस्वयंवर' ही प्रकरणे महदाइसेने लिहिलेली आहेत. मराठी आख्यानकवितेचा आरंभ एका स्त्रीकडून व्हावा व तोही 'धवळे' या विवक्षित प्रकाराच्या गीताने, ही घटना आख्यानकवितेच्या दृष्टीने मोठी अर्थपूर्ण आहे. कोणत्या प्रसंगाने महदंबेने 'धवळे' रचले याविषयीची माहिती 'ऋद्धिपुरचरित्र' नामक गद्यग्रंथात पुढीलप्रमाणे दिली आहे :—

महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर यांचे गुरु गोविंदप्रभू हे ऋद्धिपूर येथे राहात असत. गावात एकदा लग्नसमारंभाचा धूमधडाका चाललेला पाहून आपणही लग्न करावे असा विचार गोविंदप्रभूंच्या मनात आला, पण वृद्ध मनुष्यास आपली मुलगी कोण देतो ? शेवटी परमेश्वरनायक नावाचा मनुष्य आपली मुलगी देण्यास तयार झाला. वऱ्हाडाची सर्व सिद्धता झाल्यावर गोविंदप्रभु, महदंबेला म्हणाले "कृष्णरुक्मिणी गजरथतुरे" या थाटाचे एखादे गाणे म्हण. महदाइसा म्हणाली, 'मला कोठे गाणे रचता येते ? तेव्हा प्रभूंनी सांगितले, 'चक्रधराचे शिरी धरूनिया चरण' या शब्दांनी गाणे सुरू कर म्हणजे तुला काव्यस्फूर्ति होईल. मग तो चरण म्हणून महदंबेने गाणे सुरू करताच खरोखरच तिला काव्यस्फूर्ती झाली व तिने हे धवळे गाइले.

चार दिवसपर्यंत प्रभूंनी ते ऐकले व मग त्यांची विवाह-प्रवृत्ती भंगली. 'धवळचांच्या' पूर्वार्धातील 'चक्रधरांचे सिरी धरूनिया चरण' येथपासून 'लागला निरुता जीवी' येवढा भाग या प्रसंगी महदंबेने रचला व उरलेला भाग मागाहून पुरा केला. अशा प्रकारे एका विवाह प्रसंगाच्या कल्पनेतून 'धवळचांची' निर्मिती झाली.

'धवळचा'तील काव्यसौंदर्य

चक्रधरांनाही जिज्ञासक व चर्चक वाटणाऱ्या महदंबेत काव्यशक्ती उपजतच असावी. त्यामुळेच प्रसंगोपात्त व उत्स्फूर्तपणे "नागदेवाचेया खांद्यावरि : राजा चक्रधरू : बीजे करी:" अशा काही ओव्या तिने गायिलेल्या आढळतात. पण तिच्या काव्यशक्तीचा खरा प्रत्यय येतो तो तिच्या 'धवळचात'. 'धवळचां'चे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. पूर्वार्धात :– द्वारकेच्या भाटाकडून कृष्णाचे पवाडे ऐकून भीमकीच्या मनात त्याचे वेध लागल्यापासून तो श्रीकृष्णाने रुक्मिणीचे हरण करीपर्यंतचा वृत्तांत महदंबेने थोडक्यात पण अत्यंत प्रत्ययकारी वर्णिला आहे.

उपवर व सलक्षणीक कन्येच्या विवाहाची चिंता भीमकाच्या मनात निर्माण झाली असून 'ही कवणा देयावी' याविषयी रुक्मिणीचे माता, पिता व बंधु यांची बोलणी चालली आहेत. द्वारकेच्या नगाऱ्याकडून श्रीकृष्णाचे वर्णन ऐकल्यापासून त्याचेच ध्यान तिला लागले होते. पण 'गौळिया घरी कैसी रुक्मिणी दीजे' असा प्रश्न भीमकपुत्र रुक्मीला पडला असता आपल्या विवाहासंबंधी बोलणी चाललेली ऐकून

"रुक्मिणी पुसे सखियांसी वृत्तांतु
काइं वो बोलणे राउळगणातु
काइ बोले माता पिता काइ बोले तो रुक्मिया भाई :
शिशुपाळे वरिसी ऐसे बोलणे तयांचा वो ठाइं :"

रुक्मिणीच्या प्रश्नावर सख्यांचे हे उत्तर ऐकून रुक्मिणीची अवस्था 'श्रमु पावली नीन्हां जाली व्याकुळ :' अशी झाली. आणि मग तिने

"स्मरीले कृष्णरावो देवा संकष्टी पडलीय थोरी :
खदां धाक तिये लागली चींता :
भक्तबंधु छेदूनी राखै अनंता
आरतां दानी कृपा करा देवा मासी द्यावे उधरण :
शिशूपाळ–बंदीशाळ चुकवा दाखवा आपुले श्रीचरण :"

अशी कृष्णाची प्रार्थना केली. पण केवळ प्रार्थना करूनच ती थांबली नाही तर लगेच श्रीकृष्णाचे मन अनुकूल करून घेण्याच्या तयारीला लागली. रुक्मिणीने श्रीकृष्णास लिहिलेली पत्रिका घेऊन सुदेव ब्राह्मणाला श्रीकृष्णाकडे पाठविले. विप्र पत्रिका घेऊन द्वारकेला गेला तेव्हा त्याला कुठेही "आडकाठी नाही तीय द्वारी", मग त्याने थेट "देखियला कृष्ण यादवांचा राणा." तो कसा ? तर–

'उपविष्ट सिंहासनीं देव किन्नर बोळग करिती :
यादवी परिवारितु सहस्र कनकदंडे लक्षावरि ढळती :'

असा सर्व थाट पाहिल्यामुळे साहाजिकच "सभा देखोनिया" विप्राच्या मनात 'बहु उछावो' निर्माण झाल्यास आश्चर्य काय ? श्रीकृष्णाला पाहाताच सुदेव ब्राह्मणाने 'घातले लोटांगणी,' आणि देवाने दर्शन दिल्यामुळे 'श्री (शिरी) धरियले चरण:' देवाने देखील 'दिव्यासन घालुनिया विप्रासि करविली पूजा' याप्रमाणे सुदेव–श्रीकृष्ण भेट झाल्यावर सुदेव आपल्या प्रमुख हेतुसिद्धयर्थ रुक्मिणीच्या सौंदर्याचे वर्णन करतो.

"भीमक कुमरी सुंदर रुक्मिणी लावण्यरासी :
त्रैलोक्यमोहिनी तीया विनती पाठवीली तुम्हासी :
स्वामी जगन्नाथु भक्ता कैवारी :
शरणागतांचा वेळाश्तु तरि बीजे करावे मुरारी: "

रुक्मिणी 'लावण्यरासी' आहे; 'त्रैलोक्यमोहिनी' आहे; सकळकळा कुशल आहे. तिने आपल्या रूपाने 'जिंतिले त्रीभुवन सकळ' पण तिच्याकरिता भीमकाने 'पाहियला शीशुपाळु वरु तयाचे नाव न साहे ते कुमरी'. इतरांचा विचारच तिला सहन होत नाही. तिने मनाने तुम्हालाच 'वरिलेति'. रुक्मिणीने तुमचाच ध्यास घेतला आहे. या संकटातून आपणच तिला सोडवू शकता. विवाहाचा दिवस जवळ येऊन ठेपला आहे. आपण तिचे पाणीग्रहण करावे. हे सुदेव ब्राह्मणाचे वचन 'मानवले जगन्नाथु:' श्रीकृष्णाने तावडतोब दारुकास रथ सज्ज करण्याचा हुकूम दिला. आणि "कन्हणा नेणता नेणता देवो चाले कौंडण्यपुरा वेगवतरू :" द्वारकेत कुणालाही या गोष्टीचा सुगावा न लागता कृष्ण कौंडण्यपुरात येऊन पोचले.

कौंडण्यपुरात श्रीकृष्णाने प्रवेश करताच रुक्मिणीने दुरूनच 'सौंदरु श्रीकृष्ण देखियला झळकता' तेव्हा तिचे चित्त कृष्णाकडे इतके आकर्षित झाले की देहभान

विसरून " माडीवरुनिया घालू पाहे झेप " अशी तिची अवस्था झाली. प्रत्यक्ष 'रुसीकेसा'नी आपल्या नगरीला भेट दिल्याबद्दल भीमकाची अवस्था देखील 'आनंदे आसुवे कांही न देखवे लोचनीः' अशी झाली. त्याने श्रीकृष्णाला योग्य तो पाहुणचार केला.

श्रीकृष्णाला रुखवत देऊन जेव्हा रुक्मिणीच्या सख्या परत आल्या तेव्हा कृष्णाच्या रूपगुणांची रुक्मिणीने चौकशी करताच,

" रुक्मिणीपुढां बाळा सांगती वृत्तांतु :
सर्वांगी ने देखो तुमचा वो कांतु :
देखियले जे आंग तेथौनि न ढळतीचि लोचन : "

असे अत्यंत समर्पक उत्तर दिले. सख्यांनी दिलेले हे उत्तर अत्यंत बारीकसारीक छटांनी महदंबेने व्यक्त केले आहे. श्रीकृष्ण किती सुंदर आहे हे शब्दांनी वर्णन करून सांगता येणार नाही. ज्या क्षणी त्याला आम्ही पाहिले त्याच क्षणी आम्ही प्रेमवेड्या झालो. तुझ्या नवऱ्याचे सर्वांगीण दर्शन आम्हाला झालेच नाही. परंतु त्याच्या दर्शनाचा सकृतदर्शनीच भाग आमच्या अवलोकनात आला. तो इतका सुंदर होता की त्यावरच आमची दृष्टी सारखी खिळून राहिली. आणि अशी अवस्था झाल्यामुळे आपल्यालाही प्रेमपिसे लागले. असे त्या प्रांजळपणे कबूल करतात; पण लगेच कृष्णसौंदर्य वर्णनामुळे आपण कृष्णावर आसक्त झालो अशी शंका रुक्मिणीस येईल. त्याकरिता तिची शंका दूर करण्यासाठी " तुझा पती आम्हां पिता दुजा नाठवे विचारुः" तुझा पती आम्हाला पितृस्थानी आहे; त्याच्याविषयी दुसरी कोणतीहि भावना आमच्या मनात नाही असे स्पष्टीकरण देतात. सर्वसामान्य स्त्रीस्वभावाची छटा महदंबेने मोठ्या कुशलतेने येथे व्यक्त केली आहे.

शिशुपाळाला रुक्मिणी देण्याचे ठरल्यावर विवाहपूर्वविधी होऊन आपला नवस फेडण्यासाठी रुक्मिणी अंबेच्या देवालयात जाण्यास निघाली तेव्हा

" आंगवळे सवे बहुत दळभारु :
तव तियासवे भाट पढती कैवाडु :
वाद्यंत्रे सुडाविली तव विप्र दावी खुणा : "

अशा थाटात ती देवालयात येऊन पोचली. अंबिकेची यथासांग मनोभावे पूजा केल्यावर " तू मज वेगी मेळवी यादवराजा " असा वर तिने मागितला. अंबिकेनी तिची ही विनंती लगेच मान्य केली कारण,

" सावळा कमळनयन देवो पाहे पां लावण्य सिंधु :
तव तीया रुक्मिणी दोन्ही करी जोहारिले गोविंदु :
हंसगति चाले बाळा :
आनंदे आंसुवें कांही नेदखेचि डोळा :
कंपित सासंकित अंगी रोम स्वेद लल्लाटी :
तव तिया रुक्मिणी यादवरावो श्रीकृष्णु देखिला थाटी :"

श्रीकृष्णाला पाहाताच तिच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. त्यामुळे समोरचे काही दिसेनासे झाले. अंगावर रोमांच उभे राहिले. अशा अवस्थेतच 'वेगक्तर पातले मुरारी :' आणि त्यांनी भीमकाच्या कुमरीला रथावर घेतले.

अशा प्रकारे द्वारकेच्या दूताकडून कृष्णाचे पवाडे ऐकून भीमकीच्या मनात त्याचे वेध निर्माण होतात. पुढे कृष्णरुक्मिणीचा विवाह यथासांग होईपर्यंतचा वृत्तांत महदंबेने थोडक्यात पण अत्यंत परिणामकारकतेने वर्णिला आहे. कृष्ण रुक्मिणी हे अवतारी पुरुष असले तरी एकंदर कथानकात व स्वभावरेखाटनात दैवी गुणांपेक्षा मानवीपणालाच महत्त्व दिले आहे.

कृष्णाकडे ब्राह्मणाला पाठविण्यातील रुक्मिणीचा उतावळा स्वभाव, लांबून येत असलेल्या कृष्णाला पाहाताच माडीवरून झेप घेऊ पाहाण्याइतका तिचा उडालेला संभ्रम, सख्यांकडून कृष्णाचे रूप-गुण जाणून घेण्याची तिची उत्कंठा या सर्व प्रसंगात रुक्मिणीचे चित्र अत्यंत जिवंत वाटते.

रुक्मिणीच्या व्यक्तिरेखेबरोबरच, तिच्याबरोबरच थट्टामस्करी करणाऱ्या तिच्या सख्या आहेत; तिच्या इच्छेप्रमाणे कृष्णाला बोलावून आणणारा व रुक्मिणीचे हरण कसे व कोठे करावे हा सल्ला कृष्णाला देणारा सुदेव ब्राह्मण आहे; सर्व पाहुण्यांचे स्वागत करणारा व कृष्ण आल्याचे ऐकून आनंदित होणारा वधूपिता भीमक आहे; तसेच " तुझा पती गोळी आहे ग बाई " अशी थट्टा करणारा नारदही आहे. कृष्णाबरोबर यादवांची प्रभावळहि यात साकार होते. याशिवाय रुक्मि, शिशुपाळ, या इतर व्यक्तिरेखाही बारीक सारीक छटांनी व्यक्त झाल्या आहेत.

'धवळ्या'त व्यक्ति जशा अनेक आहेत तसेच प्रसंगही अनेक आहेत. पण त्या साऱ्यांना एका समर्थ सूत्रात एकसंधपणे गोवले आहे. त्यात कुठेही विस्कळित-

पणा नाही. सारे एकजीव झाले आहे. 'धवळचा 'च्या पूर्वार्धातील ८३ श्लोकात असे कौटुंबिक वातावरण आहे, तर उत्तरार्धात शिशुपाल – जरासंध यांच्याशी कृष्णबलरामाचे युद्ध, रुक्मीची कृष्णाने केलेली फजिती, आणि यानंतर मूळ धाडण्यापासून वरातीपर्यंतचा यथासांग पार पडलेला विवाहविधी या सर्व प्रसंगाचे ६५ श्लोकात मोजक्या शब्दात पण मोठे ठसठशीत चित्रण केले आहे.

'धवळचा 'तील समाजदर्शन

महदंबेचे चरित्र व तिचे 'धवळे' यांवरून तत्कालीन समाजस्थितीची माहिती मिळते. गोविंदप्रभूचा निधनशक शके १२०८ हा निश्चित असल्याने धवळयाच्या पूर्वार्धाची रचना १२०८ च्या पूर्वी झाली असावी. त्यावेळी म्हणजे शके १२०० ते १२३४ च्या सुमारास ऋद्धिपूरच्या बाजूस निशाण, टाळ, शंख, तुरे, इत्यादी वाद्यांचा उपयोग समारंभात केला जात असे. घोडे, पालख्या, अंबाऱ्या ही वाहने होती. तंबूही होते. मंडलीक, भांडारी वगैरे अधिकारी असत. राजेलोक शरीररक्षक बाळगीत त्यांना 'आंगवळे' म्हणत. सोन्याचा भाव पंधरा रुपये तोळा होता. कडी, साखळया, कुंडले, तोडे हे पुरुषाचे व कंकणे, चाळ, रत्नहार इत्यादी स्त्रियांचे अलंकार होते. लग्नात औक्षण करणे, तैलमर्दन करणे, न्हान करणे, रुखवत देणे, वरास बाशिंग बांधणे, वराने मंडपप्रवेश करिताच त्याला वधूमाय व वरमाय यांनी ओवाळणे, नृत्यांगनांचे नृत्य करविणे इत्यादी चाली रूढ होत्या. अंगास चंदनाची उटी व कपाळावर कस्तुरीचा टिळा लावीत.

धवळयातील भाषाविशेष

महदंबेच्या 'धवळचा 'ची भाषा जुनी परंतु फार साधी असून त्यात उपमाउत्प्रेक्षादी अलंकारांचा अभावच आहे. परंतु "साधे वर्णन, साधी भाषा व साधे विचार–विकार असूनहि एखादे काव्य हृदयंगम कसे होते याचा 'धवळे' हा उत्कृष्ट आदर्शच म्हटला पाहिजे. गतिशीलता हा देखील त्याचा एक गुण म्हणून सांगता येईल. त्यामुळे या काव्यात एक प्रकारचे प्रवाहित्व आले आहे" असा अभिप्राय वा. ना. देशपांडे यांनी दिला आहे. ही प्रवाहिता येण्याचे कारण कवयित्रीचे शीघ्र कवित्व होय. गोविंदप्रभूसारख्या अलौकिक वराच्या लग्नाचा प्रसंग, आणि त्या प्रसंगी गाणे म्हणण्याचा खुद्द त्या वरानेच केलेला आग्रह यामुळे अकस्मात काव्यस्फूर्ति होऊन महदंबेकडून तेथल्या तेथे जे काव्य रचल्या गेले ते ओघवान असावे यात आश्चर्य नाही. महदंबेच्या ठिकाणी जन्मजात कवित्वाचा गुण असावा पण वयपरत्वे तिच्या ठिकाणची काव्यस्फूर्ति कमी झाली असावी अन्यथा म्हाइंभटानी धवळयाचा उत्तरार्ध लिहिण्याचा आग्रह केला तेव्हा तिने "आता मज काइ करवेल? तें गोसावीयें स्फूर्ति दिधली म्हणौनि स्फुरले : आता मज काइ स्फुरेना:" असे उत्तर दिले नसते. पण आता मला स्फूर्ति होत नाही असे ती म्हणते तेव्हा म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट म्हणाले आम्ही शब्द घडवून देऊ, तुम्ही गा त्याप्रमाणे धवळयाचा उत्तरार्ध तयार झाला.

आध्यात्मिकता हा 'धवळचा 'चा प्रेरक घटक

भक्ती हाच महदंबेच्या 'धवळया 'चा मूलाधार होता. गोविंदप्रभूच्या आज्ञेने 'धवळचा 'चे स्फुरण झाले असले तरी "पाविजे परमागति भक्ती आइकता कृष्णचरित्र" अशीच तिची धारणा होती. कृष्णचरित्राचे यातील विवक्षित प्रसंगांचे रसाळ वर्णन करावयाचे ते केवळ एक मुक्तीचे साधन म्हणून. महदंबाही नरींद्र–भास्कराप्रमाणे संस्कृतज्ञ नव्हती त्यामुळे तिच्यापुढे संस्कृत कवीचे व त्यांच्या काव्याचे आदर्शही नव्हते. 'धवळया 'चा उत्तरार्ध माहिंभट व लक्ष्मीधरभट यांच्या आग्रहाने व मदतीने पुरा झाला तो बहुधा यामुळेच.

धवळयातील आध्यात्मिकता कथाकथनात, नायक – नायिका म्हणून निवडलेल्या आराध्यदैवताच्या वर्णनात व तत्संबंधीच्या प्रसंगचित्रणात नको तितकी डोकावते असे क्वचित वाटते. कृष्णाचे वर्णन करतांना त्याला 'कैवल्याचा पुतळा' म्हणून संबोधते. रुक्मिणी ही कृष्णावर अनुरक्त झालेली पण ब्राह्मणाकरवी त्याला निरोप धाडतांना कृष्णाच्या भक्तवत्सल ब्रीदाची आठवण देते. इतकेच करून थांबत नाही तर गुप्तपणे केलेल्या पाहुणेरानंतर विद्याधरी जेव्हा उच्छीटाचे परिमळ रुक्मिणीपुढे आणतात तेव्हा ती त्याला साष्टांग नमस्कार घालते; कृष्णरायाचे उच्छिष्ट ब्रह्मादिकांनाही दुर्लभ आहे असे म्हणते आणि सख्यांना घेऊन प्रेमसंतोषाने ते भक्षण करते. कवयित्रीच्या मनातील भक्तिभावनेमुळे कथेचा तोल असा क्वचित बिघडत असला तरी रुक्मिणीची व्यक्तिरेखा सहजसुंदर उतरली आहे. 'धवळया-'तील आध्यात्मिकता ही भक्तिभावनेतून निर्माण झाली आहे. साधेपणा हाच 'धवळया 'चा गुण आहे.

धवळयाच्या उत्तरार्धाचे पूर्ण श्रेय जरी महदंबेला देता आले नाही तरी केवळ पूर्वार्धाचा विचार केला तरी आख्यानकवितेचा एक नवीन आदर्श महदंबेने निर्माण केला यात शंका नाही.

□□□

दहा दिवस–काटेरी आणि सोनेरी

मालती दामले

"अहो, बाहेर या. पत्र आलंय् संजयचं"

"अगबाई, हो का. काय म्हणतोय ?"

"सूनबाई न् तो चिखलदऱ्याला जाणार आहेत दहा दिवसाकरता. बरीच मित्रमंडळी जाणारेत. पिंटूला इथं ठेवणारेत, लिहिलंय् त्याला बरोबर नेला तर– "

"बरोबरच्चे, नाइ म्हटलं तरी पाय अडतो हो लहान पोरामुळे."

"आपल्यालाही बरं. तेवढेच दहा दिवस मजेत जातील."

मनूताई न तात्या लेकाची, सून-नातवाची वाट पहात राहिले.

दुसऱ्या दिवशी सक्काळी सक्काळीच संजयची गाडी आली. आईला आवडणारी मिठाई, तात्यांसाठी चिकणी सुपारी, फळाची मोठी करंडी बरोबर होती. मनूताई, तात्या लेकसुनेचं अगत्य पाहून सुखावले. त्या दुपारभर मग चिक्कार गप्पा, हसणं खिदळणं, खाणं अशी धामधूम राहिली. सूनबाईनं रीत म्हणून मनूताईना म्हटलं, "तुम्ही पण दोघं चलाना. सगळेच जाऊ."

पण समंजस मनूताई उत्तरल्या, "अग, तुम्ही सगळी तरुण मंडळी, आम्ही कशाला खिरीत खटारा ? तुम्हीच जा, मजा करा, आम्ही आपले पिंटूशी खेळू." दुपारी संजय–सूनबाई परत गेले. तीन वर्षाचा पिंटू आजीआजोबांचं कौतुक झेलायला मागे राहिला.

आजी-आजोबा नातवाची भेट तीनचार महिन्यानी आठदहा दिवसाकरता व्हायची. त्यामुळं दोघांनाही पिंटूला कुठे ठेवू न् कुठे नकोसं झालं,

पण लौकरच पिंटूचा हिसका त्यांना कळला. त्यानं या अगदी वेगळ्या वाटणाऱ्या घरात प्रचंड उलथापालथ करायला सुरवात केली. कुठल्या क्षणी तो काय फोडेल, काय फाडेल, काय उधळेल, काय भिरकावेल याचा नेमच राहिला नाही. जे ते उचलून ठेवता ठेवता मनूताई इतक्या दमल्या, शेवटी त्यांना वाटायला लागलं –आपणच आता कौलांवर जाऊन बसाव न् पिंटूला सांगावं, "घाल बाबा आता हवा तो धिंगाणा !"

एकदा आजोबा उत्साहानं पिंटूसाठी खाऊ आणायला बाहेर निघाले. तो अर्थातच बरोबर होता. बिस्किटाचे पुडे, सुका मेवा वगैरे खरेदी सावकाशीनं चालली होती. खरेदी आटोपली न् आजोबांच्या लक्षात आलं, पिंटू शेजारी नाही. लहान मूल बरोबर असण्याची सवय नसल्यामुळं आजोबांचं अवधान मधेच सुटलं होतं. त्यांच्या तोंडचं पाणी पळालं. बिचारे धावपळ करत पिंटूला शोधू लागले दुकानभर पाहिलं. मग रस्त्यात धावले. मनात नाहीनाही त्या कुशंका. पिंटूचा लाल मॅनिला लांबवर दिसला म्हणून तात्यानी तिकडे धाव घेतली तर तो एका पोरीचा स्कर्ट निघाला. पुन्हा एका दुकानात लाल, तात्या घुसणार तेवढ्यात लक्षात आलं, ती शोकेसमधल्या बाईची साडी ! 'चष्मा बदलायला झालाय्' म्हणत तात्यांची पुन्हा पायपीट. शेवटी एका झाडाखाली असलेल्या कुत्र्याच्या पिल्लाशी खेळताना पिंटू दिसला. आजोबांनी झडप घालून त्याला पकडला. घरी आले न् निश्चय केला, बाहेर गेल्यावर क्षणभरही पिंटूचा हात सोडायचा नाही.

पिंटूला भटकायचा भयंकरच नाद होता. आजी देवळात निघाली की पिंटू निघाला बरोबर. आजोबा लायब्ररीत, भाजी आणायला निघाले की हा धावलाच. 'मी पन येनाल' हे पालुपदच न् दरवेळी कपडे बदलायचे. संजयच्या सुसज्ज ब्लॉकमधे संडासात कमोडची सुद्धा सोय होती. पिंटूला 'शी'चा काहीच त्रास नसायचा. आजोबांच्या या जुन्या घरात पंचाईत आली. संडास जुन्या पद्धतीचे, खूप दूर. त्यामुळे नाइलाजानं पिंटूला घरातच कागदावर बसवावं लागे. सुरवातीला त्यानं थयथयाट केला पण मग बसायला लागला. तीन चार दिवसानंतर पिंटूचा प्रातर्विधी उरकला. बाहेर

बराच पाऊस पडत होता. आजी पोळ्या करत होत्या, त्या आजोबांना म्हणाल्या.

"अहो, जरा तो पिंटूचा कागद टाकून या ना बाहेर."

आजोबा वैतागले, "हं, आता या पावसात काढा आमची वरात."

पिंटू ओरडला, "मी पण येनाल आजोबा वलातीला" न् कपडे आणायसाठी बॅगकडे धावला. आजोबा राग आवरून हसत सुटले.

आजींचे पावसामुळे सांधे धरले होते. उठतावसतां 'आई ग' चाललं होतं. आजोबांनी विचारलं, "का, काय झालं?"

"वय! दुसरं काय?" आजींचं संथ उत्तर.

पिंटूला घरी आईचा थोडा तरी धाक होता पण इथ आजी–आजोबा आपल्या तालावर हालतात डोलतात हे त्याच्या चाणाक्ष मेंदूनं चटकन् हेरलं. 'भूक लागली' चा सतत गजर! प्रत्येक वेळी वेगळा खाऊ हवा. आजींनी त्याच्यासाठी लाडू, चिवडा, चकल्या करून ठेवलं. जेवताना दूध-पोळी कुस्करून आवडत असे. आज दूध किती कमी घातलंस – म्हणून पिंट्या वाटी ढकलून द्यायचा. मग दुसऱ्या दिवशी आठवणीनं दूध जास्त घालावं तर–केवल्हं दूध घालून ठेवलं–म्हणत पिंटू धाडदिशी अंग टाकायचा. एकदा मनूताईनी त्याला चकली दिली. पण त्यांच्या हातात देतादेता मधेच खाली पडली. झालं, पिंटोबाचा मूड गेला. त्यानं भोकाड पसरलं. सुग्रण मनूताईंच्या खुसखुशीत चकलीचे खाली पडताच दोनतीन तुकडे झाले. त्यांनी मग दुसरी मोठी शोधून चकली देऊ केली. पण पिंटू घेईना. तीच पडलेली चकली जोडून हवी; पूर्वीसारखी पूर्ण वर्तुळ अशी, तुकडे नाय चालणार; असा हटवाद. मनूताई अगदी रडकुंडीला आल्या. आजोबांनी मग बाहेर नेला तेव्हा कुठं शांत झाला.

आजीना जरा कुठं स्वस्थपणा मिळाला की तो दणकन् त्यांच्या मांडीवर बसायचा न् फर्माइश – गोत्त तांगतीस?–ती ऑर्डरच असायची. आजींना सवय कुठली गोष्ट सांगायची? त्यांची अवस्था केविलवाणी व्हायची. कशीबशी जुळवून गोष्टीला सुरवात करावी तर पिंटूला कथनाबरोबर आजीच्या अॅक्शनसही हव्या असायच्या. 'वाघ' म्हटलं तर वाघासारखा आवाज काढला पायजे. आजी हैराण व्हायच्या. पिंट्याच्या काहीच मनाला यायचं नाही मग त्यांना ढकलून उठत तो म्हणायचा, "वग तुला काइ शुद्धा येत नाइ."

एका दुपारी आजीना विश्रांती मिळावी म्हणून आजोबा पिंटूला घेऊन जवळच्या शाळेत गेले. या शाळेचे ते पाच वर्ष हेडमास्तर होते न याच वर्षी रिटायर्ड झाले होते. शाळेत जाताच नेहमीच्या शिक्षकांची थंड रिॲक्शन पाहून त्यांना जरा खंत वाटली. पण मग त्यांनी विचार केला की ही जगाची रीतच आहे. अधिकारावरच्या माणसाची अवस्था डोक्यावरच्या केसांसारखी आहे. केस डोक्यावर असतात तोंवर आपण त्यावरून किती प्रेमानं हात फिरवतो. तेच स्थानभ्रष्ट झाले की हातात धरवत नाहीत अशी किळस. तीच अवस्था...

तात्या शाळेचा फेरफटका मारत होते. बोट धरलेला पिंटू कुतुहलानं पाहात बरोबर चालला होता. तात्यांना मान देणारे काही शिक्षक होतेच.

सप्रे सरांचा मराठीचा तास चालू होता. तात्या त्या वर्गाबाहेर उभे राहिले. सरांनी मुलांना वाक्यात उपयोग करण्यासाठी काही शब्द–म्हणी दिले होते. आणि त्यांची उत्तरे तोंडीच विचारीत होते.

"हं, अथांग शब्द वाक्यात वापरा, काणे तू!"

"त्या डबक्याचे पाणी अथांग होते."

"ए मूर्खा, अथांग म्हणजे दृष्टी पोचत नाही तिथपर्यंत असा आहे. समुद्राच्या पाण्याला वापरता येईल तो शब्द. म्हणे डबकं अथांग. बैस खाली."

"आता लेकरे शब्द, तू सांग रे"

"रामू चांभाराला बारा लेकरे होती"

"बाऽप रे बारा?" सप्रे सर चटकन् खालीच बसले. जणू त्यांच्याच बायकोला एका खेपेला एकदम बारा लेकरे झाली न् त्याबद्दल 'बाई' नी त्यांना मरेपर्यंत फाशीची शिक्षा ठोठावली.

"अरे, बारा काय करायची? दोन सांगितलंस तर काय पाप लागेल होय रे? आता 'आयत्या पिठावर रेघोट्या ओढणे'चा वाक्यात उपयोग. तू पाटील."

"आमच्या गड्याने चक्कीतून आणलेल्या आयत्या पिठावर मी रेघोट्या ओढल्या."

सरांनी रागानं पाटीलच्या अंगावर हातातल्या खडूचा तुकडा फेकला. तेवढ्यात त्यांचं लक्ष तात्यांकडे गेलं. सरांनी आदरानं नमस्कार करून तात्यांना आत

बोलावलं. तात्या हाडाचे शिक्षकच. सगळी मुलंही माहितीतली. त्यांनी हसत विचारलं, "व्याकरण कितपत शिकवलंय् ? अव्यय म्हणजे काय, किबे ?"

"सर अवयव म्हणजे हात, पाय."

"हुंऽऽ बसा, बसा खाली."

तेवढ्यात शेजारच्या क्लासमधे एकदम हलकल्लोळ न् धाडधाड आवाज कानावर आले. थोडा वेळ काय चाललंय् तेच कळेना. मग तात्या आणि सप्रेसरांनी जाऊन पाहिलं तर वर्गातली मुलं दप्तरं जागेवरच टाकून खिडकीतून उडी मारून धूम पळत सुटलीत. त्या वर्गाचे देसाईसर प्यूनजवळची नोटीस वाचता वाचता भांबावून, "अरे झालं काय ? काय झालं ?" असं विचारत होते. उत्तर द्यायला कोणी थांबेचना. जो तो पळतोय् जीव घेऊन.

सप्रेसरांनी धावत जाऊन शेवटच्या दोन पोरांना वखोटया धरून पकडलं. जोरदार धपाटा घालून पळायचं कारण विचारलं. एकानं रडवेल्या सुरात खुलासा केला, "सर, कॉलऱ्याचं इंजेक्शनवाले डॉक्टर आले म्हणून आम्ही"

"अरे, पण सांगितलं कुणी ? कुठेत डॉक्टर ?"

"ही काय नोटीस आलीय्."

"ए गधड्या, ही नोटीस उद्याच्या सुटीची आहे. काय कार्टी तरी आहेत"..असं चरफडत देसाई सरांनी आपल्या पहाडी आवाजात मुलांना परत बोलावलं.

तात्यांचा हात धरलेला पिंटू स्वस्थपणे सगळी मजा पाहात होता. मधेच खाली बसून सप्रेसरांनी दिलेल्या खडूनं जमिनीवर माऊचं चित्र काढत होता.

एकंदरीतच पिंटूचं आजोबांशी जास्त जमायचं. आजीसारखे ते पटकन् चिडत नसत. शक्य तो त्याच्या कलानं घेत. त्यांच्या घरासमोरच एक नवं घर बांधण्याचं काम चाललं होतं. कामवाल्या बायकांपैकी एकीचा पिंटूच्या वयाचाच मुलगा होता. साहजीक पिंटू त्याच्याशी खेळायचा. आजींना फार राग यायचा. "अहो, पिंट्याला आडवा ना ! कसा बघा घाणीत खेळतोय्. ते पोरगं दुसरं"...आजोबा दुर्लक्ष करायचे. "असू द्या हो, वयच आहे त्याचं मातीत खेळायचं. आणि दुसरं कुणी आहे का त्याला खेळायला ? खेळला त्या पोराशी, काय बिघडतं ?" पिंट्या त्या पोराला अनेकदा पिटून काढायचा. एकदा असाच त्याला पाडून, पळत आला न् तक्रार, "अओ आजोबा. तो बगा ना कित्ती बोबलं बोलतो. यामाच्या देवयात म्हणतो. मी शाल्क शाल्क शांगतोय्, लामाच्या देवलात अशं पष्ट बोल तल आपलं दलवेली यामाच्या देवयात – मग मी ढकल्ला त्याला."

ते पोर बिचारं बहुतेकवेळा उघडंवाघडंच फिरायचं. त्याच्यामुळे पिंटूलाही कपडे म्हणजे अडगळ वाटायला लागली. इलॅस्टिक घातलेल्या चड्डया तर तो चुटकीसरशी काढून टाकायचा पण मॅनिलाही वाटेल ती धडपड करून भिरकावून द्यायचा. ते पुन्हा चढवताना त्याची न् आजीची शिवाशिवी चालायची.

एका निवांत दुपारी दमलेल्या आजी आजोबांच्या भरवशावर स्वस्थपणी आडव्या झाल्या होत्या. झोपेतून त्या जाग्या झाल्या न् – 'अगबाई हे कोण समोर' अभावितपणे मोठी किंकाळी त्यांच्या तोंडून बाहेर पडली. आजोबा व्हारांड्यात आरामखुर्चीत पेपर वाचत होते, ते दचकून उठले न धाईनं आत आले. "काय झालं हो, का ओरडलात ?" म्हणता म्हणता त्यांचं लक्ष समोर गेलं.

मागच्या दारी...कोण हे, माकड की...तेवढ्यात त्या प्राण्याच्या तोंडून, "आज्योबा" हाक आली न् आजोबांच्या हातातला पेपर गळून पडला.

पिंट्यानं, आजोबांनी अगदी आडबाजूला म्हणून ठेवलेला डांबराचा डबा कसा कोण जाणे, हस्तगत केला होता न् अंगभर, तोंडभर दोन्ही दोन्ही हातानी डांबर फासून ठेवले होतं. आता त्याला साफ करायचा, या कल्पनेनंच आजींचा धीर गळला. त्यांना अगदी मोठ्ठा गळाच काढावासा वाटला. बिचाऱ्या उठल्या. रॉकेल, चिंध्या घेऊन साफ करायला लागल्या. पिट्याची मधून-मधून चुळबूळ न् बडबड चालली-होती. हिसकाहिसकी, "किती ज्योलात पुशतीश" म्हणून कांगावाही होताच. अर्ध्यातच आजींची ताकद संपली.

"अरे देवा, कधी संपणार हे ? आता करू तरी काय ?"

"करताच आहात की !

"काय ?"

"कटकट !"

"पुरे झालं मेलं. दुरून दुरून चेष्टा बरी सुचते तुम्हाला" आजी कावल्या न् त्यातली गर्भित सूचना

लक्षात घेऊन आजोबांनी हसत पिटूचा तावा घेतला. नंतर दोनतीन दिवस पिटघाच्या अंगाचा रॉकेल न् डांबराचा वास जाणवत होता. बघता बघता आठवडा गेला. दिवस पाखरासारखे मजेत भुर्रकन् जात होते.

आजोबानी आणलेली भाजी टोपलीत ठेवत आजी म्हणाल्या, "गाजरं बरीच आणलीत. काय करायचं इतक्या गाजरांचं ?"

"पुंगी !

"पुरे मेलं. धड कधी बोलणंच नाइ."

"अग, कोशिंबीर कर – नाहीतर हलवा कर. पिटूला आवडेल. उद्या जायचा तो."

"अगबाई, खरंच की हो ! कुठल्याकुठं गेले आठ-नऊ दिवस." म्हणताम्हणता मनूताईंचा आवाज कापरा झाला. डोळे भरून आले. पिटूच्या असंख्य खोड्या त्या क्षणात विसरल्या.

दोन वयस्क जीवांना नेहमीच गिळून टाकणारा एकलेपणा त्यांच्या अंगावर दाही दिशांनी जणू चाल करून आला. ओंजळीत तोंड लपवत त्या असहाय मुक्त-पणे रडू लागल्या.

भावभक्तीची परंपरा

पाय चेपतां चेपता
भिरकाविली वीट
म्हणे – उभा राहा नीट
असा पुंडलिक धीट ।
भीवरेच्या प्रांगणांत
दिंड्या पताकांचा गजर
त्याच्याच भक्तिरसाचा प्रवाह
वाहतो आहे अखंडित ।
झाली अठ्ठावीस युगे
ब्रह्म भाबडे नाही हालले
रुक्मिणीस शेजारी आणले
धन्य धन्य ते भक्त !!

—नलिनी वि. पाध्ये

दरड

त्या दूर स्वप्नांच्या दरडीवर
तो झिंग होऊन बसलाय
धरती, आकाशाचे अंतर विसरून
आभाळात डोळे रुतवून बसलाय.
जमिनीवरच पाय रोवून
हात मात्र उंचावतोय
आकाशाला भिडावेत म्हणून
पण, क्षितिजापलीकडल्या पोकळीत
हरवलेल्या,त्याला तरी काय ठाऊक असणार
आता पुन: एकदा पापणी लवताच,
ती तिथेच दिसेल – श्रांत, विश्रांत
पण, ती विश्वासाने पाय ठेवलेली—
दरड मात्र कोसळलेली असेल.

—नीता शाह

‘उरलं ते गंगाजळ’

सुशीला वाडीकर

उमा कुळकर्णी म्हणजे एक गोड हसतमुख मुलगी होती. वर्ण सावळाच होता. सौंदर्याच्या कोणत्याच देणगीची वारेमाप उधळपट्टी निसर्गाने उमाला बहाल केली नव्हती. पण बांधा आगळाच होता. उमाने ऑफीसमध्ये पाऊल ठेवले की सर्वांच्या नजरा तिच्यावर रोखल्या जावयाच्या. पण ती मात्र खाली बघून आपल्या टेबलाकडे जात असे.

वास्तविक उमाला नोकरीची आवश्यकता नव्हती. नुकतीच एम्. ए. झाली होती. वडील कुठल्यातरी मोठ्या फर्म मध्ये ऑफीसर होते. बंगला होता; गाडी होती. वडील लग्नाचं पहात होते, पण जमल्याशिवाय ते तरी काय करणार? वर्तमानपत्रांत जाहिरात दिसली. सहज अर्ज केला. अन् नोकरी मिळून गेली. वडिलही म्हणाले, ‘कर, करावयाची असेल तुला तर.’

उमा कामावर हजर झाली. वेळेवर कामावर जावयाचं, असेल ते काम करावयाचं. वेळ संपली की चालावयाला लागायचं. वेगळ्या विश्वात वागणाऱ्या उमाला ऑफीसमधल्या मुलींच्यात मिसळावसं वाटतच नव्हतं.

पण एके दिवशी ऑफीसमधल्या एका सहकाऱ्याने तिला चहाचा फार आग्रह केला. हा देशपांडे, साहेबांच्या मर्जीतला होता. नाही म्हणावं तर पंचाईत. अजून आपल्याला कायम व्हायचंय्. पण लगेच दुसरा विचार आला; ‘आपल्याला थोडीच कायम नोकरी करायचीय्.’

ती या विचारात तशीच उभी होती. परत देशपांड्यांनी विचारलं, ‘त्यात एवढा विचार कसला करताय्?’

‘थँक्स्, सॉरी, हं आज नको, बघू पुढे केव्हा तरी’, असं म्हणून उमा चटदिशी निघून गेली. असेच दिवस जात होते. अन् एक दिवस जे घडू नये ते घडलं.

उमाच्या टेबलाजवळ येऊन देशपांडे म्हणाला, ‘हे बघा, मिस् कुळकर्णी! साहेब तुमच्याबद्दल काही तरी म्हणत होते. बहुतेक पुढच्या महिन्यांत कायम व्हाल तुम्ही. मग एक झक्क पार्टी हवी हं सर्वांना.’

‘देईन की, पण आमच्या बंगल्यावर,’ असं म्हणून ती देसाईच्या टेबलाकडे गेली.

नितूनं विचारलं, ‘काय म्हणत होता ग तो देशपांडे?’

‘काही नाही चहाला बोलावित होता, कसा काय आहे ग तो?’

‘तसा वाईट नाही म्हणा, पण फार मोकळा व जरा लोचट आहे, इतकंच.’

काही दिवस गेल्यानंतर देशपांडेनं परत विचारलं, अन् ऑफिस सुटल्यावर न कळत ती त्याच्याबरोबर, घरी न जाता, हॉटेलमध्ये चहाला गेली.

त्यांनी टेबल आधीच रिझर्व्ह केलं होतं. हॉटेलही बरं होतं इतक्यात,

‘हॅलो देशपांडे’ करीत त्याचा एक मित्र आला. देशपांडेनी त्याची व तिची ओळख करून दिली. चहा घेता घेता मध्येच काहीतरी आठवल्यासारखं करून ‘पांच मिनिटांनी आलोच,’ म्हणून उठून गेला.

‘त्याचं हे नेहमीचचं आहे’ असा मित्राने शेरा मारला.

पंचवीस मिनिटे झाली तरी त्याचा पत्ता नव्हता. ती कंटाळली. बील त्याच्या मित्रानेच दिले, व ती दोघे बाहेर पडली. त्याची गाडी होती. ती ‘नको’ म्हणत होती तरी त्याने तिला त्याच्याबरोबरच गाडीत चलण्याचा आग्रह केला. तो म्हणाला, ‘मला पत्ता सांगा, गाडीतून तुम्हाला तुमच्या घरी सोडतो व मी पुढे जातो.’ तिने नकार दिला पण तो ऐकावयास तयारच होईना. शेवटी नाईलाजाने ती

त्याच्या गाडीत बसली. गाडी सुरू झाली. पण गाडी उमाच्या घराकडे न जाता एका आलिशान हॉटेलसमोर उभी राहिली. त्याच्या विक्षिप्त वागणूकीने घाबरली होतीच. आता भीतीमुळे ती जास्तच गांगरली.

'मिस कुळकर्णी, चला न जरा वर,' असे म्हणत त्याने तिचा हात धरून तिला जवळ जवळ ओढतच नेली. ती इकडे तिकडे पहात होती, पण कोणाचच लक्ष नव्हतं. त्यानं तिचा हात घट्ट पकडला आणि आपल्या खोलीत तिला घेऊन गेला. ती चिडली, रडली, पण काही उपयोग झाला नाही. व्हावयाचं ते होऊन गेलं. नंतर त्यानं तिला तिच्या बंगल्यासमोर आणून सोडलं. त्याची गाडी घर्रं आवाज करीत निघून गेली.

घरी येता क्षणीच तिनं सारं काही आईला सांगितलं. आईच्या गळ्यात पडून ती खूप रडली. बिचारी आई? काय बोलणार! तिच्या दृष्टिने तिची अब्रू म्हणजे काचेचं भांडं, एकदा तडा गेला की खलास!

दुसऱ्या दिवशी देशपांडे तिच्या घरी आला. सकाळची वेळ होती. डोक्याला व हाताला बँडेज होतं त्याच्या. आत येता क्षणीच त्यानं विचारलं,

'आल्या नं उमाताई घरी?' उमाचे वडील त्याच्याकडे पहातच राहिले. तो पुढे सांगू लागला, 'काल आम्ही दोघं चहाला गेलो होतो हॉटेलांत, मी जरा बाहेर गेलो, घाईत नेमका केळीच्या सालीवर पाय पडला, पाय घसरला मी खाली पडलो. डोक्याला खोक पडली हाताला लागलं. शेजारच्या लोकांनी मला दवाखान्यात नेलं नंतर टॅक्सी मधून घरी पोहोचविलं. खरं म्हणजे मी त्यांची क्षमा मागावयाला व झाल्या गोष्टीबद्दल दिलगिरी प्रदर्शित करावयास आलो. उमाच्या वडिलांना काहीच उलगडेना. इतक्यात आई आतून म्हणाली,' ती आताच बाहेर गेलीय.'

'बरं त्या परत आल्यावर सांगा त्यांना त्या कायम झाल्याबद्दल.'

नेहमीप्रमाणे उमा ऑफिस मध्ये जात होती. पण ऑफिसचं वातावरण बदलल्याचा भास तिला होत होता. आपल्याकडे पाहून लोक आपापसात कुजबुजत असल्याचं तिला सारखं वाटत होतं. प्रत्येकाचे डोळे आपल्याकडे चमत्कारिक नजरेनं पहात आहेत असा भास तिला होई. शेवटी ती ऑफिसमध्ये कोणाशीच बोलेनाशी झाली आणि एक दिवस तिने राजीनामा पाठवून दिला.

आपल्यात कांही तरी बदल होत आहे असे तिला सारखे वाटत असे. तिने लेडी डॉक्टरकडून तपासणी करून घेतली. पण तसं काही नव्हतं.

लग्न ठरत आलं की निताची पत्र तियं जात व लग्न मोडत असे. उमा या प्रकाराला कंटाळली होती तिला अहिल्येची आठवण झाली, पण शीला व्हावयालाही दैव लागतं. बाणासुराच्या कैदेतील राजकन्यांना सन्मानाने जगू देणारी सत्यभामा तिच्या डोळ्यासमोर येई.

'स्त्रीच स्त्रीच्या भावना समजू शकते.'

आणि गेल्या वर्षीच लग्न झालेली सुधा, त्याच कारणामुळे परत माहेरी आली. या विचारांच्या वादळात असतानाच दिवाणखान्यातील संवाद तिच्या कानी आला.

'बाबासाहेब, आपल्या मुलीबद्दल आम्ही काही ऐकलं ते खरं आहे काय?' हा प्रश्न नवरदेव, तिचा होऊ पहाणारा आयुष्याचा जोडीदार विचारीत होता.

'छे' असं काही नाही, आमच्या वाईटावर असलेले लोक काही तरी सांगतात' बाबासाहेब म्हणत होते.

उमाला हे सहन झालं नाही. ती चटकन् बाहेर आली, आणि तिनं सरळ सरळ विचारलं "आम्ही काय सांगावं अशी आपली अपेक्षा आहे? नाही म्हटलं तर विश्वास ठेवणार आहांत कां तुम्ही? की होय म्हटल्यावर लग्नाला तयार होणार आहांत?"

ती खूप चिडली आणि बाहेर आली तशी चटकन् आत निघून गेली. नकार येणारच होता. तसा तो आलाही. कधी न संतापणारे बाबासाहेब आज तिच्यावर खूप संतापले. त्यामुळे सारं वातावरणच गरम झालं होतं. तिनं बाबासाहेबांना स्पष्ट सांगून टाकलं,

'मला लग्नच करावयाचं नाही, यापुढं आपण स्थळं बघू नका.' आईला वाईट वाटलं, पण उपयोग काय?

उमाने मनाचा निर्धार केला. तिला कोणाच्या दयेवर जगावयाचं नव्हतं. 'संसाराचा सारीपाट मांडल्यावर तो उधळून टाकण्यापेक्षा तो न मांडलेलाच बरा.' स्वतःच्या पायावर उभं राहण्याचा निर्धार तिने केला.

तिनं नवीन जीवन जगण्याचं ठरविलं. परत दुसरीकडे नोकरी शोधू लागली. दोन महिन्यातच तिला दुसरी नोकरी मिळाली. नवीन कामावर ती हजर झाली. एकदा आलेल्या अनुभवाने ती आता शहाणी झाली होती.

तिची अविनाशशी ओळख झाली. दोघांची मैत्री वाढत होती. अविनाश विशेष शिकलेला नव्हता. स्वतःचं घरदार नव्हतं. पगारही वेताचाच होता. पण स्वभावाने तो चांगला वाटत होता. त्याच्या घरी त्याचे आईवडील होते; लग्न झालेली एक बहीण होती. एक दिवस तो आपल्याला लग्नाबद्दल विचारील असं उमाचं मन तिला सांगत होतं, अन् घडलं पण तसंच.

मनगटावरच्या घड्याळांत उमानं पाहिलं, ऑफिस सुटावयास दहा मिनिटं अवकाश होता. उमानं टेबलावरच्या फाइल्स् उचलून जागेवर ठेविल्या. महत्त्वाची कागदपत्रं टेबलाच्या ड्रावरमध्ये ठेविली. उद्या आल्याबरोबर काय काम करावयाचं ते मनात ठरवून उमा खुर्चीवरून उठली. बाथरूममध्ये जाऊन गार पाण्याचा शिडकावा तोंडावर घेतला. दिवसभरच्या झालेल्या श्रमांनी ती थकून गेली होती. शिडकाव्याने परत ताजीतवानी झाली होती. पर्स मधून कंगवा काढला, केस नीट केले. हलक्या हातानं पावडरचा पफ् तोंडावरून फिरविला व ती घरी जावयास निघाली.

अविनाश नेहमी सारखाच गेटशी तिची वाट पहात होता. ऑफीस सुटल्यावर ती दोघं रोज फिरावयास जात. घराबद्दल तिला ओढ नव्हती व घरच्यांनाहीं तिच्याबद्दल फारसं काही वाटत असेल असं तिला वाटत नव्हतं.

अविनाशनं लग्नाबद्दल परत तिला आज विचारलं तर शेवटी आज ती आपल्या जीवनातील गत गोष्टी त्याला सांगणार होती. आणि इतकं सांगूनही तो 'हो' म्हणणार असेल तर—

ते दोघेही नेहमीच्या जागेवर येऊन बसले. ऑफीसच्या गप्पा झाल्या. भेळ खाऊन झाली. अन् अविनाशनं विचारलं, "उमा, मग केव्हा आपण आपलं 'घरकुल' मांडावयाचं ?"

खिन्न मनाने उमा म्हणाली, 'अवि, मला तुला काही स्पष्ट सागावयाचं आहे, तू समजतोस तितकी उमा पवित्र नाही. न कळतच कां होईना पण ती निर्माल्य वनलीय्' असे म्हणून उमाने आपली सर्व गोष्ट घडली होती तशी अविनाशला सांगितली.

तिला जवळ घेत अविनाश म्हणाला, 'उमा; माणूस चुकतं कधी कधी, अन् ही गोष्ट तर न कळत घडली. आणि उमा, नीति अनीति म्हणजे ही एकच गोष्ट आहे काय ? हल्लीच्या काय अन् पूर्वीच्या काळी काय, नीतीची मूल्यं ही आपणच ठरवितो ना ? झालं ते गेलं, उरलं ते गंगाजळ ! हे सर्व ऐकूनही मी तुझ्याशी लग्न करावयास तयार आहे'

ती त्याच्या खांद्यावर विसावली. तिचा निर्णय आपोआपच त्याला कळला. ती मनात विचार करू लागली. "माझ्या घरच्या मंडळीना वाईट वाटेल हे ऐकून, कदाचित् धक्काही बसेल. पण माझ्या अवीत जे काही मला दिसलं जे कांही मला समजलं, मला जो दिलासा दिला त्यानं, जी माणूसकी दाखविली ती मला कधीच विसरता येणं शक्य नव्हतं.'

ते घरी जाण्याकरिता उठले. तिचं मन आनंदानं भरून आलं होतं. त्या आनंदात ती धुंद झाली होती. तिच्या लक्षात राहिलं होतं अवीचं एकच वाक्य—' उरलं ते गंगाजळ.'

□□□

गजाआडचे अश्रू

शकुंतला खोत

रात्री अकराचा सुमार होता. जेलच्या घड्याळात अकराचे ठोके पडले. सगळीकडे नीरव शांतता वाटत होती. पालापाचोळाही धरतीवर शांतपणे पहुडला होता. अस्मानात चंद्राची चालही संथावली होती, पेंगुळल्याप्रमाणे झाली होती. सगळीकडे एक चमत्कारिक स्तब्धता जाणवत होती.

दूरवर एखाद्या बराकीत कैद्याचे बोलणे ऐकू येई. तर मधूनच पहारेकऱ्याच्या बुटाचे धच धच असे आवाज येत. काठीचा आवाज करीत रोजच्या सवयीने तो धिम्म्या लयीत चालत राही. खडी तालीम देत राही.

तेरा नंबरच्या बराकीतला जवान कैदी दोन दिवसांपासून जेवलाच नव्हता. दूरवर काहीतरी पाहात असल्यासारखे त्याचे डोळे दिवसरात्र ताठ राहात. बेभान अवस्थेत तो तासन्तास तसाच पहात राही. त्याची झोपही उडाली होती. या अफाट दुनियेत हरवल्यासारखा तो झाला होता.

पहारेकऱ्याने दोन दिवसापासून त्याची अनेकदा समजूत काढली. पण व्यर्थ. पहारेकरी आज पुन्हा तेरा नंबरची भकास अवस्था पाहून मनात म्हणाला, जवान रक्त आहे. उसळतं मधून मधून–होईल शांत–येईल ताळ्यावर. वेडा आहे झालं !

क्यौं, गोपालबाबू अभी सोये नही ? ' पहारेकऱ्याने गजाआडून जाताजाता पुन्हा एकदा विचारले.

"हुं ऽऽ" गोपाळने एक दीर्घ सुस्कारा सोडीत म्हटलं "अभी नींद कभी नही आयेगी...कभी नही..." आणि पुन्हा तो रात्रीच्या अंधाराकडे डोळे ताणून पहात राहिला. त्याला उमाळा अनावर झाला. घशात हुंदका दाटल्यागत झालं. डोळे पाझरू लागले. ओली ओठावरच अडकल्या "चांदण्याचे हात तुझे घालिशी माझ्या गळा...का नये आज उमाळा.." गोपाळ रडत पुटपुटत राहिला.

पहारेकऱ्याला गोपाळबद्दल विशेष सहानुभूती वाटे. गोपाळने त्याच्या भावनावश वागण्यानेच ती निर्माण केली होती. गोपाळ त्याला फार छानछान कविता ऐकवायचा त्याला कवितांनी भारून टाकायचा. माणूस, त्याचं कर्म, त्याचं दैव, नियतीचा पाठशिवणीचा क्रूर खेळ, माणसाची पराधीनता, मृत्यू या सगळ्या कल्पनांचा विविध प्रकारचा मेळ गोपाळच्या कविता ऐकून ऐकून पहारेकऱ्याच्या मनात खोलवर बसला होता.

पुष्कळदा म्हणूनच पहारेकऱ्याच्या मनात येई, इतक्या छान कविता रचणारा, असा हळव्या मनाचा, शिकला सवरलेला हा जवान गडी, फुलांशी बोलणारा चांदण्याकडे पाहात राहणारा, वाऱ्यावर रुसणारा हा खुनी–असेल का ? यानं खून केला असेल का..की.. छे छे काही तरी गफलत तर नाही ना झाली ? पोलिसांनी उगाचच याला डांबलं नाही ना.. ? पण मग मधेच कधी तरी हा असा दोनदोन दिवस स्तब्ध राहतो ! त्याचे डोळे अंधार कापीत राहतात. हे असं का ? त्याच्या कविता, त्यांचा निरागसपणा, त्याचे कल्पनेतले ते उंचउंच मनोरे, सगळं मध्येच केव्हातरी का कोसळतं ? कुठे गडप होतं ? खास काहीतरी घडलं असलं पाहिजे...तसंच दर्दभरी...बघु कळेल सावकाशीनं..."

मनात असा विचार करीत पहारेकरी दंडुक्याच्या आधारानं त्या बराकीसमोर किंचीत टेकला...आणि तेरा नंबर अजून स्तब्ध भकास हरवलेला पाहून कसं

कोण जाणे त्याच्या तोंडून शब्द निघून गेले "सोजा बेटा..सो ऽ जा.." आणि संथ पावलं टाकीत टाकीत तो निघून गेला..

"बेटा ? बेटा ! कोण बोललं ? कुणी हाक मारली ?..कोण होतं ते ?" गोपाल ताडकन उठला आणि दरवाजाकडे धावला..बंद गजांवर आदळला. "नाही नाही..खरंच मी गुन्हा केला नाही..त्या त्या रंग्यानं..रंग्यानं" म्हणत तिथंच त्यानं वसकण मारली.. डोळे पाझरून राहिले मन गिरक्या घेत राहिलं....

मनाच्या त्याच अवस्थेत तो मंजूच्या घराजवळ आला..आतून भांडणाचा आवाज ऐकू येत होता... चढत चढत मोठा होत गेला..गोपाल भिरभिरत्या नजरेनं स्तब्ध उभा राहिला आणि थोडयाच वेळात मंजूच्या रडण्याचा, किंचाळण्याचा ओरडा त्याला ऐकू आला. तो कासावीस झाला. बावरला..काय करू.. मंजु आत कसा येऊ. दार आतून बंद आहे–आत कसा येऊ ?" त्याचं मन आक्रंदत राहिलं असहायपणे तो तिथंच दाराबाहेर घुटमळला..परतला..

सदा हसतमुख असणारी मंजु त्याला आवडायला लागली होती.–नकळत तो तिच्यावर प्रेम करू लागला होता. त्याला मंजूचं प्रथम दर्शन घडलं तो प्रसंग आठवला..मंजु केर टाकण्याकरता बाहेर आली होती. गोपालकडे पाहून नाजुकसं हसली. तिचे हिरवे हिरवे डोळे हसले..गाल उगाचच लाल झाले. गोपालनं तिला बाहेर ये म्हणून खुणावलं. ती मानेनंच नाही म्हणाली आणि गोपालला ती अधिकच आवडली. मग त्याला कळलं. मानेनं नाही नको म्हणणारी मंजु खरंच मुकी होती. त्या सुंदर फुलाला देवानं मुकं ठेवलं होतं...

गोपालला मंजु फार आवडली...पण तिचा बाप रंगराव मात्र त्याला दृष्टीसमोर नको वाटायचा ...त्याचे ते गलिच्छ मळके कपडे, तांबारलेले डोळे, भसाडा आवाज...आणि गलिच्छ शिव्यांचं बोलणं. गोपालला त्याची किळस यायची, भीती वाटायची. मंजूच्या बापाचा, रंगरावाचा त्याला संताप यायचा. त्यातून मंजूला तो मारहाण करायचा..मुक्या जीवाला आणखीनच मुकं करायचा–त्याचा दारु गाळायचा धंदा होता. कलालाच्या धंद्यानं त्याची माणुसकी मेली होती. मंजूला आई नव्हती..आणि बाप हा असा खवीस. पण आईच्या रूपागुणांवर गेलेली मंजु मुकी आहे हे कळल्यावर तर गोपालला फारच वाईट वाटलं. ...ती त्याला अधिक आवडू लागली होती. रंगराव घरी नसताना तो मंजूकडं जात राहिला...मुकं प्रेम फुलत राहिलं.

मंजु दिसायला सुरेख होती. जवानीचं नुकतं उमलायला लागलेलं ताजं टवटवीत फूल असलेली मंजु अनेकांच्या नजरांचा विषय झाली होती–त्यातून आईवेगळी पोरकी–आणि बाप सदा दारुच्या पिंपात बुडालेला–त्यानं हळुहळु मंजूचा बाजार मांडायला सुरुवात केली होती...तो नशेतच वावरत असे रंगरावकडे येणाऱ्या अनेकांचा मंजुवर डोळा होता... रंगरावचे मित्र, शेजारपाजारची वस्तीतली जवान पोरं. मंजूच्या दृष्टिक्षेपाकरता दर्शनाकरता हपापलेली असत. तिचे काहीसे हिरवट झाक असलेले डोळे, सरळ नाक, गुलाबी मखमली शरीर या सगळ्याला तिच्या सोनसळी केसांनी आणखीनच शोभा आणली होती. कपडयात न मावणारं आपलं मस्तवाल जवान शरीर झाकण्याचा प्रयत्न करणारी मंजु अजून भावडी–अनाघ्रात होती.. गोपालशी तिची मैत्री वाढत होती–तिला गोपालचा दिलासा वाटे–न बोलताही तिचे डोळे गोपालशी सगळं काही बोलून टाकीत. हळुहळू दोघं एकमेकाकडे आकर्षित झाली होती. गोपाल दिसला, आला की मंजुचे गिजरे डोळे लाजून आनंदानं भरून फुलत असत–बोलु लागत. गोपालही तिच्या भेटीकरता आतूर असे...चार बुकं शिकलेली मंजु पाटीवर लिहून आपलं मनोगत सांगे. मंजु आपल्या बापाला रंगरावला खूप घाबरायची–गोपाल येताच तिला धीर यायचा. आसरा मिळाल्याप्रमाणं वाटायचं...मनातलं सगळं लिहावसं वाटायचं...

सकाळची न्याहरी आटपून रंगराव बाहेर पडला की मंजु आणि गोपालच्या चोरटया भेटी चालत. दोघही साधारण सारख्याच वयाची, सारखीच भाबडी होती. आपल्याकरता मंजु झुरते हे गोपालच्या ध्यानात आलं होतं. तिला सदा सुखी ठेवण्याकरिता, हसतमुख पाहण्याकरता गोपाल भुकेला असे...वाचनाला मग-रंग भरत असे.

आणि बघताबघता सारा रंग उधळला...काय झालं ...केव्हा घडलं गोपालला ध्यानातही आलं नाही...गोपालबद्दल मंजूच्या बापाकडे रंगरावाकडे

कुणी तरी चाहडी केली. . . गोपालसारखा एक दरिद्री रिकामटेकडा पोर आपल्या देखण्या मंजूकडं पाहण्याचं येण्याचं धारिष्ट्य करतो हे ऐकूनच रंगराव बिथरला. त्यानं दात धरला. गोपाल सुंदर कविता करी. . . मंजूला त्या ऐकवीत राही. गोपालच्या कविता ऐकून हरखून जाणारी, आनंदीत होणारी मंजु त्या दिवशी गोपालला फुललेली दिसली नाही. . . वरवर ती हसत असल्याचा, आनंद झाल्याचा वहाणा करीत असावी असंच गोपालला वाटलं . . . डोळे भरभरून ती गोपालला मध्येच न्याहाळीत होती–मध्येच खोल विचारात बुडल्यासारखी उदास दिसत होती मध्येच भयंकर भीती वाटल्यासारखा तिचा चेहरा फटफटीत होत होता–पाटीवर लिहिण्याकरता पुढं झालेला हात थरथरत राहिला होता. त्या दिवशी पाटी कोरीच राहिली. . . कविता अबोल झाली–फुललीच नाही. . . मंजूच्या मनात गोपालला खूप काही तरी सांगायचं होतं. . . पण ती गोपालला सांगू शकली नाही. . . . तिच्या मनात खोलवर विचारांचं तांडव चाललं होतं. .

आणि मग बरेच दिवस गोपालला मंजु दिसलीच नाही–भेटलीच नाही. . . त्या दिवशी मंजूच्या घरांतून टॅंहा टॅंहा असा लहान अर्भकाचा रडण्याचा आवाज ऐकू आला. . . आणि एकदम गोपालच्या ध्यानात मंजूच्या धास्तावलेल्या चेहऱ्याचे कारण आले. . . तो बावरला. . . काळजीने काळा ठिक्कर पडलेला मंजूचा केविलवाणा चेहरा कल्पनेनंच त्याला भेडसावीत राहिला–त्याला काळजात तुटल्यासारखं वाटलं. . . कुणी, कुणी माझ्या या निष्पाप फुलाला चुरगाळलं. . त्याच्या नरडीचा घोट घेईन. . . माझी भाबडी मंजु, माझं गुलाबाचं फूल ! गोपाल मंजूच्या घरावाहेरील बाया बापड्यांची गर्दी पाहात दूरच तडफडत राहिला-संतापानं धुमसत राहिला. त्याला वारंवार मंजूची बावरलेली, भीतीने गोठलेली, काळवंडलेली चर्या दिसे–तो अस्वस्थ होई. पण मंजु त्याला भेटू शकत नव्हती–रंगरावानं कडेकोट बंदोवस्त केला होता. मंजूला भेटणं गोपालला फार कठीण झालं होतं.

त्यानंतर दोन दिवसांनी रंगरावनं मंजूला काळीनिळी पडेपर्यंत मारलं–झोडलं. "बोल काळतोंडे, हे पाप कुणाचं ? कुठं शेण खाल्लंस ? बोल, हे कार्ट कुणाचं ?" मुकी मंजु आणखीनच मुकी झाली. "बोल तो तो दरिद्री कार्टा तो गोपाल. त्याला आता लंबा करतो–" म्हणत दांत ओठ खात रंगराव नशेतच बरळत सूडाने पेटून उठला–बाहेर पडला–सारा प्रकार लपून पाहणारा गोपाल जागच्या जागी सुन्न होऊन गेला–बधीर झाला. . .

संध्याकाळच्या अंधारात मंजु एकटीच अस्ताव्यस्त पडून राहिली होती–हुंदक्यांनी तिचं शरिर गदगदत होतं–तिला कशाचीही शुद्ध नव्हती–मारानं अंग निळंनिळं पडलं होतं–डोळ्यांची लालकमळं सुकून कोमेजून गेली होती–तरी डोळे पाझरतच होते–समोर अंधारात गोपाळची आकृती तिनं पाहिली–ती वेड्यासारखी पहात राहिली–क्षणार्धात तिनं घाईनं पाटीवर लिहिलं. "माझ्यामुळं तू बदनाम होऊ नकोस–वस्ती सोडून जा माझा बाप तुझा". . पुढं तिला हुंदका दाटून आला. "त्या बाजीराव पाटलानं त्या दिवशी संध्याकाळी माझ्यावर जबरदस्ती. . . " आणि मंजु पाटी टाकून मुसमुसत आत हेलकांडत गेली–कोसळली. . . .

दोन दिवसातच मंजूच्या आत्महत्येची बातमी ऐकून गोपाळ थिजल्यासारखा झाला काय ऐकलं मी हे ? मंजु, माझी भाबडी मंजु . . गोपाल बेभान झाला–बाजीरावाच्या रोखानं निघालेल्या गोपालला मंजूच्या बापानं कारस्थान करून तुरुंगात डांबलं. . . मंजूच्या खुनाचं पाप त्याच्यावर लादलं गेलं–गोपालची बाजू मांडणारं कुणीच नव्हतं. गोपाल वेडा झाला–तुरुंगातही वेड्यासारख्या कविता करायला लागला-गायला लागला.

कोवळ्या वयातल्या त्या सर्व घटनांनी जगाचा उफराटा न्याय गोपाळला दाखवला. त्यामुळं गोपाळचा आनंद, त्याचे अश्रु सारे आटले. या जगाचा अनुभव, पहिला वहिला अनुभव त्याला अनेक गोष्टी शिकवून गेला–गोपालला पोलिसांनी तुरुंगात डांबलं.

तुरुंगातही तासनतास तो सगळं पुन्हापुन्हा आठवत राही–भकास नजरेनं दूरवर पाहात राही. दोन दोन दिवस उपाशी राही–झोपेविना राही. मंजूचा केविलवाणा चेहरा त्याला बोलवीत राही. मंजूप्रमाणं मुका होऊन तो अश्रू ढाळत राही.

मंजूला त्याला खूप कविता ऐकवायच्या होत्या–पण आता सगळं जागेवरच राहिलं, संपलं. मंजूकरता लिहिलेल्या गोपालच्या कविता लोकांना फार आव-

डल्या—पण गोपाल आणि त्याची मंजु त्या कवितेत हरवली होती—भकास नजरेने डोळे मोठेमोठे करून गोपाळ मंजूला शोधत होता...

आणि अशातच गोपाळला त्या रात्री ग्लानी आली—त्या ग्लानीतच त्याला स्वप्न पडलं..गोपालच्या कविता जिवंत वाटतात—त्याच्या कविता अंत:करणाला भेदून टाकतात—त्यांच्यासारखा कवी झाला नाही. वगैरे जोरदार शब्दांत गोपालचा सत्कार समारंभ चालला होता. समारंभाची स्तुतीपर भाषणं चालली होती. गोपालला सरकारी पारितोषिक मिळालं—त्याच्या कवितांना, एका वेड्याच्या कवितांना सरकारनं गौरविलं सन्मानीत केलं पण फार उशीर झाला होता—त्याच्या जीवनातलं काव्य पार संपून गेलं होतं. उरले होते फक्त शब्द...

सत्कार समारंभांच्या भाषणांना ऊत आला होता. सगळीकडे गोपालची तारीफ....त्याचं नाव झालं होतं—पण त्याचं मन रडत होतं..."अरे मी तसा नाही, मी लायक नाही—मला जाऊ द्या—मला सोडा. मला सत्कार नको ही इनामं नको—निरागस काव्य मी गमावून बसलोय—मी—मी काही काही करू शकलो नाही—हे हात, हे मन, हे जग पापी आहे—मी—मी—मी—सोडा मला—मरू द्या संपवू द्या हे सारं..." गोपाल ढसाढसा रडत होता. गजाआड त्याचे अश्रू पुसायला कुणाचाही हात आला नाही. अश्रू तसेच गजांवर घरंगळत राहिले—एका वेड्या कलावंताचे, निष्पाप भावड्या तरुण जीवाचे, स्वप्नवेड्या गोपालचे. अश्रू वाहात राहिले आणि जग आपल्यातच मश्गुल होतं...

۵ ۵ ۵

दोन चुकलेले सूर

१. हे पुनवेचे चांदणें,
हा चंदेरी झगमगता प्रकाश,
अवघे भरले धुंदीने,
बेहोशीने अवकाश
इथे या एकटीवर मात्र धावून येते आहे;
कुठली ही शांतता, हा अंधार?
पण मला आवडते अशी शांतता,
असा अंधार,
कारण; त्यातच घ्यायची आहे शेवटी मला,
चिरनिद्रा, चिरनिद्रा ।।

□ □ □

२. कोण खेळलंय माझ्या आयुष्याशी, माझ्या भावनांशी?
कोणी दिला आहे हा असा निर्घृण अधिकार त्यांना?
कोळपून गेली माझी सारी उमेद, सारी उभारी।
सडली, कुजली, आयुष्यातील ही रमणीय वर्षे,
ही भरारी।
हं! पण दोष देणार कुणाला?
याला, त्याला की स्वत:ला?
शेवटी आपण क्षुद्र मानव शरण जाणार कुणाला;
त्या प्रारब्धाला? ।।

——प्रतिभा नारायण

‘नाविक’ अन् ‘नभनाविक’ : कुसुमाग्रजांचे आवडते प्रतीक



तारा सावंगीकर

प्रतीक याचा अर्थ चिन्ह. व्यवहारातील आणि शास्त्रीय विषयातील चिन्हे वेगळी; ललित वाङ्मयातील चिन्हे वेगळी. पहिली चिन्हे सर्वांच्या सोयीसाठी. सर्वजण त्याचा उपयोग एका विशिष्ट अर्थाने करतात. साहित्यिक आपल्या वाङ्मयात वा ललितकृतीत जी चिन्हे वा प्रतीके निर्माण करतो त्याचा उपयोग त्या त्या लेखकापुरता व त्या संदर्भाला मर्यादित एवढाच असतो. पुढे पुढे ही प्रतीके पुनरावृत्त होवू लागली तर झिजलेल्या नाण्याप्रमाणे रसिकांना वाटूं लागतात.

‘पिण्डे पिण्डे मतिर्भिन्न:’ या न्यायानं वाङ्मयातील प्रतिके देखील प्रतिभावंतांच्या प्रतिभेनुसार, अनुभूतीनुसार विविधरूपे धारण करतात. प्रतीकाच्या जन्मानंतर आपण कवी वा लेखकाचा म्हणजेच त्याच्या व्यक्तीगत कलाप्रवृत्तीचा शोध घेतो. काही प्रतीके चटकन् कळतात. कारण त्यातील अनुभव तुम्हा आम्हा सर्वांचा असतो. कांही दुर्बोध वाटतात कारण प्रतिभावंताची अनुभूती आपल्या आकलना पलीकडची असते.

आपल्या संस्कृत साहित्यात लक्ष्य नि व्यंग्य अर्थाला विशेष महत्व. शांत जलाशयात खडा टाकला की, त्यातील वलयामागून वलयं मोठी होत जावीत तशीच ह्या अर्थांनी प्रत्येक क्षणी नवी रूची प्राप्त होते, नवा अर्थ गवसतो.

या प्रतीकांचा उपयोग काय ? माणसाचे विचार, चिंतन, तात्विक दृष्टीकोन रसिकांपर्यंत पोहचविण्याचे ते माध्यम मानावे कां ? विशिष्ट जीवनमूल्यांवर श्रद्धा असणारा प्रत्येक प्रतिभावंत, त्याला कळलेल्या मानवी जीवनमूल्यांचे रहस्य तर ह्या प्रतीकांमार्फत प्रकट करीत नसावा ? आपल्या भावना, कल्पना, विचार, इच्छा–आकांक्षा व्यक्त करतांना तो प्रतीकांचे साहाय्य घेत असावा.

कांही कवितातील प्रतीके सहज समजतात. कारण त्यांनी सूचित केलेल्या गोष्टी व्यतिरिक्त त्यांना स्वत:चा स्वतंत्र अर्थ असतो. कांही प्रतीके श्लेषात्मक आवरणाची ठरतात. उदाहरण घ्यायचे झाल्यास तांब्यांची ‘रतले परपुरुषाशी’ आणि ‘पक्षी पिंजऱ्यातूनी उडाला.’ पहिल्यात परपुरूष म्हणजे परमात्मा व त्याशी एकरूप होवू इच्छिणारा जीवात्मा हे चटकन् कळते. दुसऱ्यात पक्ष्याला श्लेषात्मक आवरण आहे. पक्षी हा देह वा कुडीतील ‘प्राण’ आणि बंधनातून निसटून जाणारी ‘रमणी’ असाही अर्थ केल्यास चालू शकतो.

कुसुमाग्रजांची कविता वाचतांना सर्व परिचित अशी चंद्र–चांदणे, फुले–भ्रमर, समिधा असली प्रतीके मनात तरळत जातात. तशी ‘बालकवी’ ह्या कवितेत ही दोन्ही प्रतीके आलेली आहेत. “हे अमर विहंगम ! गगनाचा रहिवासी, त्या नीळसागरावरचा चतुर खलाशी” यातील विहंगमाला (नभनाविकाला) व चतुर खलाशाला (नाविकाला) एक काम आहे. ते म्हणजे “आणसी धरेवर अक्षर हा धनराशी रे !” आणण्याचे. पण बालकवीवरील अपार श्रद्धेतून या प्रतीकांकडे पहायचे. पण विशाखेत आकाश व सागरप्रेमी कुसुमाग्रज आगळी दोन प्रतीके योजतात. एक ‘नभ–नाविकाचे’ व दुसरे ‘नाविकाचे.’ ही प्रतीके वाचकांवर विशेष प्रभाव टाकतात. त्यांची ‘आस’ आणि ‘कोलंबसाचे गर्वगीत’ या कविता ह्या संदर्भात विशेष महत्त्वाच्या. जीवनाच्या विराट दृश्याकडे पहात असता त्याला साजेलशी प्रतीके, असावीत असाही समज त्यामागे नसेल कशावरून ? मराठी काव्यात ‘नाविक’ व ‘नभ–नाविक’ प्रतीके प्रथम कुसुमाग्रजांनीच

वापरलीत का? जिवंतपणा–नाविन्य यामुळे त्याची भुरळ आपल्या मनाला पडते कां ?

नाही. त्यांच्यापूर्वी नाविकाचे प्रतीक पौर्वात्य व पाश्चिमात्य अनेक श्रेष्ठ कवींकडून वापरल्या गेले आहे. समर्थ, मोरोपंत, जनाबाई, मीराबाई, टागोर, तांबे, गिरीश, टेनिसन, पोप इत्यादि अनेक श्रेष्ठ कवींची नावे चटकन् आठवतात. संसाराला नदीची विशेषतः सागरांची उपमा देण्याची चाल आंग्ल, भारतीय दोहोत् आहे. (कदाचित सागरसानिध्य म्हणून त्याचा सर्रास उपयोग असावा. मुस्लीम काव्यात भवसागर वा नाविक ही कल्पना वारंवार येत नाही. समुद्रसानिध्याचा अभाव हीहि त्यामागची पार्श्वभूमी असावी.)

दासबोधात समर्थांनी भवनदीचे उत्कृष्ट वर्णन केले आहे.

संसार म्हणजे महापूर। माजी जळचरे अपार।।
डंखू धावती विखार। काळसर्प ।।१।।
बहुतेक आवर्ती पडिले। प्राणी वाहातची गेले।
जेही भगवंतासी बोमाइले। भावार्थ बळे ।।८।।
देव आपण घालुनी उडी। तयासी नेले पैलथडी।
येर ते अभाविके बापुडी। वाहातचि गेली ।।९।।
(दासबोध दशक ३)

यात देवाची भूमिका नाविकाची. तो आपणहून उडी घालणार आणि पैलथडी नेणार हा समर्थ–विश्वास.

मोरोपंत केकावलीत असा उपयोग चातुर्याने करतात.

तरेन तुमच्या बळे भवमहानदी नाविका
तुम्हीच मग आतरास्तव मला सुदीना विका
असे विदित वासही मज सदाश्रमींचा करा
दया, गुण पहा सवे मज सदाश्रमी चाकरा

संसाररूपी दुस्तर नदी तुमच्या (देवरूपी नाविकाच्या) कृपा सामर्थ्याने तरेन. पैलतीरावर नेल्यानंतर नावाड्यास जे आतर (भाडे) द्यावे लागते ते द्यायला या दीनाजवळ नाही. पण एक गुण आहे. तो म्हणजे इमाने–इतबारे सेवाचाकरी करण्याचा. तेव्हा एखाद्या सु–दीनाला विका ही नम्रप्रार्थना.

जनाबाई आपल्या अभंगात म्हणते.

मला आंधळ्याची काठी
अडकली कवणे बेटी

यात आपली अगतिकता प्रकट करतांना 'नाविक' हा सूचकतेचा अर्थ ती 'आंधळ्याची काठी–या शब्दप्रयोगाने करते.

मीराबाई आपल्या पदात म्हणते.

भवसागर सब सूक गया है
फिकर नही मुझे तरनन की

गुरूची आवश्यकता नाही ह्या पूर्व संदर्भात ती पुढे म्हणते, भवसागराच्या अतीत–पलीकडे गेलेली आहे. ह्या दृष्टीकोनातून तिला तरण्यासाठी आता नाविकाची आवश्यकता उरली नाही.

कविवर्य तांबे आपली व्याकूळता व्यक्त करतांना 'वैरिण झाली नदी, प्राणाचे घे मोल नाविका, लावि पार, ने आधी' असं म्हणतात. तर गिरीश,

'घे आतर, ने मज परतीरा
जावू दे घराला जलवीरा'

असे म्हणतात. यात 'जलवीर' हा नाविकाला योजलेला पर्यायी शब्द आहे. साहित्यातील 'घर' हे लाक्षणिक अर्थाने घ्यायचे.

कविवर्य टागोरांच्या गीतांजलीतील ४२ वे गीत Early in the day it was whispered, टेनिसनची Crossing the Bar किंवा पोपच्या कवितेतील,

On life's vast ocean diversely we sail
Reason the card but passion is the gale
[Essay on Man, Second Epistles
L:s 107–108]

आशय पाहिला तर नाविकाच्या प्रतीकाच्या दृष्टीने त्या महत्वाच्या ठरतात.

या सर्व आंग्ल व भारतीय कवींना–त्यांच्या कवितांना एका सामान्यविचाराची पार्श्वभूमी आहे. भवसागर ओलांडून पैलतीरावर (आपल्या खऱ्या घरी) जाण्याची अनिवार्य ओढ, ऐहिक जीवनाची 'आस' आता कुणालाच उरली नाही. सर्वांचे नेत्र पैलतीरी किंबहुना नावेत बसतांनाची निरवानिरव आणि नाविकाची प्रतीक्षा यातून परमेश्वरप्राप्तीची उत्कट अशी उत्कंठाच व्यक्त होते.

टेनिसनच्या Crossing the Bar मध्ये सूर्यास्ताच्या वेळीं आकाशात कवीला सायंतारा दिसतो, हाक ऐकू येते. ती मृत्यूची आहे. एकंदर कविता तत्वज्ञानात्मक. समुद्राचे पाणी लाटांच्या रूपाने जसे येते तसे परत जाते. जन्ममृत्यू असेच. संधिप्रकाशात सायंकाळचा घंटानाद होईल. ती मृत्यूघंटा सर्वत्र अंधार पसरवून जाईल. मृत्यू हा स्थलकालाच्या मर्यादा ओलांडून दुसऱ्या जगात घेऊन जाणारा आहे. समुद्राच्या त्या बांधाकडे (Crossing the bar) गेल्यावर त्याचा मार्गदर्शक त्याला मिळेल "I hope to see my pilot face to face' हे परमेश्वरप्राप्तीचे समाधान कवी व्यक्त करतो.

टागोरांनी We should sail in a boat only thou and I, and never a soul in the world would know of this our pilgrimage to and to no country and to no end '—— ही सर्व तयारी केव्हा केली ? Early in the day it was whispered ! टागोर तत्वचिंतक तसेच द्रष्टेही होते. इहलोक सोडून जाण्याबाबतचा दृष्टिकोन आशावादी आहे. जीवनाबद्दल आता कसलीही आसक्ती नाही. दुःख नाही, खेद नाही. फक्त पळभर कळ सोसायची. पण समाधानी वृत्तीनं खऱ्या घरी जायचं ही वृत्ती त्यामागे आहे. जणू आनंदाला उधाण आलेलं आहे हा भाव सूचित करताना

In that shoreless ocean, at that silently listening smile, my songs would swell in melodies, free as waves, free from all bondages of words ——

Is the time not come yet ? Are there works still to do ? Lo ! evening has come down upon the shore and in the fading light the sea-birds come flying to their nests.

टेनिसन twilight शब्द वापरतो तर टागोर fading light वापरतात. दोघेही ईश्वरभेटीसाठी उत्सुक. भूतलावर – जीवनात त्यांना गम्य उरले नाही. टागोर तर नावेत बसून सज्ज आहेत.

Who knows when the chains will be off, and the boat, like the last glimmer of sunset vanish into night ? —— अशी प्रतीक्षा करताहेत.

तात्पर्य वर उल्लेखिलेल्या सर्वच थोर कवींनी ऐहिक आसक्ती व स्वजीवनासक्तीपासून दूर जाऊन 'निर्वाणाची तयारी' या अर्थाने जमवाजमव करण्याच्या तयारीत नाविकाचे प्रतीक वापरले आहे. या प्रत्येकांच्या मनोवृत्तीतील साधर्म्य व प्रतीक–योजना पहिल्यावर रसिकांना त्यातील प्रत्येकाने त्यांच्या आयुष्यातील कोणत्या काळी ती रचना केली ह्याचे भान न ठेवले तरी चालू शकते. त्यामुळे फारसे अडत नाही. प्रवृत्ती – निवृत्ती, ऐहिक – पारमार्थिक या द्वंद्वात त्या प्रत्येकाचा आपापल्या मनावर किती ताबा आहे ही एकच गोष्ट मनात ठसते. परमेश्वर प्राप्तीची ओढ व्यक्त करतांना मनाला शांतता व समाधान मिळविण्यासाठी सर्व मानवी संघर्षापासून दूर निवांत जागी जाण्याची आकांक्षा ते बाळगतात व या सूचकतेने ते 'नाविक' प्रतीक योजतात.

कविवर्य कुसुमाग्रजांनी 'नाविक आणि 'नभनाविका' ही प्रतीके ह्या पूर्वसुरींपेक्षा वेगळ्या अर्थांनी वापरली आहेत. कुसुमाग्रजांचे मानवी जीवनावर अन् मानवांवर अपरंपार प्रेम आहे. जीवनातील संघर्ष त्यांच्या व्यापकतेइतकाच मोठा. त्या संघर्षाला आनंदाने सामोरे जाण्यातच माणसाची इतिकर्तव्यता ही त्यांची ठाम भूमिका. मनातील वैफल्य झटकून टाकायचे, परिस्थितीने आलेली मरगळ नाहीशी करायची आणि नव्या नव्या कालखंडातील नवनवी आव्हाने स्वीकारताना संघर्षाला आपल्या ताब्यात ठेवून क्रियाशीलता वाढवावयाची हा जीवनमंत्र त्यांचा 'नाविक' व 'नभ नाविक' देतो. इहलोकी वावरतांना मानवाचे भवितव्य काय ? आपले ध्येय गाठण्यासाठी त्याला कोणत्या प्रगतिपथावरून जायचे आहे ? हेही त्यात सूचकतेने प्रतीत होते. या दृष्टीने 'आस' व 'कोलंबसाचे गर्वगीत' या दोन कवितांच्या संदर्भात (सीमीततेने) त्यांनी वापरलेल्या ह्या दोन प्रतीकांसंबंधी विचार करायचा आहे.

कवितेची शीर्षके समर्पक. 'आस' मध्ये अंतर्मनाची ओढ, कळकळ आणि नवनिर्मितेची ओढ स्वस्थ बसू देत नाही. कोलंबस हा एक सामान्य मानव नाही, फक्त गाणे (वा रडगाणे) गाणारा ! तर यत्नसिद्ध जिद्दीने गर्वगीत गाणारा. सागरात संचार-

णारा निधड्या छातीचा, जीवावर उदार होऊन माहिती नसलेल्या ठिकाणीहि जाण्यास न डगमगणारा. सगळं सामार्थ्य, आशावादी वृत्ती पणाला लावणारा— कशासाठी? तर मानवी जीवन सुस्थिर करण्यासाठी. प्रत्येक कडव्यातून त्यातील अर्थवलयं अधिकाधिक उदात्ततेकडे नेतात. आणि जीवननिष्ठेवरची श्रद्धा डळमळू देत नाही.

'आस' मध्ये ते म्हणतात——

"तुझ्या करांचा विळखा पडता
तव वक्षाच्या उबेत दडता
गमे जिण्याची क्षण सार्थकता
परि अंतरि करि आक्रोश कुणी
करि मुक्त विहंगम हा रमणी।

नकोस पसरूं मोहक वाहू
मृदुल बंध हे कुठवर साहू
नभ–नाविक मी, हे कुठवर राहू
या आकुंचित जगी गुदमरुनी
करि मुक्त विहंगम हा रमणी.

यातील सुरवातीच्या सात ओळीत मानवी जीवनाला व्यवहारात पडणाऱ्या मर्यादा स्पष्ट होतात. त्यातील मोहमयता वाईट आहे असंही नाही. प्रत्येकजण आपापल्या भावजीवनात – संसारात अशाच मृदुल बंधनांनी जखडलेला असतो.. तुम्हा आम्हा सर्वांचा हा अनुभव. वाटयाला आलेलं जीवन मग ते सुखमय – दुःखमय कसेही असो; –आनंदाने वा कष्टाने जगायचे एवढीच त्यामागची भावना. पण इथे कुसुमाग्रज एका भव्य भावनेनी भारावलेले दिसतात. ती भव्य भावना कोणती ? त्याची पार्श्वभूमी कोणती ? तर त्यांना प्रतीत होणारी मानवी जीवनाची व्यापकता. अशा अमर्याद, असीम, व्यापक जीवनाला प्रतीकही साजेसे हवे. आकुंचित जगी जीव गुदमरतो आहे. अंतराळात व सागरात स्वच्छंदपणे हिंडून यायचे आहे. नभातला नाविक म्हणजे विहंगम. कवीरूपी विहंगमाने स्वैर संचार करून यायचे. गगनात मेघांच्या जलधीत नहायचे पण हिरव्या तरुराजीकडे परत यायचे. तरतरीतपणा अन् उत्साह घेऊन घरट्याकडे परतायचे. त्याला विसरायचे नाही. हा भाव ते

" जावे गगनी आणिक गावे
मेघांच्या जलधीत नहावे
हिरव्या तरुराजीत रहावे
ही आस सदा अंतःकरणी
करि मुक्त विहंगम हा रमणी "

—— या शब्दात व्यक्त करतात. कुसुमाग्रज त्यांच्या सर्वच कवितात वास्तवाचे भान कधीच सोडत नाहीत. तरीही तो नभ–नाविक या सीमित – आकुंचित जगात गुदमरून जाणार हे भय त्या पाठीमागे आहे. कुठलीही पाशवद्धता जर खिळवून ठेवील तर मानवतेची नवनवी क्षितीजे तो कशी धुंडाळणार ? स्वैर संचाराने दृष्टी व्यापक होईल. इतरांना समजावून घेऊन आपल्या जीवनालाही नवनवे रंग प्राप्त होऊ शकतील ही 'आस' !

त्याचप्रमाणे कोलंबसाच्या गर्वगीतात सृष्टीला जिंकू पहाणारा कोलंबस 'मळलेली वाट' तुडवू पहात नाही. मानवी जीवनार्थ वेगळ्या वाटेने हुडकतांना दिसतो. विराट वादळांनी हेलावणाऱ्या समुद्राला तो आव्हान देतो. त्याच्या दृष्टिपथात किनारा नाही. तरीही मनाची विजिगिषु वृत्ती अविचल आहे. जणू 'नाविक कोलंबस' हा सुद्धा भव्य स्वरूपातील महामानव ! कवीने परमेश्वराला हाक दिली नाही. मी अगतिक आहे तू परतीराला ने असंही म्हटलं नाही. मानवाचं भवितव्य मानवालाच घडवायचं आहे. स्वकर्तृत्वांनी संकटाना लाथाडून. जे जे जगी जगते ते ते माझे – मानवाचे आहे या आत्मीयतेतून. म्हणूनच आपल्या सहकाऱ्यांना जीवनसंग्राम धैर्याने लढण्याला आव्हान देणारा कोलंबस गर्वाने म्हणतो –

पदच्युता, तव भीषण नर्तन असेच चालू दे
फुटू दे नभ माथ्यावरती
आणि तुटू दे अखंड उल्का वर्षावत अग्नी
नाविका ना कुठली भीती !

प्रगतीच्या दिशेने प्रवास करतांना याचे बाहु स्फुरण पावतात. मनात अदम्य उत्साह संचारतो. पराक्रमाला कोंब फुटतात आणि आत्मविश्वासानी जोमाने तो नवनवे प्रांत पादाक्रांत करतांना

कोट्यावधी जगतात जिवाणू जगती अन् मरती
जशी ती गवताची पाती
नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभाखाली
निर्मितो नव क्षितिजे पुढती !

या भावनेनी मानवतेचे निशाण सातासमुद्रातील खंडात रोवायला निघाला आहे. खंड अन् खंड मानवतेनी व्यापून टाकायचे ध्येय त्याच्या अंतरी आहे. म्हणून जिद्दीने कामाला लागतांना)

चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती
कथा या खुळ्या सागराला
अनंत आमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला.

जीवनसागर जसा भव्य तसा त्यातील संघर्षही भव्यच. या जीवनसंघर्षाला धैर्याने तोंड देण्यात मानवी जीवनाची खरी सार्थकता – हे 'नाविक' व 'नभ–नाविका' च्या प्रतीकातून प्रतिध्वनित होते. संघर्षमय जीवनालाच कवी 'जीवित' म्हणतो. सृष्टीशी हितगुज करणारा किंवा सृष्टीपलीकडच्या एखाद्या गूढ शक्तीची वा परमेश्वराची, त्याच्या दिव्यत्वाची आराधना यातील नाविक करीत नाही. तर जीवनातील समराचे प्रतीक याच दृष्टिकोनातून या नाविकाला–कोलंबसरूपी महामानवाला कुसुमाग्रज पहातात. मानव-जातच या सृष्टीशी झुंजत आहे. जणू सृष्टीच्या रचनेत, गूढतेत, रहस्यमयतेत संघर्षाचेच बीजतत्व आहे. आणि या धारणेतून त्यांनी हे आवडते प्रतीक वापरले.

कुसुमाग्रजांसारख्या आशावादी कवीला, जीवनाबद्दल नितांत आदर–श्रद्धा आहे. जीवनसंघर्ष हा सुद्धा पवित्र व भव्य असू शकेल कां ? असू शकेल. (त्यांच्या 'बायरन' आणि 'टिळकांच्या पुतळ्याजवळ' या साक्षीला असणाऱ्या कविता) वादळी जीवनातच कवीला मानवी जीवनाचा सूचक अर्थ भासतो. कारण संघर्ष तत्वाचे अप्रत्यक्षरीत्या यात गौरव व पूजन आढळते. म्हणूनच त्यांची 'नाविक' व 'नभ नाविक'ही प्रतीके सृष्टीशी झुंजणाऱ्या विजिगीषु मानवाची प्रतीके ठरतात. पूर्वापार कविपरंपरेतील भवसागर तरून परमात्म्याच्या मीलनाचीच ओढ व्यक्त करणारे ते नाही.

जीवनाचे अस्तित्व हे श्रेष्ठ अन् त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा असा समर्थांच्या प्रयत्नवादाचा ठसा त्यावर नकळत उमटला आहे, वाणी व विचार या दोहोतूनही.

शिल्प

माझे संजीवन हात, काहीतरी लिहू गेले
शब्द शब्द आशयाचे, घट नाचवीत आले.
शब्दावरी हिंदळले आतल्याचे रंग,रंग
हाय ! थिजावले कसे वाऱ्याचेहि अंतरंग.
होती म्हणायचे आज जिती जागती आकृती
झाली शिल्प अजिंठ्याचे पडे स्वतःची विस्मृती
कळेल का माझी व्यथा कुणा तरी भाबड्याला
गंध अबोलीच्या दारी पानोपानी बहरला
त्याचा स्पर्श हवा आहे फूल फूल त्याचे व्हावे
शब्द शब्द नसताना गीत त्याच्या साठी गावे
त्याच्या संजीवन हाती शिल्प माझे सुखावेल
सरो काळाचा दिमाख शिल्प सदाच हांसेल.

स्वप्न

जमिनीवर ठेवायला पाऊल
मला मुळी जागाच नाही
आकाश मात्र पुकारतय्
अनवाणी जळजळीत पाऊल वर उचललं कि
मेघाचा तळवा अलगद खाली सरतोय्
हाय ! पण माझी नाळ अजून या दुर्दैवी
भूमीशीच जखडलेली आहे—
इंद्रधनुष्याच्या कमानीला लोंबकळून
झुलता मात्र खूप येते
खुशाल तोडून आणीन आकाशातील ताराफुले
त्यांचेच चढाव घालून पायात
तोलून धरीन ही डळमळती धरा.

—कुंदा केकरे

"माती आणि मूर्ति"
–एक संज्ञाप्रवाही समीक्षा–संग्रह

नीलिमा दाणी

कालागणिक बदलत जाणाऱ्या वाङ्मयकृतींचे मूल्यमापन करतांना वाङ्मयीन निकषही बदलावे लागतात. बदललेल्या नव्या साहित्यिक स्वरूपांचे दर्शन घडवितांना सरोजिनी वैद्य यांनी उचललेली ही रसास्वादाची नवी पद्धत स्वागतार्ह वाटते. सरोजिनी वैद्य यांच्या सत्यकथा मध्ये प्रसिद्ध झालेल्या समीक्षा–निबंधांचा हा संग्रह त्यांच्या 'पहाट पाणी' तील निबंधांइतकाच लालित्यपूर्ण आहे.

टीका किंवा समीक्षा ह्या नवनिर्मितीक्षम अशा शास्त्रीय कला आहेत. वाङ्मयातून व्यक्त होणाऱ्या बदलत्या जाणीवांसोबत त्या उत्क्रांत व्हायला हव्यात. मनोविश्लेषणात्मक, संज्ञाप्रवाही अशा नव्या वाङ्मयाची प्रातिनिधिक पुस्तके म्हणजे "काळोखाचे अंग" "रणांगण," "सावित्री" "शेषप्रश्न"! यांचे समीक्षण करतांना जुन्या वाङ्मयीन निकषांना बाजूला ठेवलं आहे. "रणांगण" पहिल्यांदा वाचली तेव्हा अनुभवाकडे बघण्याची सौंदर्यात्मक दृष्टी मला अपरिचित होती असं लेखिका म्हणते. हे परीक्षण वाचतांना, ती सौंदर्यदृष्टी आता त्याना मिळाली आहे असं दिसतं.

आशय व्यक्त करण्यासाठी या लेखकांनी निवडलेली पद्धत, त्या अभिव्यक्तीतून ज्या अनुभूतींचा साक्षात्कार होतो ती सरोजिनीबाईंनी नेमकेपणाने व्यक्त केली आहे. पुस्तक वाचतांना मनात येणारे विचार, पुस्तकाचे वाचतांना होणारे संस्कार अन् नंतर मनात उठणारं विचारांचं मोहोळ ह्या समिक्षांमध्ये मांडलं आहे. त्यावरून ते पुस्तक चांगलं की वाईट अशा प्रकारचा अभिप्राय न देता मला त्याचा सौंदर्यास्वाद कितपत घेता आला हेच वैद्यांनी सांगितलं आहे.

विचारांना चालना देणाऱ्या कादंबऱ्यांच्या समीक्षेसाठी ही पद्धत अगदी योग्य आहे. "काळोखाचे अंग" चे परीक्षण लिहितांना त्या म्हणतात, "तिचा सूर लागेपर्यंत भाषा अनाकलनीय रहाते. पण सूर लागल्यानंतर काळोखाचे अंग वाचणे म्हणजे एक गूढ विश्व मनाने पहाणे असाच अर्थ होऊन बसतो तिच्या समर्थ भाषेमुळें! आणि मग एखादा शब्द नव्हे तर तिच्यातील विरामचिन्हे, टिंबेही तुम्ही नजरेआड करू शकत नाही." सौंदर्यानुभूतीचा हा बदलता अनुभव जितका प्रामाणिक तितकाच बोलका आहे. नव्या साहित्याचं मर्म याच वाक्यात आहे. नवकथा, नवकाव्य, नवकादंबरी, नववाङ्मयाचा सूर लागेपर्यंत ते अनाकलनीय रहातं. सूर लागल्यावर अनुभूतीच्या सर्व आरोह–अवरोहातून वाचकाला आपल्याशी एकरूप होऊन हिंडायला लावतं.

'रणांगण' ही पहिली मनोविश्लेषणात्मक मराठी कादंबरी! पण उत्क्रांत दृष्टीकोण गवसेपर्यंत त्याचा सौंदर्यास्वाद घेता आला नाही. भोवतालच्या कितीतरी खऱ्या व काल्पनिक गोष्टींची दडपणे मनात घुसून बसली होती तेव्हा 'रणांगण' कळलीच नाही. या प्रांजळ कबूलीतच 'रणांगण'चा सौंदर्यास्वाद घेतांना नीती–अनीतीच्या रूढ कल्पनांवर आधारलेला जीवनविषयक दृष्टीकोण बाजूला ठेवायला हवा अशी समीक्षा वाचकाला केलेली सूचना जाणवते.

विकसित झालेल्या दृष्टीकोणातून 'रणांगण'कडे पहातांना, तत्त्वज्ञानातील "तत्त्वमसि" सारख्या लहानशा सूत्रात, जीवनविषयीच्या अत्यंत व्यापक सिद्धांतातील आशय जसा वजनदारपणे तोलून धरलेला असतो तसा व्यापक आशयाचा प्रत्यय रणांगण वाचतांना सरोजिनी वैद्यांना येतो व "शेषप्रश्नांच्या पात्रांमधून आकाराला येणारे समाजचित्रही त्यांना दिसायला लागते." अनेक माणसांमधून आवाज ऐकवता ऐकवता प्रत्येकाने स्वतःचा आवाजही ऐकावा, स्वतःच स्वतःला प्रश्न विचारावेत आणि निदान स्वतःपुरती तरी उत्तरे शोधावीत असा 'शेषप्रश्ना'चा अंतिम परिणाम

आहे हेही त्यांना जाणवतं. 'सावित्री'च्या बाबतीत त्या म्हणतात, "सूचित, अर्थगर्भित अशी 'सावित्री'च्या शब्दांचीच नव्हे तर इतरही घटकांची रचना पाहिली की अनुभव व वाढ यांचे नाते दोन वेगवेगळ्या स्तरांवरचे आहे हे दाखविण्याचे सूत्र यामागे आहे असे वाटते. कलानिर्मिती ही रेगे यांच्या मनोवृत्तीने एक भावक्रीडाच मानली आहे. ती जितकी उस्फूर्त तितकीच कौशल्याने करावयाची रचना आहे म्हणूनच अभिव्यक्तीतील सर्वच घटकांची ताकद लेखक सतत खेळवीत ठेवीत असतात." आणि शेवटी 'सावित्री' वाचतांना मनात शेष उरणारे प्रश्न देऊन सरोजिनीबाईंनी या समिक्षेचा शेवट केला आहे.

पण खरी एकजीवता आहे ती "हरवलेल्या आणि हरपलेल्या वाटा"मध्ये! श्रीनिवास कुलकर्णी यांच्या "डोह" या लेखसंग्रहाची समीक्षा — नव्हे सौंदर्यानुभूति लिहितांना, "डोहा"चा तळ शोधायला गेलेल्या सरोजिनीबाई त्याच्याशीच एकरूप होतात. "डोहा"तल्या कुलकर्णींचे तरुण कल्पक मन व बालमन यांच्या सीमारेषा संपूर्ण सृष्टीच्या; पूर्णाकाराला जाऊन भिडतात त्या शोधण्याची क्षमता सरोजिनीबाईंच्या ठिकाणी या तादात्म्यतेनेचे आलेली आहे. "मोठे" होण्याच्या घाईत जुन्या जगाकडे जाणाऱ्या मनाच्या वाटा केव्हा हरवल्या हे जसं 'डोहा'त कळतच नाही तसंच या नव्या समीक्षा लेखनातही कळत नाही.

यानंतरचा दुसरा भाग सुरू होतो जुन्या पुस्तकांमध्ये नव्या जाणीवेनं शोध घेण्याच्या प्रयत्नाचा! पहिला लेख 'स्मृतिचित्रे — माती आणि मूर्ति' नावाचा! समीक्षा निबंधाना शीर्षक देण्यात वैद्यांची कल्पकता दिसते. "रणांगण"ला त्या "उध्वस्त परिकथा" म्हणतात. तर 'शेषप्रश्ना'ला उत्तरापलीकडचा प्रश्न म्हणतात.

लक्ष्मीबाई टिळकांनी ललित कलाकृती निर्माण करण्याच्या उद्देशाने "स्मृतिचित्रे" लिहिलं नाही. अशा प्रकारे जाणीव नसतांना लेखिकेच्या लेखनात जेव्हा उच्च दर्जाचे विविध कलागुण प्रगटतात तेव्हा त्यांचे श्रेय लेखिकेच्या व्यक्तीमत्त्वातील जन्मजात अशा काही शक्तींना द्यावे लागते. ह्या जन्मजात शक्तीबीजांचा दैनंदिन जीवनातून विकास होत गेलेला असतो. लक्ष्मीबाईच्या जीवनाची, स्वभावाची स्मृतिचित्रांशी संगती लावून या तत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न "स्मृतिचित्रे — माती आणि मूर्ति" या लेखातून केला आहे. मूर्तीतून दिसणाऱ्या मातीच्या गुणांची अन् ह्या गुणांमुळे घडलेल्या मूर्तीची सुसंगती शोधण्याचा हा प्रयत्न आहे.

तसंच चाळीस वर्षं उलटसुलट टीका सोसल्यानंतर "विरहतरंग" त्याच्या टीकेसकट कसा वाटतो हे सांगून त्यातील सौंदर्य स्थळे शोधण्याचा प्रयत्न "विरहतरंग — काल आणि आज" मध्ये केला आहे. चाळीस वर्षे टीकून राहिलेला तिचा ताजेपणा, नव्या सौंदर्यदृष्टीची साक्ष देणारे निसर्ग यांची दखल घेतली आहे. पुस्तक वाचकाला वाचावसं वाटावं हा समीक्षेमागील हेतू असतो. पुस्तक बरं—वाईट कसंही आहे लिहिलं तरी त्याबद्दल उत्कंठा वाढविणे हे समीक्षेचे कार्य! "विरहतरंगा"वर नव्या दृष्टीने प्रकाश टाकून त्याचं ताजेपण रसिकांनी पुन्हा एकदा पहावं असं आव्हान हा लेख करतोय.

"कुसुमानिल" वाचतांना सुरवातीला ते का वाचावसं वाटलं नाही हे लेखिका शेवटपर्यंत सांगत नाहीं. पत्रांमधील तोचतोपणामुळे कंटाळवाणेपणा आलेला आहे असं त्या सुचवतात. हरिभाऊ मोटघांच्या संपादनाच्या वेळी पत्रांमधला राजकीय, सामाजिक व कॉलेज वातावरणासंबंधीचा भाग गळला असण्याची शक्यता व्यक्त करून ते नसल्याबद्दल त्यांनी हळहळ व्यक्त केली आहे.

१९६९ साली वैद्यांनी लिहिलेल्या "काळोखाच्या अंग"च्या समीक्षेत जी एकरूपता आकलनाची धडपड दिसते ती ७३ साली लिहिलेल्या 'कुसुमानिल'च्या समीक्षेत का दिसू नये याचे आश्चर्य वाटते. नव्या नव्या वाटा सापडल्यानंतर जुन्या वाटा सापडणं कठीण झालेलं दिसतं. 'सावित्री'च्या पत्रांशी तादाम्यता पावून "अनाकारातला आकार" शोधू शकणाऱ्या सरोजिनीबाई, 'कुसुमानिल'मधील निव्वळ वास्तववादी नव्हे तर ५० वर्षापूर्वी खरोखरच जगलेल्या जीवनाशी, अनुभव—अभिव्यक्तीशी समरस का होऊ शकत नाही असा प्रश्न मनात येतो. ही एकरूपता साधली असती, कुसुमानिलांच्या काळात ह्या वावरू शकल्या असत्या तर प्रारंभी स्वतःच्या भावना न उमगल्याने स्वतःची फसवणूक करणाऱ्या व नंतर

आपलं अंतरंग ओळखून वास्तवाला सामोऱ्या जाणाऱ्या, उत्क्रांत होत जाणाऱ्या दोन प्रेमी जीवांच्या जीवनाचा हा आलेख त्यांना बरंच काही सांगू शकला असता.

या कादंबऱ्यानंतर वामन मल्हार जोशी या व्यक्तीचंच मूल्यमापन दोन लेखांमध्ये आहे. एका लेखात ते निव्वळ तत्वचिंतक, टीकाकार आहेत कादंबरीकार नव्हेच अशा स्वरूपाचं वाङ्‌मयनिर्माता म्हणून मूल्यमापन तर दुसऱ्या लेखात 'माणूस' म्हणून सत्यनिष्ठ सहृदय म्हणून त्यांचा गौरव आहे. "वेगवेगळ्या विषयांवरील तात्त्विक चर्चांच्या सोयीसाठी एकेका व्यक्तीचा नुसता आधार घेण्याने वामनराव तत्त्वचिंतक कादंबरीकार कसे ठरतात हे त्यामुळेच मला कळत नाही" असे म्हणून सरोजिनी वैद्य त्यांचे कादंबरीकार म्हणून स्थानच नाकारीत आहेत. त्यांचे युक्तीवाद तार्कीक आहेत. पण नव्या कादंबऱ्यांना जुने निकष लावणे हे जसे चुकीचे तसेच जुन्या कादंबऱ्यांना नवे निकष लावणेही चुकीचेच ठरत नाही का? क्रांतीच्या काळातील प्रयोग म्हणून ह्यांकडे पहावयास पाहिजे.

'आनंदी गोपाळ' व मूळ आनंदीबाईचे चरित्र यामागील प्रेरणा व इतिहास लक्षात घेऊन ह्यांचा परिणाम सांगण्याचा प्रयत्न "पिंजऱ्यातून दिसलेले आभाळ" व "एक ललित निर्मिती – आनंदी गोपाळ" या लेखांमधून केला आहे. हे लेखही लालित्यपूर्ण आहेत.

एका समीक्षाग्रंथाचा आढावा घेतला तर सरोजिनी वैद्य यांनी वापरलेले नवे तंत्र, नव्या कादंबऱ्यांना चपखल बसत असले तरी जुन्या वातावरणात जातांना त्यांची पावलं अडखळतांना दिसतात. मूर्तीच्या द्वारे मातीच्या गुणांचा हा मागोवा घेतांना, त्या त्या काळात माती कसण्याचं तंत्र किती पुढारलं होतं हाही भाग विचारात घ्यायला हवा असं मला वाटतं. कारण दोष असले तरी ते तंत्राचे, काळाचेही असू शकतात. एवढा एकच मुद्दा सोडला तर "मूर्ती"वर टाकलेला हा नवा प्रकाश वाङ्‌मयीन टीका क्षेत्रात नवी दिशा दाखवणारा आहे.

प्रकाशाच्या पावलांनी

प्रकाशाच्या पावलांनी । सखी आलीस जवळ
वठलेल्या माळावर । आलावली हिरवळ ॥

तुझ्या प्रसन्नल्या नेत्री । चंद्र काय ओशाळला
स्पर्श लाजेल पाहून । प्रेमवेड्या जास्वंदीला ॥

शाप संधीचा उराशी । सुखी तृप्तीचा कशीदा
ओल्या पावलांची झाली । धुंद मोगरीला बाधा ॥

भिजलेल्या डोळ्यामध्ये । आता एकच सामर्थ्य
चिंधी मळकी धुवून । त्यात शोधायचा अर्थ ॥

—उषा लिमये

माझ्या ओटीत

स्वप्नांच्या या सरलेल्या वाटांवर
कोण उभे आहे आता ?

नको, या वाटांना शाप आहेत
पाय पोळण्याचे, करपण्याचे

□ □

ए, तुझ्या हिमारीस्वरांनी
माझी ओटी भरू नकोस ना !

माझ्या ओटीत, माझ्या ओटीत किनई,
दुपार आहे भर वैशाखाची

—नीता शाह

ज्ञानदेवांचे मनोगत

सरोजिनी शेंडे

तेराव्या शतकात महाराष्ट्राच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनात एका नव्या पर्वाची सुरवात संतश्रेष्ठ ज्ञानदेव यांनी केली. कर्मकांडात गुंतलेले पढिक व मंत्र-तंत्र – योगाच्या वामाचारातील विकृतीत रमणारे यांनी समाजजीवन शबलित केले होते. अशा समयी दिशाहीन जनसामान्यांना भगवद्गीतेतील शुद्ध भक्ती व ज्ञानोत्तर कर्म या उच्च जीवनादर्शाचा ज्ञानदेवांनी वस्तुपाठच दिला. त्यांनी भगवद्गीतेवर मराठीमध्ये अजोड काव्यात्म व तत्वज्ञानात्मक ग्रंथ ज्ञानदेवी ही गीताटीका लिहिली. त्यांनी खऱ्या ज्ञानाला पारखे झालेल्या अज्ञ जनतेला व विपरीत ज्ञानाचा अहंकार असणाऱ्यांना आत्मानुभूतीचा मार्ग दाखविला. या मराठी भाषेत मी 'ब्रह्मविद्येचा सुकाळु' करीन हे प्रतिज्ञोत्तर त्यांनी खरे केले.

कोणत्याही ग्रंथकाराचा ग्रंथनिर्मितीमागील हेतू, ग्रंथाचे स्वरूप व त्याचे फलित ह्यांचा मागोवा घ्यायची पद्धती मीमांसकांनी पुढील श्लोकात सांगितली आहे.

उपक्रमोपसंहारौ अभ्यासोऽपूर्वता फलम् ।
अर्थवादोपपत्ती च लिंगं तात्पर्यनिर्णये ॥

ग्रंथाचा आरंभ व शेवट, त्यातील प्रतिपाद्य विषय (वारंवार चर्चिलेला विषय), त्यातील नवीन स्वतंत्र मांडणी, अर्थवाद व निष्कर्ष हे ग्रंथाचा साकल्याने विचार करण्यासाठी निकष आहेत.

ज्ञानदेवांनी ग्रंथारंभी केलेले मंगलाचरण व सर्व ग्रंथ समाप्त होताना विश्वात्मक देवाजवळ मागितलेले पसायदान हे ज्ञानदेवांच्या प्रतिभासंपन्नतेचे श्रेष्ठ अलंकार आहेत. स्वसंवेद्य ॐकाराचे नमन, अभिनव वाग्विलासिनी, विश्वमोहिनी शारदेचे स्तवन व अभिलषित पुरवणारा पूर्णकाम गुरु निवृत्तीनाथ यांना वंदन केले आहे; हे उचितच आहे. नाथसंप्रदायात गुरूचे महत्त्व अनन्यसाधारण मानले जाते. ज्ञानदेवांच्या शब्दांत सांगायचे तर,

मज हृदयीं सद्गुरु । तेणें तारिलों हा संसारपुरु ।
म्हणउनि विशेषें अत्यादरु । विवेकावरी ॥१–२२

सद्गुरूकडून प्राप्त झालेल्या या 'विवेका'चीच लावणी करण्याचा ज्ञानदेवांचा हेतू होता, हे त्यांनी महाभारताचे माहात्म्य सांगताना स्पष्ट केला. महाभारत म्हणजे 'अभिनव उद्यान । विवेकतरूचें ॥' (१–२८) त्यातील भगवद्गीतेसारखा ग्रंथ हाच त्यांचे उद्दिष्ट सफल करण्यास त्यांना सुयोग्य वाटला. लोकजीवनातील अंधश्रद्धा व अविचार नाहीसा करून त्यांना कार्याकार्याची चिकित्सक व डोळस दृष्टी द्यावी, जीवनातील प्रेय व श्रेय यांचा विचार करण्याची क्षमता निर्माण करावी, हाच ज्ञानदेवांचा हेतू गीताटीका लिहिताना असावा. कारण,

फिटो विवेकाची वाणी । हो कानामना जिणी ।
देखो आवडे तो खाणी । ब्रह्मविद्येची ॥१३–११६०

ही विवेकजागृती लोकभाषेतून – मराठीतून करून ज्ञानेशांनी त्या मार्गातील संस्कृत भाषेचा अडसर दूर केला. मराठी भाषेला प्रतिष्ठा दिली. तिचे 'अमृताते चुकी ठेवी । गोडिसेपणें' असे सामर्थ्य प्रचीतीस आणून दिले.

ज्ञानदेवीच्या या ग्रंथारंभी घेतलेल्या भूमिकेला साजेसा उपसंहार कलशाध्यायात आढळतो. गीतेचा अठरावा अध्याय 'गीतारत्न प्रासादा'चा कळस होय. त्या अध्यायात – 'गीता वैष्णवप्रासादु'च्या शेवटी कवीने विश्वात्मक देवाजवळ जे पसायदान मागितले आहे त्यातच मंगल जीवनाचा भव्योदात्त आलेख रेखाटला आहे. हे पसायदान अनेक दृष्टींनी अ–पूर्व आहे. वेदांपासून नंतर लिहिलेल्या ग्रंथांतून जग व जीवन समृद्ध संपन्न व "भद्र' असावे, व्हावे अशी आकांक्षा अनेक ग्रंथकर्त्यांनी ग्रंथाच्या शेवटी व्यक्त केलेली आहे व जगन्नियंत्याने ती पुरी करावी, अशी प्रार्थना केली आहे. परंतु ज्ञानदेवांना जगाचे जे नितांतसुंदर रूप भावले, जीवनाच्या प्रत्येक अंगाचा अनुपम रंग त्यांनी कल्पिला, तो अतुलनीय आहे. सारे प्रज्ञावन्त, विचारवंत,

शास्त्रज्ञ, वैज्ञानिक व प्रतिभावन्त क्रान्तदर्शी कवी यांच्या सुंदर स्वप्नांना पडावे असे हे स्वप्न आहे.

जग हे मंगल, निरामय व कल्याणप्रद व्हायला हवे म्हणजे त्यातील मानवाच्या हीन वृत्ती नाहीशा व्हायला हव्यात व परस्परातील संबंध प्रेमाचे व आदराचे असायला हवेत. समाजजीवन विशुद्ध व निर्मल होणे व जीवनाला आचार-विचारांत उच्च अधिष्ठान लाभणे, हीच समष्टिजीवनाची यथार्थ दृष्टी ज्ञानेशांच्या पसायदानात दृष्टोत्पत्तीस येते. खलांची कुटिलता नाहीशी होऊन त्यांना सत्कर्मीत रुची वाटावी, प्राणिमात्रांत प्रेमभाव वाढावा, सर्वत्र कर्तव्यबुद्धीचे अधिराज्य होऊन पापरूपी अंधार नाहीसा व्हावा. सर्वांना आपापले ईप्सित प्राप्त व्हावे. संपूर्ण कल्याण करणाऱ्या, हितैषी ईश्वरनिष्ठ सज्जनांचे प्रेम व सान्निध्य सर्वांना मिळून त्रैलोक्य सुखी व्हावे. अशा जीवनाच्या संकल्पनेत ज्ञानदेवांनी इतर आदर्शवादी विचारवंतापेक्षा आपली व्यापक भूमिका मांडली आहे. फक्त भौतिक सुखभोगांनी मानवी जीवन पूर्ण होत नाही, त्याला उच्च जीवनमूल्यांची भक्कम बैठक आवश्यक असते. आज भौतिकदृष्ट्या समृद्ध व संपन्न देशांतील जीवनाचे अवलोकन केल्यावर हे विशेषच ध्यानात येते.

ज्ञानदेवांनी पसायदानात चितारलेल्या आदर्शाच्या प्राप्तीसाठी व्यक्तीने आपली जीवनयात्रा कशी चालवावी, आपले आचार विचार कोणते ठेवावे, याची चिकित्सा केली आहे. आपल्या भोवतालच्या जनसामान्यांना दिशा दाखवावी, 'बांधलीं सोडित । बुडालीं काढित । सांकडी फेडित । आर्तांचिया' (१६-२०१) या कारुणिक बुद्धीने त्यांनी समाजविकासासाठी सद्गुणांचे महत्व सांगितले. व्यक्तीच्या आत्मोद्धाराच्या साधनेतून व्यक्तिविकासावरोबरच समाजविकासही साधण्याची प्रेरणा त्यांनी दिली. या दृष्टीने त्यांनी १३ व्या अध्यायात 'अमानित्वमदंभित्वमहिंसा...' या व यापुढील श्लोकांच्या संदर्भात व सोळाव्या अध्यायात दैवी संपत्तीचे वर्णन करताना त्यांनी समर्पक दृष्टांत देऊन सद्गुणांचे सविस्तर वर्णन केले. पारमार्थिक ध्येय हे समाजधारणेला विद्रोही नाहीच; उलट अशा ज्ञानी मानवांचा आदर्श सामान्य व्यक्तींना मार्गदर्शक ठरतो. या विचारांचा प्रत्यय ज्ञानदेव कर्म, ज्ञान व भक्ती या विषयावर विवेचन करतात, तेव्हा वारंवार येतो.

प्रत्येक व्यक्तीने आपापल्या वर्णविशेषाप्रमाणे प्राप्त कर्तव्ये व कार्ये पार पाडणे हे महत्त्वाचे आहे. धर्माच्या नावावर रूढ असणाऱ्या व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा, उपासतापास किंवा अनेक क्षुद्र दैवतांची पूजाअर्चा करणे या साऱ्या गोष्टी निरर्थक आहेत, असे ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्यायात ज्ञानदेवांनी आवर्जून सांगितले आहे.

तुम्ही व्रतनियमु न करावे । शरीराते न पीडावें ।
दूरीकें हि न वचावे । तीर्थासि गा ॥
योगादिक साधनें । साकांक्ष आराधनें ।
मंत्रयंत्र विधानें । झणीं करा ।
देवतांतरा भजावें । हे सर्वथा कांहीं न करावें ।
तुम्ही स्वधर्मयज्ञीं यजावें । अनायासें ॥ ३-९१

या ओव्यांत स्वधर्म हाच यज्ञ असे स्पष्ट करून यजनाचा मूळ यज्ञसंस्थेशी निगडित असलेला विचार स्वकर्तव्यपालनाशी जोडून दिला.

हें संपत्तिजात आघवे । हवनद्रव्य मानावें ॥
मग स्वधर्मयज्ञे अर्पावें । आदिपुरुषीं ॥ (३-१३०)

आपली सारी संपत्ती ही यज्ञसामग्री समजून परमेश्वरार्पण करून जो जगतो त्याला 'गृहादिक आघवे । ते कांही नलगे त्यजावें' गृहत्याग करण्याचे कारण नाही. कारण, इतर सांसारिकांप्रमाणे त्याला 'फळहेतूची चाड नाहीं' म्हणून कर्माचे वंधनही नाही; परंतु ते कर्म आचरीत असता वृत्ती निर्ममत्वाची असावी तरीही कृतीत उदासीनता नसावी.

तरी स्वाधिकाराचेनि नावे ।
जें वांटिया आलें स्वभावें ॥
ते आचरे विधिगौरवें ।
शृंगारोनि ॥ (१८-२००)

किंवहुना मानवाने आपल्या साऱ्या कृतींचे रूप म्हणजे Work is worship असे मानावे, हेच तत्त्व कर्मयोगासंबंधी विवरण करताना ज्ञानेश म्हणतात-'कर्मे ईशु भजावा' (१८ १४४४).

ज्ञानेशांनी 'ज्ञानाचेनि पाडें । पवित्र न दिसे,'॥ असे ज्ञानाचे महत्त्व स्पष्ट करताना त्यांची भूमिका

मी अविवेकाची काजळी ।
फेडूनि विवेकदीप उजळी ॥ (४-५४)

अज्ञानाचा नाश करून चांगले-वाईट पारखण्याची 'आंतुवट वस्तुविचार' करण्याची क्षमता जोपासावी, असे म्हटले आहे. 'ज्ञान पैं गा बरवें' कारण ते

'उन्मेषनेत्रींचे अंजन' आहे व त्यामुळेच योगिजनांना आत्मज्ञान होते. नाहीतर,

> एऱ्हवि बोधा आलेनि ज्ञानें ।
> जरी ज्ञेय न दिसेचि मनें ॥
> तरी ज्ञानलाभुही न मतें ।
> जाहला सांता ॥ १३.६२५

या आत्मज्ञानाचे मर्म –

> 'तें हें माझें परम । साचोकारें निजधाम'
> (८-२०३)

हा पुनः जन्म न येता परमेश्वराशी एकरूप होण्याचा आहे.

ज्ञानदेवांना ज्ञानाचे महत्त्व वाटते ते भक्तियुक्त असते तेव्हाच –

> जयां भक्तीची येतुली प्रीति ।
> जे कैवल्याते परीते सर म्हणती ।
> जयांचिये लीळेमाजी नीति ।
> जियाली दिसे ॥१.१९२

नवव्या अध्यायात भक्तीचे महत्त्व सांगताना ज्ञानी भक्त

> 'ऐसे माझेनि नामघोषें ।
> नाहीचि करीति विश्वाची दुःखें
> अवघे जगचि महासुखें ।
> दुमदुमित भरलें ॥९-२००

साऱ्या जगातील प्राणिमात्रांना नामसंकीर्तनाने सुखी करतो, त्यांचा दुःखपरिहार करतो, कारण त्याची सारी जीवनचर्या ही

> 'जगाचिया सुखोद्देशें । शरीरवाचामानसें ।'

दुसऱ्याला उपद्रव न देता जगण्याची असते. ईश्वराची प्रेमाने भक्ती करणारा लहानथोर, श्रेष्ठकनिष्ठ कोणीही असो, तो ईश्वररूपच होतो.

> म्हणोनि कुळ जातिवर्ण । हे आघवेचि अकारण ।
> एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक॥ ९–४५६

कारण जगात 'जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत' सर्व प्राणिमात्र परमेश्वररूपच आहे. ही प्रतीती एकदा झाली मग त्याला 'मग मी तो हें आघवें। एक मीचि आथी स्वभावें' व 'तैसा मी एक वांचूनि कांहीं। मग भिन्नाभिन्न नाही' असेच परमात्म्याचे स्वरूप सर्वत्र जाणवते; नव्हे, तो त्यात एकरूप होतो. त्याला सर्व विश्व हे आपलेच घर आहे–

> हें विश्वचि माझें घर। ऐसी मति जयाचा स्थिर
> किंबहुना चराचर । आपण जाहला ॥१२–२१३

अशा महात्म्यांच्या जीवनाचा आलेख ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत रेखाटला. ते स्वतःच त्यांपैकी एक असल्यामुळे त्यांनी समकालीन व आज सातशे वर्षे सारे जीवन संस्कारित केले.

फुलराणी

तुला काय गरज फुलांची ?
फुलाच्या पाकळीसम तुझी कांती
गोऱ्या गालावर फुलतात लज्जेचे गुलाब
त्याहून मौल्यवान आहे कां हे गुलाब ?

तुला गरज नाही कृत्रिम सौंदर्याची
देवाने स्वखुषीने दिली तुला देणगी सौंदर्याची
तू लाव फुले पण माझी तूच फुलराणी
किती किती गाऊ तुझ्या सौंदर्याची गाणी ?

पण जपून अस, या जगापासून
दुष्ट जगी मिळणार नाही प्रितीचा लेश
प्रीतीच्या मागे लागू नको पदरी येईल अपयश
कोणी तुला घेतील, कुचकरून टाकतील.

जपून अस, सुगंध आपला चोरून अस
येईल एखादा भ्रमर उधळील तुझा पराग
अशा जीवनाला उरणार नाही अर्थ
म्हणून जपून अस, हे सांगणं आहे सार्थ.

––चारुलता फत्तेखानी

'कशाला काय म्हनूं नहीं?'

नीलिमा कुळकर्णी

आजपर्यंत अनेक पंडितांनी काव्याच्या वेगवेगळ्या व्याख्या करून काव्य म्हणजे काय? हे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. कांहीनी काव्य म्हणजे जीवनभाष्य, तर कांहीनी काव्य ही जीवनापेक्षा मूलतः वेगळी प्रक्रिया, असे मत मांडलेले दिसते. काव्यासंबंधीचे दोन दृष्टिकोनच ह्या भूमिकेतूनच निर्माण झालेले दिसतात. म्हणूनच काव्याकडे कोणी लौकिककवादी दृष्टिकोनातून पाहिलेले आहे तर कोणी अलौकिकवादी दृष्टिकोनांतून, पण अस्सल कवितेची निर्मिती ही जीवनांतूनच होत असते. कलेतील अनुभवाची पाळेमुळे जीवनाच्या भूमीतच रुजलेली असतात. जीवनातील अनुभवच कलाकृतीत परिवर्तित होत असतो. हा अनुभव परिवर्तित होत असतांना मात्र कलावंताला सौंदर्याचा प्रवास सहजतेने करावा लागतो. कारण ह्या सौंदर्यमय प्रवासातूनच जीवनाभूतीचे दर्शन तो रसिकाला घडवीत असतो. एका अर्थाने त्याने निर्माण केलेली कलाकृती ही आत्मसंवादासारखी वाटते पण तिचे दुसरे टोक जीवनाच्या अस्सल अनुभूतीचे दर्शन घडवीत असते.

वहिणाबाई चौधरी ह्यांची 'कशाला काय म्हनूं नही?' ही कविता वाचून माझ्या मनावर हाच परिणाम झाला. कविता निर्माण होण्यापूर्वी व कविता निर्माण होत असतांना – पर्यायाने वाङ्मयाची निर्मिती होत असतांना – दोन गोष्टी असणे आवश्यक आहे असे 'मर्ढेकरांनी' सांगितले आहे. पहिली लेखनपूर्व आत्मनिष्ठा व दुसरी लेखनगर्भ आत्मनिष्ठा. बहिणाबाई ह्या उत्कृष्ट दर्जाच्या कलावंत असल्याने त्यांच्या काव्यांत आत्मनिष्ठेचे माप मोठ्या प्रमाणांत असलेले दिसून येते. ह्या कवितेत 'आदर्श मनुष्य' कोणाला म्हणावे? हे वहिणाबाईंनी सहजतेने सांगितलेले आहे. हे सांगण्यापूर्वी वा अनुभव घेण्यापूर्वी बहिणाबाईंनी जीवन भिन्नभिन्न पातळ्यांवरून अतिशय जवळून पाहिले आहे असे वाटते. त्यांच्या अनुभवांत विलक्षण अपरिहार्यता आहे. कारंजाचे पाणी जसे सारखे संतत वाढत रहावे – तसे बहिणाबाईंच्या काव्यांतील अनुभवाबाबत वाटते.

'बिना कपाशीनं उले, त्याले बोंड म्हनूं नहीं'
हा अनुभव कवयित्रीने जीवनाच्या अर्थगर्भ अनुभवांतून सहजतेने सांगितला आहे. वहिणाबाईंची परमेश्वरावर अनन्य श्रद्धा आहे. त्या श्रद्धेतून परमेश्वराचे नांव ज्याच्यायोगे घेतल्या जात नाही त्याला तोंडच म्हणायला वहिणाबाईची तयारी नाही. म्हणून त्या म्हणतात—

'हरिनामाइना बोले
त्याले तोंड म्हणूं नहीं ।।'

कलावंतांच्या ठिकाणी सृष्टीतील आसमंतांतील सौंदर्य सूक्ष्मदृष्टी असावी लागते. वहिणाबाईंचे निरीक्षण ह्या कवितेत किती सूक्ष्म व अंतर्भेदी स्वरूपाचे आहे! त्यांच्या ह्या सूक्ष्म व अंतर्भेदी निरीक्षणांतूनच त्या एखादा महान सिद्धान्त सांगून जातात. जे पान वाऱ्याने हालत नाही त्याला पानच म्हणायची त्यांची तयारी नाही व ज्या कानांनी परमेश्वराचे गुणगान आपण ऐकत नाही त्याला कान म्हणू नये असे स्पष्ट सांगितले आहे. परमेश्वरावरील ही नितांत श्रद्धा वहिणाबाईंच्या ह्या कवितेतील ओळीओळीतून दिसून येते.

'— नही देवाचं दर्सन
त्याले डोयां म्हनूं नहीं ।।'

ह्या ओळीतही हाच भाव प्रकट झाला आहे. श्रेष्ठ कलावंत हा मानवतावादी असतो. सवंध ब्रम्हांडाची जाणीव हीच त्याच्या काव्याची आधारभूत घटना असते. ह्या वैश्विक जाणीवेमुळेच तो महान कलावंत ठरलेला असतो. बहिणाबाईंच्या कवितेत ही वैश्विक जाणीव किती मुक्तपणे वाहतांना दिसून येते! अशा कितीतरी रात्री की ज्या उपाशीपोटी गरिबांना घालवाव्या लागतात. त्यांना खऱ्या अर्थाने सुखी लोकांच्या 'रात्र' ह्या शब्दाला प्राप्त होणारा अर्थच प्राप्त होत नाही. अशा रात्रींना रात्र म्हणण्याची तयारी

नाही. दानासाठी आपला हात सतत पुढे गेला पाहिजे अशी त्यांची मानवतेवरची श्रद्धा आहे.

बहिणाबाईच्या ह्या कवितेतून लेखनपूर्व आणि लेखनगर्भ आत्मनिष्ठा जशी दिसते तसे ज्ञानात्मक व वैचारिक तादात्म्यही दिसून येते. उदा० गावामध्ये असणारी पण त्यांत पाणीच नसणारी विहीर, घावा ऐकून अडलेला पाय, विहरीतून पाणी न घेता रिकामीच येणारी मोट, कृष्णाला न ओळखणारी गाय. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. या उदाहरणांतून जीवनातील अभावाचे दर्शन कवयित्रीने किती सूचकपणे दाखविलेले आहे. कधी कधी हे तादात्म्य वैश्विक भावसत्याचे रूप घेऊन येते. तेव्हा तर तिच्यातील अनुभवाची उभारी वेगळेच तेज दाखवून जाते. अशा वेळी बहिणाबाईंच्या अनुभवाला उपहास व उपरोधाची धार चढते. उदाहरणार्थ –

– 'येहेरींतून ये रीती
तिला मोट म्हनूं नहीं
केले सोताची भरती
त्याला पोट म्हनूं नहीं ॥'

बहिणाबाईंचे हे निरीक्षण व तादात्म्य 'जीले नहीं फुटे पान्हा, तिले माय म्हनू नहीं ॥' अशा शब्दांतून व्यक्त होतांना दिसते.

आपला काव्यविषयक अनुभव आपल्या सहज अभिव्यक्तीने बहिणाबाईने सौंदर्यमय केलेला आहे. हा अनुभव लौकिकातला असला तरी आपल्याला लौकिकाच्या पातळीवर राहू देत नाही. तो आपल्याला लौकिकभिन्न अशा अलौकिक पातळीवर घेऊन जातो व फार मोठे कठोर सत्य सांगून जातो.

'– इके पोटच्या पोरीले
त्याले बाप म्हनूं नही !
जिची माया गेली सरी
तिले माय म्हनूं नही,
इमानाले इसरला
त्याले नेक म्हनूं नहीं
जल्मदात्याले भोंवला
त्याले लेक म्हनूं नही ॥'

इत्यादी ओळीतून जीवनाचा बहुविध पातळीवरचा पण एका कठोर सत्याचा भावस्पर्शी प्रत्यय बहिणाबाई घडवितात असे दिसते. बहिणाबाईंची ही कविता विलक्षण साधी कविता आहे. त्यांच्या या कवितेत कल्पानाचमत्कृती नाही. शब्दांचा सोस नाही. अनुभवाला अधिक सुंदर लयदार व कलात्मक करण्याचा हव्यास नाही. आहे ते अनुभवाचे सच्चेपण व त्याचा अतिशय प्रांजळ सहज आविष्कार. उत्कृष्ट कवितेसाठी शब्दांच्या आतषबाजींची लयदारपणाची जरुरी नसते. खरे काव्य त्या अनुभवांत असणाऱ्या चैतन्यामुळेच आपला स्वतःचा असा आकार निवडीत असते. अनुभवांत कस असला की काव्यामध्ये सौंदर्य हे सहज निर्माण होते ही गोष्ट बहिणाबाईंच्या ह्या कवितेने स्पष्ट होते. बहिणाबाईंची कविता आपल्या मनावर एकाच वेळी भावानुभवाच्या सौंदर्याचा व चिरंतन वैचारिकतेचा एकाच वेळी सारखी साक्षात्कार घडवित असते. एका समृद्ध व्यक्तिमत्वाच्या सहवासांत आपण कविता वाचत असतांना असतो. हे व्यक्तिमत्वच आपल्याला जीवनाच्या नवनव दिशा दाखवीत असते.

मी

मी : एक निर्दय देह.
जो शोषून घेत आला रक्त
तिचे, तुझे, त्याचे
आता रक्तच संपलं.

देहांचीही विनाशी उद्भवली,
आता मीच एक निर्दय तलाव
—ज्यात बुडतात फक्त माफे डोळे.

—यशोधरा साठे

विदर्भ कन्या – राजमाता जिजाबाई

सौ. वसुधा देशमुख

शिवकालीन विदर्भाकडे सहज दृष्टिक्षेप टाकला तरी दोन तेजस्वी स्त्री रत्ने आपल्या तेजाने तळपताना दिसतात. राजमाता जिजाबाई अन् रायबागन सावित्रीबाई. एक शिवछत्रपतीची माता तर दुसरी त्यांची धर्मकन्या. पहिलीने संकटांच्या वादळवाऱ्याशी सतत झुंज घेऊन आपली अस्मिता कायम राखली, एकुलत्या एक पुत्रास वेळोवेळी मृत्यूच्या दाढेत ढकलून त्याचे करवी मोडलेले तख्त पुन्हा मांडून दाखविले व आपल्या कर्तृत्वाने ही बाई कुंती, विदुलेच्या पंक्तीत जाऊन बसली !

दुसरीचेही कर्तृत्व कमी नाही. इतिहास पटावर तिनेही झुंज मांडून दाखविली. वादळवाऱ्याशी झुंजण्याइतपत बळ तिच्या जवळही होते. तेजस्वीताही तशीच होती. फक्त एकच, मुगली राजसत्तेला कुर्निसात करावा लागल्याने ही तेजस्वीता काहीशी कलंकित झाली त्यामुळेच कुंती विदुलेच्या पंक्तीत हिला स्थान नाही.

जिजाबाई ह्या विदर्भाच्या कन्या. पण त्यांनी संसार मांडला देवगिरीपासून सह्यगिरीपर्यंत. सावित्रीबाई मात्र विदर्भाच्या स्नुषा. ह्या आंध्रकन्येच्या भाळी वाशीम–माहूरचा विदर्भपरिसर आला. मौज अशी की दोघीही देशमुख. दोघींचेही कर्तृत्व जगदंबेच्याच कृपाप्रसादाने फळले, फुलले. पहिलीने शिवनेरीच्या शिवाईला गळ घातली, दुसरीने माहूरच्या रेणुका देवीला साक्षी ठेवले. शिवकालीन वैदर्भीय इतिहासाच्या वाटा चाचपडताना स्त्रीकर्तृत्वाचे हे दोन डवरलेले वृक्ष कुणाही अभ्यासकाचे लक्ष आकर्षून घेतात.

त्यातही जिजाबाईचे कर्तृत्व असामान्य आहे. ते स्वयंभू आहे. प्रारंभीचे त्यांचे जीवन म्हणजे दुःखांची वजाबाकीच म्हटली पाहिजे. सासर माहेर यामध्ये तेढ उत्पन्न झाली, माहेर उध्वस्त झाले, पतिविरह सहन करावा लागला. पण आघातांनी त्या अधिक कणखर होत गेल्या. विपरीत परिस्थितीतूनच त्यांच्या दृढ ध्येयवादाने जन्म घेतला. शिवजन्मानंतर त्यांचा कणखर ध्येयवाद ठळकपणे प्रतीत होताना दिसतो.

त्यांनी लहानग्या शिवबाला रामायण महाभारत शिकविले. हे त्यांचे प्रारंभीचे कर्तृत्व. रामायण महाभारत सर्वच माता, पुत्रांना सांगत. मग शिवबा अन्यत्र का घडला नाही ? ह्या प्रश्नाच्या उत्तरातच जिजाबाईंचे पहिले कर्तृत्व दडलेले आहे. जिजाबाईंनी रामायण महाभारत शिवबाला शिकविले. पण त्याला ते शिकविण्यापूर्वी त्या स्वतः ते 'शिकल्या' होत्या. इतरांनी ते ग्रंथ केवळ वाचले होते ! वाचणे आणि शिकणे ह्यात फरक आहे. वाचलेले पचवावे लागते तेव्हा शिकले जाते. हे पचवताना स्वतःचे अनुभव सांगाती असतात. कशासाठी शिकायचे हेही स्पष्ट झालेले असते. आणि असे शिकलेलेच दुसऱ्यावर संस्कार करू शकते. जिजाबाई रामायण महाभारत शिकल्या होत्या याचा अर्थ पुत्रप्रेम बाजूला सारून रावणवधार्थ कोवळ्या वयातील रामचंद्राला वनात पाठविणारी कौसल्या त्यांनी आत्मसात केली होती. द्रौपदीची पदोपदी विटंबना होत असताही युद्धविन्मुख होणाऱ्या पांडवांना विदुलेचा ज्वलंत आदर्श सांगणारी राजमाता कुंती त्यांनी मनोमन समजावून घेतली होती.

जीवन अनिश्चिततेच्या खाईत लोटून स्वराज्याचे सुंदर स्वप्न पाहणाऱ्या जिजाबाईंना हे कुंती–विदुला–कौसल्येचे आदर्श समोर ठेवले पाहिजेत असे उत्कटपणे वाटले अन् मग इतर कोणी तो आदर्श समोर ठेवावा हे सांगण्याच्या भानगडीत न पडता त्यांनी स्वतःपासूनच सुरुवात केली इथे त्यांचे मोठेपण आहे ! रांझ्याच्या पाटलाचे व्यभिचारकर्म केल्याबद्दल हातपाय तोडणारा शिवबा, स्वराज्यात स्त्रीत्वाची प्रतिष्ठा प्राणपणाने जोपासणारा राजा शिवछत्रपती हे जिजाऊ साहेबांच्याच डवरलेल्या कर्तृत्वाचे अमृतफळ आहे !

कुंती विदुलेचा आदर्श समोर ठेवणारी ही शिवबाची आई मग जेव्हा आपण इतिहासाच्या डोळ्यांनी

अनुक्रमणिका

पाहतो तेव्हा ह्या वैदर्भीय स्त्रीरत्नाची आभा थक्क करून सोडते.

शिवनेरीवर मातीच्या हत्तीघोडयांशी खेळणारा शिवबा पुण्याच्या लालमहालात जिवंत हत्तीघोडयांशी खेळू लागला तेव्हा शिवनेरीवरील जिजाबाईचे स्वप्नाळू मातृत्वही डोळस होऊ लागले. स्वराज्यनिर्मितीच्या प्रारंभीच १६४८ मध्ये आदिलशहाने शहाजीराजांना गिरफदार केले. त्यावेळी जिजाबाई डळमळल्याचा वा ध्येयापासून विचलीत झाल्याचा पुरावा जसा आढळत नाही तसाच अफझलखानासारखा जातीचा दुर्योधन महाराजांवर चालून आला त्यावेळी पुत्राला शरणागतीचा भेकड उपदेश त्यांनी केल्याचाही पुरावा कुठे दिसत नाही. उलट विदुलेच्या क़रारीपणाने ही आई पुत्राच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली. संभाजीचे (थोरल्या पुत्राचे) उसने घेणे, हुशारीने काम करणें हाच आदेश तिने पुत्राला दिला. प्रतापगड युद्धातील विजयी महाराज जिजाबाईच्या भक्कम आधारातून घडलेले आहेत हे सांगणारा पुरावा अज्ञानदास शाहिराचाच आहे. तो म्हणतो,

राजगड राजाला प्रतापगड जिजाऊला
धन्य जिजाऊचे कुशी राजा अवतार जन्मला

यातील प्रतापगड जिजाऊला हे शाहिराचे शब्द मार्मिक आहेत. ते वस्तुस्थितीचे निदर्शक आहेत. प्रतापगडच्या विजयावर जिजाबाईंचाच पहिला हक्क आहे.

पुढे पन्हाळगड प्रसंगी वेढल्या गेलेल्या महाराजांना सोडविण्यासाठी स्वतः आईसाहेब निघाल्या होत्या. त्याहीपेक्षा आग्र्यास महाराज कैदेत पडले असता सतत सहा महिने पराभवाच्या दारुण गडद पार्श्वभूमीवर जिजाबाईंनी स्वराज्य जसेच्या तसे राखून ठेवले होते हे केवढे आश्चर्य! एकही गड तर काय पण तसूभर जमिनही जिजाबाईंनी या प्रदीर्घ कालावधीत गमावलेली नाही. उलट अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हणजे महाराज सुटून येण्याच्या फक्त दोनच दिवस आधी १५ ऑ. १६६६ रोजी 'रांगणा' किल्ला स्वराज्यात दाखल करून नवा मातृकर्तृत्वाचा आदर्श त्यांनी जगासमोर मांडून दाखविला! महाराज आग्र्याहून परतल्यावरही पुढे ३-४ वर्षे जिजाबाई कौलनामे, अभयपत्रे, आज्ञापत्रे पाठवून प्रत्यक्ष राज्यकारभार हाताळताहेत व महाराजांना स्वराज्याची घडी स्थिरस्थावर करून देण्यात सक्रिय मग्न झालेल्या आहेत हे दृश्य त्यांच्या मातृत्वावद्दल खूप काही सांगून जाते!

जिजाबाईची मायेची पाखर अशी शेवटपर्यंत महाराजांवर होती. म्हणूनच महाराज सदैव या मायेच्या पंखांखाली विसावा घेण्यास आतुरलेले असत. आईविना राहणे त्यांना अशक्यप्राय वाटे, आईवेडा छत्रपती हा जिजाऊसाहेबांच्या कर्तृत्वातून घडलेला आहे, आंधळ्या मायेतून नव्हे.

जिजाबाईची माया आंधळी नव्हती हे सांगणारेही पुरावे आहेत. पूर्वीची वतने अनामत करण्याचा राजांनी निश्चय केला व एका फटक्यात मौजे वेहरवडे येथील गणोगवाजीचे इनाम त्यांनी अमानत करण्याचा हुकूम सोडला. (१६५०-५१ चा सुमार) स्वराज्यकार्याच्या प्रारंभीच अशा कृत्यांनी माणसे विचकतील व तुटतील हे जाणून जिजाबाईंनी जातीने वेहरवडयाच्या हुदेदारांना पत्र लिहिले त्यात त्या म्हणतात, 'गणोगबाजी तवीव कसबे पुणे यास वेहेवडे येथे जमीन इनाम खुद्दाचे फर्मान वजीर महाराज व सिऊबा यांच्या खुर्दखताप्रमाणे चालू आहे. सालमजकुरी इनाम अमानत करण्यावद्दल चिरंजीव राजश्री राजे यांचे पत्र आले तरी इनाम अमानत न करता पूर्वीप्रमाणे चालू ठेवणे. चिरंजीव राजश्री सिऊबाचे खुर्दखताचा उजूर न करणे '[१]

आपल्या पत्राची चिंता करू नये असे सांगितले म्हणून महाराज आईवर रुसले नाहीत. त्यांना आईची माया माहीत होती. आईच्या इच्छेबाहेर ते गेले नाहीत. पुढेही हेच धोरण त्यांनी ठेवले आहे. आईसाहेबांचे निवाडे त्यांनी फिरविले नाहीत. १३ जुलै १६५३ चा राजांचा एक कौलनामा उपलब्ध आहे. श्रीक्षेत्र जेजुरीच्या गुरव पुजाऱ्यांची मिरासीची भांडणे सुरू होती. जिजाबाईंनी पूर्वी त्यांचा निवाडा करूनही त्यांनी राजांकडे पुन्हा तक्रार केली होती. त्या संदर्भात महाराज लिहितात, 'गुरवातील मिरासीचा गरगसा (=वाद) होता त्याचा निवाडा मातुश्रीसाहेबी करून सलासाकारणे कौल दिधला आहे. तेणेप्रमाणे साहेबांचाही कौल असे.'[२]

या परस्पर विश्वासातूनच ही मायलेकरे एकजीव झाली. पुत्राबद्दल आईलाही विलक्षण विश्वास वाटत असे. २८-१२-१६६८ चे जिजाबाईंनी पुणे परगण्याच्या बाबाजीराम देशमुखांना, लिहिलेले एक ताकीदपत्र उपलब्ध आहे. त्यात त्या म्हणतात, 'मुकुंद कान्हो देशकु. यांचे तकसिमेस (=हिश्श्यात) तुम्ही खलेल

करिता तरी सालाबादप्रमाणे वागणे. नसते कथले केल्या चिरंजीव काही कोण्हाचा मुल्हाजा करणार नाहीत ऐसे समजोन घसघस न करणे.'[3]

जिजाबाईंची माया डोळस होती तसे अंत:करणही विशाल होते. शिवबावर डोळस मातृप्रेमाचा वर्षाव करणारी ही माता खऱ्या अर्थी लोकमाता होती. अवघी स्वराज्यातील प्रजाच त्यांना पुत्रवत होती. स्वराज्य-सेवेत झिजणारी अवघी कर्तृत्ववान मनगटे त्यांना शिवबाचे ठायी होती.

आईसाहेबांच्या हट्टाखातर कोंढाणा घेऊन देणारा तान्हाजी झुंजीत मारला गेल्याचे कळताच जिजाबाईंचे नेत्र झरू लागले. गुंजणमावळच्या हैबतराव शिळम-करांच्या लेकीचे लग्न गोमाजी नाईक पानसंबळांच्या लेकाशी ठरलेले. पण विचारा हैबतराव जयसिंग-मोहिमेत पार धुतला गेलेला. त्यामुळे लग्नासाठी अळंटळं करू लागला. भिडेपाई तो काहीच बोलेना. जिजाबाईंच्या कानावर ही गोष्ट जाताच त्यांनी त्वरित हैबतरावास सांगावा धाडला, 'तुम्हास होन २५ व ५०० माणसांच्या जेवणाचे सामान दिधले असे लग्न सिध करणे.'[४]

पुण्याची मता नावाची एक मुसलमान कला-वंतीण म्हातारी झाली. अर्थातच तिची आता उपासमार होऊ लागली. जिजाबाईंना हे कळताच त्यांनी तिला तहहयात उदरनिर्वाहार्थ रक्कम (= पेन्शन) बांधून दिली.[५]

वऱ्हाडी दिलदार वृत्तीचा हा आदर्श आई-साहेबांनी अखेरपर्यंत जोपासला व महाराजांमध्ये संस्कारीत केला. विद्वानांना, कलावंतांना, अनाथांना उदार आश्रय देणारे महाराज, गुणांचे कौतुक करणारे महाराज, न्यायी, करारी, प्रजाहितदक्ष शिवकल्याण-राजा हा आईसाहेबांच्याच गुणसंपदेचा वारसा आहे.

महाराजांच्या राज्याभिषेकापर्यंत त्यांच्या पाठीशी सावलीसारख्या जिजाऊसाहेब वावरल्या. क्षणाचीही उसंत घेतली नाही. ४५ वर्षांपूर्वीचे ते भीषण चित्र आता बदलले होते. त्यावेळी सर्वदूर धर्माचे विध्वंसन सुरू होते. आपल्या मायबहिणींची घोर विटंबना रोज-चीच झाली होती. कर्तृत्ववान मनगटे क्षुद्र हेव्यादाव्या-पायी आपापसातच ओरखडे काढीत होती. अन्याय, जुलूम हा युगधर्म झाला होता. देवागिरीकर यादव-राजांचे डोईवरील सुवर्णमुकुट धुळीत पडला होता.

हीन दीन अशा महाराष्ट्राचे हे रूप पाहून रामायण महाभारत वाचणाऱ्या आईसाहेब त्यावेळीच विलक्षण अस्वस्थ झाल्या होत्या. सर्वदूर निराशेच्या काळ्या ढगांनी आशेची चंद्रकोर झाकून टाकली होती. ही चंद्रकोर त्या ढगांना चिरून कलेकलेने वाढली पाहिजे असे आईसाहेबांना तीव्रतेने वाटू लागले. त्यासाठीच ४५ वर्षांपूर्वी शिवनेरीच्या शिवाबाईजवळ त्या हट्ट धरून बसल्या की आई, असा यशवंत पुत्र दे की जो अवघियांचे पांग फेडील. ताठ मानेने जगायला शिकवील. कलेकलेने वाढणाऱ्या वैभवाचा धनी होऊन प्रजेला दिलासा देईल. जुलुमांचा नायनाट करेल, प्रौढप्रताप देवगिरीकर यादवराजांचा सुवर्णमुकुट स्वशिरी धारण करून पूर्वजांचा उद्धार करील. एवढे कर. तुझी खणानारळाने ओटी भरीन. अन् पुत्र सिंहासनावर बसलेला पाहताच तडक तुझ्या सेवेत रूजू होईन. क्षणभरही मोहाने मागे वळून पाहणार नाही की पोराचे वैभव उपभोगायची इच्छा मनी धरणार नाही !

शिवाबाईने आईसाहेबांची मनीची इच्छा पूर्ण केली, ज्येष्ठ शु. १३ आनंदनाम संवत्सर सके १५९६ शनिवार हा तो पुण्यपावन दिवस. महाराज सिंहासनाधीश्वर झाले. आईसाहेबांच्या नेत्रात आनंदाश्रूंची दाटी झाली होती. कानांना मात्र दूरवर टाळमृदंगाचे स्वर ऐकू यायला लागले होते ! मनीच्या अवघ्या आशा फलद्रूप झाल्या. शिवाबाई नवसास पावली. आता नवस फेडला पाहिजे, आता थांबणे नाही ! शिवाबाईचा नवस फेडण्यासाठी मग आईसाहेब संथपणे माघारी वळल्या. आईसाहेबांचा मेणा यावेळी रायगड उतरला तो अखेरचाच !

राज्यभिषेकानंतर अवघ्या १२ व्या दिवशी मध्यरात्री ज्येष्ठ वद्य ९ बुधवारी आईसाहेब कायमच्या शिवाबाईच्या सेवेसाठी प्रसन्न चित्ताने निघून गेल्या.

पाचाडचा भव्य मातृप्रासाद या कर्मयोगिनीने निष्काम वृत्तीने सोडला. त्या प्रासादातील हत्ती घोडे अन् शिवबाने त्यांच्या खर्चासाठी दिलेल्या रकमेचाही फार मोठा भाग, सुमारे २५ लक्ष होनांचे गाठोडे ह्या राजमातेने न खर्चता पुत्राचे पुत्रास परत देऊन टाकले !

इतिहासाने पुन्हा एकवार, धर्मक्षेत्रात विजयी झालेल्या धर्मराजास आशीर्वाद देऊन ईश्वरसेवेसाठी वनवासाचा रस्ता धरणाऱ्या निष्काम कर्मयोगिनी राजमाता कुंतीचे दर्शन घेतले !

● ● ●

काही संदर्भ :–

१. शिवकालीन पत्रसारसंग्रह क्र. ६१४
२. ६४१
३. १२३४
४. ,, १२४४
५. राजमाता जिजाबाई (महाराष्ट्र राज्य प्रकाशन.)

● ● ●

वर्गणीदारांसाठी

- 'युगवाणी'ची वार्षिक वर्गणी रु. १५ (रुपये पंधरा) आहे.
- युगवाणीचे वर्गणी वर्ष एक एप्रिल ते मार्च आहे.
- वर्गणी रु. १५ मनिआर्डरनेच पाठवावी.
- या अंकानंतर युगवाणीचे नूतन वर्ष सुरु होत आहे.
- आपले सक्रिय सहकार्य युगवाणीला लाभावे ही अपेक्षा.
- आपण वर्गणीदार व्हावे आणि आपल्या इष्टमित्रांनाही वर्गणीदार होण्याची सूचना द्यावी.
- एप्रिल ते मार्च या वर्षात कोणत्याही महिन्यात वर्गणी मिळाल्यावर युगवाणीचे अंक मार्चपर्यंतच पाठविण्यात येतील. एप्रिल नंतर नवीन वर्षाची वर्गणी भरावी लागेल. याची नोंद घ्यावी ही विनंती.

––कार्यकारी संपादक

पत्रव्यवहार––
संपादक, युगवाणी
विदर्भ साहित्य संघ,
झाशीराणी चौक, नागपूर ४४००१२

करिता तरी सालाबादप्रमाणे वागणे. नसते कथले केल्या चिरंजीव काही कोण्हाचा मुल्हाजा करणार नाहीत ऐसे समजोन घसघस न करणे.'[3]

जिजाबाईंची माया डोळस होती तसे अंतःकरणही विशाल होते. शिवबावर डोळस मातृप्रेमाचा वर्षाव करणारी ही माता खऱ्या अर्थी लोकमाता होती. अवघी स्वराज्यातील प्रजाच त्यांना पुत्रवत होती. स्वराज्य-सेवेत झिजणारी अवघी कर्तृत्ववान मनगटे त्यांना शिवबाचे ठायी होती.

आईसाहेबांच्या हट्टाखातर कोंढाणा घेऊन देणारा तान्हाजी झुंजीत मारला गेल्याचे कळताच जिजाबाईंचे नेत्र झरू लागले. गुंजणमावळच्या हैबतराव शिळम-करांच्या लेकीचे लग्न गोमाजी नाईक पानसंबळांच्या लेकाशी ठरलेले. पण बिचारा हैबतराव जयसिंग-मोहिमेत पार धुतला गेलेला. त्यामुळे लग्नासाठी अळंटळं करू लागला. भिडेपाई तो काहीच बोलेना. जिजाबाईंच्या कानावर ही गोष्ट जाताच त्यांनी त्वरित हैबतरावास सांगावा धाडला, 'तुम्हास होन २५ व ५०० माणसांच्या जेवणाचे सामान दिधले असे लग्न सिध करणे.'[४]

पुण्याची मता नावाची एक मुसलमान कला-वंतीण म्हातारी झाली. अर्थातच तिची आता उपासमार होऊ लागली. जिजाबाईंना हे कळताच त्यांनी तिला तहहयात उदरनिर्वाहार्थ रक्कम (= पेन्शन) बांधून दिली.[५]

वऱ्हाडी दिलदार वृत्तीचा हा आदर्श आई-साहेबांनी अखेरपर्यंत जोपासला व महाराजांमध्ये संस्कारीत केला. विद्वानांना, कलावंतांना, अनाथांना उदार आश्रय देणारे महाराज, गुणांचे कौतुक करणारे महाराज, न्यायी, करारी, प्रजाहितदक्ष शिवकल्याण-राजा हा आईसाहेबांच्याच गुणसंपदेचा वारसा आहे.

महाराजांच्या राज्याभिषेकापर्यंत त्यांच्या पाठीशी सावलीसारख्या जिजाऊसाहेब वावरल्या. क्षणाचीही उसंत घेतली नाही. ४५ वर्षांपूर्वीचे ते भीषण चित्र आता बदलले होते. त्यावेळी सर्वदूर धर्माचे विध्वंसन सुरू होते. आपल्या मायबहिणींची घोर विटंबना रोज-चीच झाली होती. कर्तृत्ववान मनगटे क्षुद्र हेव्यादाव्या-पायी आपापसातच ओरखडे काढीत होती. अन्याय, जुलूम हा युगधर्म झाला होता. देवागिरीकर यादव-राजांचे डोईवरील सुवर्णमुकुट धुळीत पडला होता.

अनुक्रमणिका

हीन दीन अशा महाराष्ट्राचे हे रूप पाहून रामायण महाभारत वाचणाऱ्या आईसाहेब त्यावेळीच विलक्षण अस्वस्थ झाल्या होत्या. सर्वदूर निराशेच्या काळ्या ढगांनी आशेची चंद्रकोर झाकून टाकली होती. ही चंद्रकोर त्या ढगांना चिरून कलेकलेने वाढली पाहिजे असे आईसाहेबांना तीव्रतेने वाटू लागले. त्यासाठीच ४५ वर्षांपूर्वी शिवनेरीच्या शिवाबाईजवळ त्या हट्ट धरून बसल्या की आई, असा यशवंत पुत्र दे की जो अवघियांचे पांग फेडील. ताठ मानेने जगायला शिकवील. कलेकलेने वाढणाऱ्या वैभवाचा धनी होऊन प्रजेला दिलासा देईल. जुलुमांचा नायनाट करेल, प्रौढप्रताप देवगिरीकर यादवराजांचा सुवर्णमुकुट स्वशिरी धारण करून पूर्वजांचा उद्धार करील. एवढे कर. तुझी खणानारळाने ओटी भरीन. अन् पुत्र सिंहासनावर बसलेला पाहताच तडक तुझ्या सेवेत रूजू होईन. क्षणभरही मोहाने मागे वळून पाहणार नाही की पोराचे वैभव उपभोगायची इच्छा मनी धरणार नाही !

शिवाबाईने आईसाहेबांची मनीची इच्छा पूर्ण केली, ज्येष्ठ शु. १३ आनंदनाम संवत्सर सके १५९६ शनिवार हा तो पुण्यपावन दिवस. महाराज सिंहासनाधीश्वर झाले. आईसाहेबांच्या नेत्रात आनंदाश्रूंची दाटी झाली होती. कानांना मात्र दूरवर टाळमृदंगाचे स्वर ऐकू यायला लागले होते ! मनीच्या अवघ्या आशा फलद्रूप झाल्या. शिवाबाई नवसास पावली. आता नवस फेडला पाहिजे, आता थांबणे नाही ! शिवाबाईचा नवस फेडण्यासाठी मग आईसाहेब संथपणे माघारी वळल्या. आईसाहेबांचा मेणा यावेळी रायगड उतरला तो अखेरचाच !

राज्यभिषेकानंतर अवघ्या १२ व्या दिवशी मध्यरात्री ज्येष्ठ वद्य ९ बुधवारी आईसाहेब कायमच्या शिवाबाईच्या सेवेसाठी प्रसन्न चित्ताने निघून गेल्या.

पाचाडचा भव्य मातृप्रासाद या कर्मयोगिनीने निष्काम वृत्तीने सोडला. त्या प्रासादातील हत्ती घोडे अन् शिवबाने त्यांच्या खर्चासाठी दिलेल्या रकमेचाही फार मोठा भाग, सुमारे २५ लक्ष होनांचे गाठोडे ह्या राजमातेने न खर्चता पुत्राचे पुत्रास परत देऊन टाकले !

इतिहासाने पुन्हा एकवार, धर्मक्षेत्रात विजयी झालेल्या धर्मराजास आशीर्वाद देऊन ईश्वरसेवेसाठी वनवासाचा रस्ता धरणाऱ्या निष्काम कर्मयोगिनी राजमाता कुंतीचे दर्शन घेतले !

● ● ●

काही संदर्भ :–

१. शिवकालीन पत्रसारसंग्रह क्र. ६१४
२. ,, ६४१
३. ,, १२३४
४. ,, १२४४
५. राजमाता जिजाबाई (महाराष्ट्र राज्य प्रकाशन.)

● ● ●

वर्गणीदारांसाठी

- ‘युगवाणी’ची वार्षिक वर्गणी रु. १५ (रुपये पंधरा) आहे.
- युगवाणीचे वर्गणी वर्ष एक एप्रिल ते मार्च आहे.
- वर्गणी रु. १५ मनिआर्डरनेच पाठवावी.
- या अंकानंतर युगवाणीचे नूतन वर्ष सुरु होत आहे.
- आपले सक्रिय सहकार्य युगवाणीला लाभावे ही अपेक्षा.
- आपण वर्गणीदार व्हावे आणि आपल्या इष्टमित्रांनाही वर्गणीदार होण्याची सूचना द्यावी.
- एप्रिल ते मार्च या वर्षात कोणत्याही महिन्यात वर्गणी मिळाल्यावर युगवाणीचे अंक मार्चपर्यंतच पाठविण्यात येतील. एप्रिल नंतर नवीन वर्षाची वर्गणी भरावी लागेल. याची नोंद घ्यावी ही विनंती.

—कार्यकारी संपादक

पत्रव्यवहार—
संपादक, युगवाणी
विदर्भ साहित्य संघ,
झाशीराणी चौक, नागपूर ४४००१२

'रसिक पत्रे'

माननीय डॉ. आष्टीकर,

स. न.

" अध्यक्षीय भाषण वाचावयास मिळाले. वस्तुतः त्याबद्दल आपले अभिनंदन केले पाहिजे. फार सडेतोड-पणाने व साहित्याला योग्य दिशा लावण्याच्या दृष्टीने आपण काही मोलाचे विचार त्यात मांडले आहेत. आपल्यासारख्या लोकाभिमुख साहित्यिकाकडून साहित्य-निर्मितीने लोकजीवन आनंदी व संपन्न होईल असा मला विश्वास वाटतो. "

—मा. मधुकरराव चौधरी
माजी अर्थमंत्री, महाराष्ट्र राज्य

" युगवाणीतील आपले अध्यक्षीय भाषण संपूर्ण वाचले. त्या भाषणाच्या मूळाशी असलेली श्रेष्ठ साहित्याविषयीची आपली भूमिका समुचित आहे. आपण आपल्या भाषणात साहित्य हे साध्य नसून साधन आहे व दलित ही जात नाही, ती अवस्था आहे हे जे मुद्दे प्रतिपादन केले ते मला फार आवडले. अलीकडे प्रसिद्ध होणाऱ्या फॅशनवादी व विकृत्यधिष्ठित साहित्यावर आपण केलेली टीकाही रास्त वाटली. ' साहित्य म्हणजे चित्तशक्तीचे प्रत्ययकारी प्रस्फुरण ', ' साहित्यिकाची जात पहायची नसून साहित्याची जात पहायची असते ', वगैरे आपली वाक्येच मार्मिक आहेत असे नाही तर त्यातून व्यक्त होणारे विचारही उद्बोधक आहेत. "

—डॉ. सुरेश म. डोळके

" युगवाणीच्या ' ज्ञानेश्वर विशेषांकां 'तील लेखांची निवड उचित आहे. अंक संग्रहणीय झालेला आहे. तुम्ही लिहिलेले " माझा ज्ञानीयाचा राजा " हे नाटक मला फार आवडले. तुमचे अध्यक्षीय भाषणही मला अनेक दृष्टीने वैशिष्टयपूर्ण वाटले. " लोकयात्रा मंगल करण्याचा मंत्र म्हणजे वाङ्मय " हा तुमचा विचार मला खूप आवडला. तुम्ही आत्मविश्वासाने व प्रभावीपणे मांडलेले तुमचे विचार व अनुभव, अभ्यास-पूर्ण व वस्तुस्थितिसापेक्ष आहेत. विद्वत्तेबरोबरच सामाजिक कळकळही तुमच्या भाषणातून दिसून येते आजच्या राष्ट्र उभारणीच्या संक्रमणकालात हे विचार मार्गदर्शक ठरतील. "

—मनोहर पंधे
सहसंचालक, समाजशिक्षण व
समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य.

" ज्ञानेश्वर विशेषांक अप्रतीम ! तुमचे ओवी-बद्ध संपादकीय फार आवडले. चांगदेवपासष्टीच्या संस्कृत रूपांतराची मूळ संहिता हे त्या अंकाचे वैभव आहे. साधूंचा लेख आवडला. इतर लेखातील व्यासंग व परिश्रम मूल्यवान वाटले. "

—राम शेवाळकर
प्राचार्य, वणी

" अचलपूर अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण अप्रतीम आहे. इतकं सर्वांग परिपूर्ण, काळाची गरज ओळखणारं भाषण दिलंत याबद्दल अभिनंदन ! प्रत्येक परिच्छेद इतका मार्मिक, त्याचा भाव इतका स्पष्ट शिवाय सहानुभूतीपूर्ण, आविष्कार इतका डौल-दार, रुबाब दाखवणारा — कोणत्या शब्दात प्रशंसा करावी हे कळेनासे झाले आहे. "

—राम डोके, प्राचार्य, शेगाव
सौ. कुमुदिनी डोके

" ज्ञानेश्वर विशेषांक अपेक्षापेक्षाही चांगला काढलाय. प्रत्येकाने संग्रही ठेवावा असाच आहे. "

—य. बा सुतार
वाळपई, गोवा.

" ज्ञानेश्वर विशेषांक पाहिल्यावर व चाळल्यावर प्रसन्नता वाटली. संत ज्ञानदेवांच्या ७००व्या जन्मदिना-

निमित्त अनेक नियतकालिकांचे 'ज्ञानेश्वर विशेषांक' निघाले त्यात आपला युगवाणीचा अंक वैशिष्टचपूर्ण आहे. लेखांची विविधता व दर्जा उत्तम आहे. अंक सर्वांगसुंदर आहे."

— वि. त्र्यं. शेटे
१८७, शनिवार, पुणे ३०.

"आपण अत्यंत परिश्रमपूर्वक उत्कृष्ट विशेषांक काढला हे खास. आपले हार्दिक अभिनंदन."

—मधुकर बल्लाळ
दारव्हा

"या अंकाचे वैशिष्टय म्हणजे ज्ञानेश्वरीच्या बऱ्याच वैदर्भीय अभ्यासकांचे लिखाण यात वाचावयास मिळते."

तरुण भारत, पुणे ७–३–७६

"अंक फारच उत्कृष्ट निघाला आहे. अंकातील प्रत्येक लेख अभ्यासपूर्वक लिहिलेला, माहितीपूर्ण व विचारांना चालना देणारा आहे. विशेषत: 'चांगदेव पासष्टीचे चारशे वर्षांपूर्वीचे संस्कृत गद्यपद्य रूपांतराचा'.कर्ता शिशुकृष्ण आहे हे नवीन वाटले. एकंदरीत अंक संग्राह्य झाला आहे."

— गुणवंत हनुमंत देशपांडे,
वाटखेड

विदर्भकन्या – रायबागीण

गो. मा. पुरंदरे

महाराष्ट्राचा स्वातंत्र्यसूर्य पूर्णपणे अस्तास पोहचला होता. इ. सन १२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीच्या यादवांवर प्रथम स्वारी केली. इ. स. १३१८ च्या सुमारास यादवांचे राज्य पूर्ण बुडाले. काही वर्षे खिलजी आणि तुघलग घराण्यांचा अंमल चालू राहिल्यावर बहामनी राज्ये उदयास आली.

महाराष्ट्रातले खरेखुरे क्षात्रतेज लोप पावले होते. ज्या कुणास तरवार गाजवायची असेल अथवा बुद्धीचे तेज पाडावयाचे असेल, त्याला पाच बहामनी राज्यांपैकी कुणाच्या तरी पदरी राहावे लागत होते. तेथूनच एकमेकांवर तरवार चालवून अथवा मुत्सद्देगिरीचे डाव फेकून जगणे हा स्वाभाविक धर्म झाला होता. स्वतंत्र हिंदूचे राज्य ही एक भाकडकथा समजण्यात येऊ लागली. स्वतंत्र भारतीयांचे राज्य हे दिवास्वप्न म्हणून उरले.

काळाचा प्रवाह अविरत सुरू होता. दिल्लीला मोगल सम्राट अकबराचा पाया स्थिर आणि मजबूत झाला होता. त्यावेळची ही कहाणी. वाशिम अथवा वत्सगुल्म ह्या स्थळी उद्धवराव नावाचा ब्राह्मण आपली वृत्ति सांभाळून होता. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण, संस्कृत, फारशी आणि अरबी भाषांचा चांगला जाणकार होता. पण सरस्वती प्रसन्न असली तरी लक्ष्मी रुसून होती. नेहमी गावच्या पाटलाकडे ताक मागावयास जाणे होत असे. एक दिवस पाटलीण सतापली. निर्भत्सना करून तिनं ब्राह्मणाचा ताकाचा तांब्या त्यालाच फेकून मारला. उद्धवरावला वैताग प्राप्त झाला. नशिब काढण्याकरिता तो औरंगाबादेला निघाला.

भाग्यरेषेवरील काजळी हटली

औरंगाबादेला एका अमीर दिवाणाकडं त्यांनी चाकरी पत्करली. लवकरच दिवाणाला उद्धवरावच्या बुद्धीची चमक दिसून पडली. एकदा दिवाणाने त्याला दिल्लीला आपल्या बरोबर नेले. दरबारात दिवाणाला विचारलेल्या सर्व कूट समस्यांची उत्तरे उद्धवरावांनीच दिली. अकबर बादशहा खूष झाला. त्याने तात्काळ त्यांना माहूर ते वाशिमपर्यंत बावन्न चावडयांची देशमुखी बहाल केली (१५७२). उद्धवरावचे उद्धवराव देशमुख झाले. उद्धवरावांना नौबत, निशाण सर्व काही दरबारातून प्राप्त झाले.

क्षात्रतेज आणि राजनिष्ठा

उद्धवरावचे क्षात्रतेज दिवसेंदिवस झळकू लागले. इ. सन १६१७ मध्ये मलिक अंबर विरुद्ध खुर्रम (शहाजान) ह्यांची तुंबळ लढाई झाली. उद्धवरावांनी खुर्रमकडून तरवार गाजविली. जहांगिर बादशहाने त्यांचा मोठा गौरव केला. नवीन सरदार म्हणून शहाजहान बरोबर ते जहांगीर बादशहाच्या भेटीस गेले. जहांगीरचा मुक्काम धार जवळ मांडवच्या किल्ल्यात होता. तेथे उद्धवरावची आणि जहांगिर बादशहाची भेट झाली. ही भेट मांडवच्या हिंडोला महालात झाली. जहांगीराने त्यांना तीन हजार स्वार व दोन हजार पायदळ अशी पांच हजारांची मनसब दिली. शंभर तोळयाचे सोन्याचे पदक, एक हत्ती व एक घोडा इनाम दिला. उद्धवरावांना 'राजे' हा किताब वंशपरंपरा प्राप्त झाला. उद्धवरावांच्या पित्याचे नाव 'रामजी'. किताब मिळाल्यावर ते 'राजे उद्धवरामजी' झाले. परंतु फारशीत ते 'राजा उदाहेराम' झाले. त्याचेच मराठीत 'राजे उदाराम' झाले.

मुसलमान परंपरेप्रमाणे पुढे शहाजानमध्ये लढाई जुंपली. राजे उदाराम यांनी लखुजी जाधवांबरोबर शहाजानचा पक्ष स्वीकारला. शहाजानला त्यांनी माहूरच्या मजबूत किल्ल्यात आश्रय दिला. शहाजानबरोबर बेगम मुमताजमहाल आणि शहाजादे दाराशुकोह, सुजा आणि पांच वर्षाचा औरंगजेब माहूरच्या किल्ल्यात होते. राजे उदाराम वयाच्या ६६ व्या वर्षी इ. सन १६३२ मध्ये स्वर्गवासी झाले.

अनुक्रमणिका

राजे जगजीवनराम

मुलगा जगजीवनराम ह्याला राजे उदारामचे सर्व किताब आणि मानमरातब दिल्ली दरबारातून प्राप्त झाले. शहाजानच्या वृद्धापकाळी त्याच्या पुत्रांत जोरदार रणकंदन झाले. आग्र्याजवळ ८ मैलांवर दारा आणि औरंगजेबाची जोरदार लढाई झाली. राजे जगजीवनराम हे औरंगजेबाच्या बाजूने लढत होते. त्यात ते कामी आले. राजे जगजीवनरामला दरबारातून २ कोटी ७० लक्ष उत्पन्नाचा मुलूख मिळाला होता. राज्यारोहणानंतर औरंगजेब बादशहाने जगजीवनरामची पत्नी सावित्रीबाई हिला दुखवटयाचे पत्र पाठविले. ते अस्सल पत्र अजून त्यांच्या वंशजाजवळ उपलब्ध आहे. जगजीवनरामचा मुलगा बाबूराव, बापाच्या मृत्यूप्रसंगी लहान होता. अज्ञान मुलगा पाहून जवळच्या हरचंदराय या रजपूत राजाने राजे उदाराम यांच्या मुलखावर स्वारी केली.

सावित्रीबाई – रायबागीण

जगजीवनरामच्या गतधवा स्त्रीने आपले दुःख बाजूस ठेवले. जगजीवनरामानंतर प्रत्यक्ष राज्यकारभार तीच पहात होती. राज्य कारभारातील चातुर्य आणि मुत्सद्दीपणामुळे तिने प्रजेच्या मनात एक मानाचे स्थान प्राप्त केले होते. रजपुतांची तिच्या राज्यावरील स्वारी हे तिच्या शौर्याला आव्हान होते. प्रजेस 'बहिणीची लाज राखा' म्हणून तिने आव्हान केले. गोषातील राणी एकदम रणांगणात सैन्याचे नेतृत्व करू लागली. निशाणास तिने चोळी बांधली. प्रजेत अमाप उत्साहाचे एकदम वातावरण निर्माण झाले. रजपूतांचा पराभव झाला. तिची कीर्ति आलमगीर बादशहापर्यंत पोहचली. त्याने तिला 'रायबागण' आणि 'पंडिता' असे किताब देऊन तिचा गौरव केला. रायबागणचा अर्थ स्त्रीशार्दूल. तंजावरच्या शिलालेखात तिचा उल्लेख 'राजव्याघ्री' असा आहे.

बादशहाची कामगिरी

दिल्ली दरबाराने तिचा पराक्रम ओळखला. शिवाजी महाराजांनी मोगली मुलखात एकच धुमाकूळ मांडला होता. औरंगजेब एक, एक बातमी ऐकून बेजार होत होता. शाहिस्तेखानाबरोबर त्याने शिवाजीचा पुंडावा मोडण्याकरिता अनेक सरदारांची योजना केली होती. औरंगजेबाने त्यांच्याबरोबर रायबागणची योजना केली. करतलबखान आणि अमरसिंह सरदार आघाडीवर होते. त्यांनी शिवाजीचा थेट कल्याण पनवेलपर्यंतचा भाग जिंकून घेतला. रायबागण पाठोपाठ होती. शिवाजी महाराज सर्व परिस्थिती न्याहाळून होते. सह्याद्रीच्या डोंगराळ भागात नेताजी पालकरने करतलबखानास अडविले. तिथून करतलबखान निसटणे अशक्य आहे, हे रायबागणने ओळखले. मराठयांच्या डोंगरातील लढाईची तिला चांगली जाणीव होती. तिने करतलबखानास शिवाजीस शरण जाऊन फौजेचा आणि स्वतःचा जीव वाचविण्याचा सल्ला पाठविला. करतलबखानास अखेरीस तिचा सल्ला पटला. करतलबखान शिवाजीला शरण आला. त्याने जीवदानाची याचना केली.

शिवाजीमहाराज आणि सुरतेवर स्वारी

शिवाजी महाराजांची इ. सन १६७० मध्ये सुरतेवर स्वारी होऊ घातली. उत्तरेत आलमगिर बादशहाला बातमी समजली. त्याने टाकोटाक औरंगाबादेहून मोहोबतखान आणि दाऊदखानाची रवानगी केली. परंतु हे दोन सरदार शिवाजीसमोर कमी पडतील असे वाटल्यावरून आलमगिरकडून रायबागणची नेमणूक खास शिवाजीविरुद्ध करण्यात आली. रायबागण निघाली. बरोबर अज्ञानपुत्र बाबूराव होता. शिवाजी महाराजांनी रणांगणनीती ठरविली. कोणत्याही परिस्थितीत रायबागण आणि औरंगजेबाचे सरदार ह्यांची भेट होता कामा नये. रायबागणला उमरखिंडीत अडविण्याची महाराजांनी आज्ञा दिली. रायबागण झपाटयाने मोहोबतखानच्या सैन्याकडे चालली होती. तिला जाण्यास उमरखिंडीचा केवळ एकच मार्ग होता. खिंडीच्या तोंडाशी आल्याबरोबर सैन्याला मराठयांनी अडविल्याचे दिसून आले. रायबागण लढाईला उभी ठाकली. पण मराठे लढत नव्हते. केवळ ते खिंडीत मोंगलाकडील सैनिक आल्यास त्यास मागे पिटाळीत होते. मराठयांत बेरटीकर देशमुख आपल्या सैन्यासकट उपस्थित होते.

शिवाजी महाराज आणि रायबागण

महाराज मोहबतखानाचा पराभव करून तावडतोब सैन्यासकट उमरखिंडीवर पोहचले. महाराज आल्यावर रायबागण आणि तिचे सैन्य मराठयांनी पूर्ण वेढून घेतले. तरीपण रायबागण मर्दानी पोशाखात

सैन्यात विजली प्रमाणे इकडून तिकडे फिरत होती. लढाईला तोंड लागले, तिने लढाईची शर्थ केली. तिची तरवार सूर्यकिरणात सारखी लखलख करीत होती. कुणासहि कौतुक वाटावे असे त्या रणरागिणीचे कर्तृत्व होते. अखेर मराठयांचा संपूर्ण जय झाला. दोन हजार घोडे, ५ हत्ती, रायबागण आणि तिचा पुत्र बाबूराव शिवाजी महाराजांच्या हाती सापडले. महाराज तिच्या पराक्रमावर बेहद्द खूष झाले होते. केवळ एकच विचार त्यांना बेचैन करीत होता. "अनेक हिंदु ललना भ्रष्ट करणाऱ्या यवनांकडून आणि अनेक हिंदु तीर्थस्थळं आणि देवालयें भ्रष्ट करणाऱ्या आलमगिराकडून एक हिंदु स्त्री, हिंदुपदपातशाहीचे स्वप्न पाहणाऱ्या राजाविरुद्ध रणांगणात उभी आहे!" महाराजांनी तिला मानाची साडी चोळी पाठवून तिचा गौरव केला. पुत्र बाबूराव देशमुख याला पण महाराजांनी वस्त्रे पाठविली. सैन्यास मुक्त करून रायबागणची वऱ्हाडकडं सन्मानाने रवानगी झाली. शिवाजी महाराजांनी स्वतःला तिचा धर्मपिता मानले. रायबागणने देखील स्वतःला शिवाजी महाराजांची धर्मकन्या मानून घेण्यात भूषण मानले.

रायबागणने दिलेले (इ. सन १६५८ चे) अस्सल दानपत्र काळू घराण्याच्या कागदपत्रात उपलब्ध झाले असून, त्यावरूनच तिचे मूळ नांव सावित्रीबाई हे प्रथम उजेडात आले आहे. पत्र मोडी लिपीत आहे. तिची आणि औरंगजेबाची भेट बऱ्हाणपुरला झाली होती. त्यावेळी औरंगजेबाने बाबूराव देशमुखला 'शाहनामा' या ग्रंथाची सचित्र अशी प्रत भेट म्हणून दिली होती. ती प्रत देखील आज त्यांच्या वंशजाकडे उपलब्ध आहे.

कालमहिमा

रायबागणचे जीवन आणि चरित्र तत्कालीन विदर्भातील आणि महाराष्ट्रातील परिस्थितीचे सुंदर निदर्शक आहे. संपूर्ण मुलुख गुलामगिरीच्या जोखडात अडकलेला असताना साहस, पराक्रम आणि मुत्सद्देगिरीसारख्या उदात्त गुणांची कशी माती होते आणि हेच गुण राष्ट्राच्या शृंखला दिवसेंदिवस मजबूत करण्यास कसे सहाय्यभूत होतात हे रायबागणच्या चरित्रावरून कळते. राष्ट्रनिष्ठा, समाजनिष्ठा ह्यापेक्षा स्वामीनिष्ठा मध्ययुगात अत्यंत प्रखर होत्या, हीच गोष्ट सत्य होय.

तरीपण प्राचीन काळापासून विदर्भात निर्माण झालेल्या लोपामुद्रा, रुक्मिणीपासून छत्रपती शिवाजीची जिजामाता आणि थेट वाकावाईपर्यंत ज्या कर्तृत्ववान् स्त्रिया निर्माण झाल्या, त्यात 'पंडिता' रायबागणचे नांव निश्चितच पहिल्या पंक्तीत राहील.

× × ×

झोपाळ्यावरचे गाणे

(कोरकू महिलेचे गीत)

कोरकू, विदर्भाच्या सातपुड्यातील एक बोली. तिला लिपी नाही. बोल मात्र रसिकांच्या हृदयावर चित्र कोरून जातात – कल्पनाविलास निसर्गाइतकाच स्वाभाविक सरळ पण मनभावन! तालवलय लाजवाब!

कुंवाडा वदडाजा लुखुडे जा । कुंवाडा वदडजा लुखूडे ।।
झेरेमेरि कोयोनि हेएन मजा । झेरेमेरे कोयोनि हेयेन ।।
झेरेमेरि कोयोनि हेएन कजा । झेरे मेरे डा–नि घमागे ।।
झेरेमेरि डा–नि घमागे जा । गांगुल गाडन डो आदिमरे ।।
गांगुला गाडनमडो अडी मजे । वंबुजा काकुमजा पेडे जे ।।
वंबुजा काकुमजा पेडे जे डो । सोना मजा मास्त मजा पेडे जे ।।

मराठी भावार्थ—आषाढ महिना, एकाएकी मेघ गर्जायला लागतात! झरझर वाहतो वारा; झिमझिम पडू लागतात सरी! किती पाऊस! गांगुल नदीला येतो पूर, दुथडी! एक चिमुकली 'वंबुज' मासळी उसळी मारून येते त्या पुरातून वर! एक मोठा सोनेरी मासाहि येतो मागोमाग वर! 'भिवला' बंधुराया धोतराचा तणावा धरतो त्यांना पकडायला! इकडे 'मिगलीबाई' साडीची झोळी करून माशाला झेलते. पण तो सटकतो तिच्या पदराला फाडून! प्रियकर असाच निसटतो गं जाळ्यातून!

मुंगी उडाली आकाशी

शकुंतला जोग

नुकतीच एका लग्नसमारंभाला मी गेले होते. वधूनं उंबरठ्यावरचं माप ओलांडून गृहप्रवेश केला आणि आम्ही तरुण असताना अमाप लोकप्रिय झालेलं एक गाणं मला आठवलं. "उंबरठ्यावर माप ठेविले, ते पायाने उलथून आले तुझिया घरी कराया तुझीच रे चाकरी।।" अशा तऱ्हेचा भावार्थ असलेलं गाणं होतं ते. ते रेडियोवर लागलं की सुखी समाधानी संसाराची स्वप्नं पहाणाऱ्या स्वप्नाळू मुली त्यात हरवून जात. त्यावेळी फारसं कळत नव्हतं. पण आज विचार केला की कळतं, पतीची चाकरी करण्याची स्वप्न पहाणारी स्त्री ही पुरुषप्रधान समाजाचा एक केविलवाणा बळी आहे. तरीही विचार केला की त्यातून एक सत्य डोकावतं. आणि ते म्हणजे, स्त्रीची वृत्तीच मुळात सेवाभावी आहे. एकंदर समाजात पसरलेला अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता, निरक्षरता वगैरेचा अंध:कार कोरड्या कोडग्या डोळ्यांनी बघत त्याला शापत पतीचीच चाकरी करण्यापेक्षा एखादी स्त्रीच लहानशी का होईना पणती लावून प्रकाश आणू शकेल.

इच्छाशक्ती आणि सहजसुलभ करुणा यांच्या जोरावर सामान्य स्त्रीही कशी स्वत:च पणती होऊन पीडितांना वरदान देते ते मला तुमच्या आमच्या सारख्या सामान्य, प्रसिद्धीच्या प्रकाशापासून दूर असलेल्या दोन स्त्रियांच्या जीवनात दिसून आलं. एक म्हणजे अमेरिकेतली वेल्दि फिशर आणि दुसरी इराणमधली नजमा नजाफी.

अमेरिकेसारख्या संपन्न देशात जन्म घेऊनही फिशरबाईंनी चीन व भारतासारख्या मागासलेल्या देशात राहून तिथली निरक्षरता दूर करण्याचं अवघड आणि कंटाळवाणं काम केलं. पन्नास साठ वर्षांपूर्वी चीनमधील यांगत्से प्रांतात मुलींच्या व तरुण विधवांच्या शाळेत ती मुख्याध्यापिका होती. पंचेचाळीस लाख वस्तीच्या त्या इलाख्यात मुलींना शिक्षण मिळत असलेलं एकमेव ठिकाण म्हणजे फिशरबाईंची शाळा. आणि हेच नेमकं तिला खटकत होतं. तिनं चीनचा खूपसा अंतर्भाग दोन लहानशा पायांनी विंचरला, श्रमाची, वेळाची कशाचीच पर्वा न करता. तेथील स्त्रियांना साक्षरतेचं महत्व पटवणं हेच तिच्या तोंडाला काम. पुरुषही यातून सुटले नाहीत. 'तुमच्या बायकांचं शिक्षण म्हणजे धोका नसून सुखी जीवनाचा मोकाच आहे' हे तिनं त्यांना पटवलं. अशातच तिच्या शाळेवर १९११ साली, अस्मानी नाही सुल्तानी नाही, तर चीनमधील जनतेच्या लढ्याचं गंडांतर आलं. आणि त्यात ओल्या बरोबर सुकंही जळालं. तिची शाळा जमीनदोस्त झाली. पण ती इष्टापत्तीच ठरली. कारण बाईंनी पुन्हा अमेरिकेत जाऊन दीड वर्ष राहून पैसे जमवले आणि परतली. 'न निश्चितार्थात् विरमन्ति धीरा:।' या न्यायानं नुसतीच मुलींची शाळाच नाही नाही तर दहा दिवसांच्या शाळा आणि किंडरगार्टन शाळाही सुरू केली. पण सर्वात तिच्या मनाची ओढ निरक्षर विधवांकडे होती. त्यांच्यासाठी तिनं शाळा बांधली. त्यांना नुसतंच साक्षर करण्याचं शिक्षण दिलं जात नव्हतं तर बालसंगोपन, रोगनिवारण यासारखं समाजकार्य करण्याचं शिक्षणही दिलं जात असे.

पहिल्या महायुद्धानंतर तिनं भारतात काम करणाऱ्या अमेरिकन बिशपशी लग्न केलं. आणि ती म्हणते, 'बिशप फिशरशी लग्न म्हणजे भारताशीच लग्न, दोघांशी लग्न करून मी सुखी झाले असं मला वाटतं.' भारतात तर दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता सगळ्याचाच जबडा पसरलेला होता. त्यात आपल्या कार्याचे अर्घ्य ती निरलसपणे देत राहिली. "आम्ही नुसती त्यांना प्रवचनं देतो, पण मदत काय करतो? त्यांना स्वत:च स्वत:ला मदत करायला शिकवतो का?" हा तिच्या नवऱ्याचा तापाच्या गुंगीतला आक्रोश तिच्या अंत:करणाला भिडला.

अनुक्रमणिका

१९४७ साली, भारत चीन मधील कामाचे डोंगर उपसून भागलेली ६८ वर्षांची गतधवा वेल्दी फिशर परत भारतात येऊन महात्माजींना भेटली. महात्माजींच्या खुनाच्या सहा आठवडे आधी त्यांनी तिची भेट घेण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यांच्या त्या शेवटच्या भेटीत व्यथित महात्म्यानं, आपल्या पत्नीच्या आणि इतर सुहृदांच्या मृत्यूमुळे जीवनात निर्माण झालेली पोकळी तिच्यापुढे उघड केली. स्वातंत्र्योत्तर झालेल्या हत्याकांडाच्या वेदनेला वाचा फोडली. आणि उदासपणे ते म्हणाले," दिदी, तू भारताची सेवा करायला परत कधी येणार ? तू परत इथे येशील तेव्हा खेड्यात जा. आणि तिथल्या पीडितांना मदत कर. खेड्यांचा जर तू उद्धार केला नाहीस तर भारताचाही उद्धार करू शकणार नाहीस. कारण भारत हे एक खेडंच आहे." तिनं महात्म्याला अमेरिकेतील काम संपल्यावर भारतात येऊन काम करण्याचं वचन दिलं. साक्षरता प्रसार करणारे काही लोक तयार करण्याचंही आश्वासन दिलं.

सत्तर ऐंशी टक्के भारताची लोकसंख्या निरक्षर आहे. चाळीस वर्षं अव्याहत आशियामधील निरक्षरता दूर करण्याचं काम करणाऱ्या या ६८ वर्षाच्या स्त्रीला भारतासारख्या खंडप्राय देशाचं अज्ञान दूर करणं हे एक आव्हान होतं. ती ताकद तिच्यात होती म्हणूनच ती महात्म्याला नाही म्हणू शकली नाही. बावन्न साली ७२ व्या वर्षी ती भारतात आली तेव्हा तिला गांधींचं अस्तित्व नसलेला रिकामा रिकामा भारत बघायला मिळाला. उदात्तता, भव्यता सगळं काढून घेतलेला शुष्क भारत. पण आता कामाला कुठून सुरुवात करायची ! तिनं नवसाक्षरांसाठी पुस्तकं तयार करण्याचं काम सुरू केलं. त्याचवेळी तिला तार आली. अलाहाबादला, नवसाक्षरांना शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी एक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा भारत सरकारचा विचार होता. त्यासाठी शिक्षणविषयक सल्ला ती देऊ शकेल का ? खेड्यातील लोकांना सुधारित शेती, बियाणांची सहकारी तत्वावर खरेदी विक्री, स्वच्छता आणि एकंदरच त्यांचं जीवनमान सुधारण्याची भारतसरकारची देशव्यापी योजना होती. त्यासाठी त्यांना लिहिणं वाचणं शिकवण्याची फार आवश्यकता होती. निरक्षर माणसं साक्षरांइतकीच बुद्धिमान असून त्यांच्या जीवनाला मर्यादा पडतात. फिशरबाईच्या मागे पन्नास वर्षांचा अनुभव होता. तिनं त्या अध्ययन केंद्रात पदवीधर शिक्षकांना शिक्षण देण्यास सुरुवात केली. तिला भारतात येऊन काम करण्याचा मार्ग सापडला. आणि महात्म्याला दिलेल्या वचनाची पूर्ति झाली.

एकदा असेच १५/२० शिक्षक तिच्याकडे आले व म्हणाले, 'आम्हाला प्रौढ साक्षरांना शिकवायची इच्छा आहे. तुम्ही आम्हाला मार्गदर्शन करा. मे मध्ये आम्हाला सुट्टया असतात.' पण मे म्हणजे या पश्चिम देशीय स्त्रीला डोंगरांकडे पळवणारा महिना. तिनं तिची अडचण सांगताच ते शिक्षकही स्वखर्चाने तिच्या बरोबर थंड डोंगराळ भागात जायला तयार झाले. आनंदानं तिनं ब्रिगेडीयर जनरलला लिहून रिकाम्या बॅरॅकस् मिळवल्या व त्या शिक्षकांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. दुसऱ्या वर्षी याचीच पुनरावृत्ति झाली, तेव्हा उत्तरप्रदेशचे राज्यपाल तेथे आले होते. त्यांना ही कल्पना आवडली. ते म्हणाले, "तुम्ही लखनौला प्रौढ शिक्षण अध्ययन केंद्र सुरू करा; मी सर्व तऱ्हेची मदत करीन." आणि लगोलगच त्यांनी ही योजना प्रत्यक्षात आणली. दहा एकर जमीन विकत घेतली. पाण्यासाठी विहीर खोदली. पाण्यानंही इतका मनसोक्त आशीर्वाद दिला की तेथील सॅनिटेशनच्या व्यवस्थेचा अनेक खेड्यांनी आदर्श ठेवावा. आजही लखनौच्या जवळ राहणी काम व शिक्षण याचं सुरेखपणे आखलेलं साक्षरता देहात केंद्र आहे. त्यात खुलं रंगमंदिर आहे. त्यात नाटकं व कळसूत्री बाहुल्यांचे खेळ होतात. त्यायोगे शिक्षण दिलं जातं. शिक्षकांसाठी निवास आणि विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहं आहेत. प्रौढ साक्षरांसाठी पुस्तकं लिहिणाऱ्या लेखकांसाठी स्वतंत्र निवासाची सोय आहे. आणि प्रवेशद्वारावर फिशरबाईचं ध्येयवाक्य आहे : 'अंधाराला शापण्यापेक्षा एखादी तरी मेणबत्ती पेटवा.' हे केंद्र नुसतंच देशापुरतं मर्यादित नाही. त्याला अंतर्देशीय महत्व प्राप्त झालंय. भारतातल्या सर्व प्रांतातले शिक्षक तेथे येऊन प्रशिक्षण घेतात. फिशरबाई जगभर पैसा गोळा करत हिंडते, परत केंद्राच्या घरट्यात येऊन अभ्यासक्रमातील नवीन नवीन सुधारणेचे दाणे पिल्लांना भरवते. केंद्रातील प्रार्थना मंदिरात हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध सगळीच पिल्लं प्रार्थनेची चिवचिव करतात. जास्तीत जास्त पैसा या योजनेला मिळाला तर एका पिढीत जगातली निरक्षरता निपटून काढण्याची जिद्द फिशरबाईत आहे. पेन्शनीत निघून आराम करायच्या वयाला ती महात्म्याला

दिलेल्या शपथेशी एकनिष्ठ आहे. ती म्हणते, 'आणखी एक महिन्यानं मी ऐंशी वर्षांची होणार. पण मानवतेला दिनदर्शिकेच्या चौकटीत मोजण्याचं कोण धाडस करणार ? मी हे केलं ते मी फार निःस्वार्थी आहे किंवा उदात्त आहे म्हणून नव्हे. पण जीवन घसरतंय, निसटतंय आणि माझ्या प्रवासात मला न फसवणारी चांदणी मला हवीय्. खरी दिशा हवीय्. माझ्यात दुसरं काही करण्याची कुवत नाही म्हणून मी हे करते आहे.'

विद्यापीठ किंवा रोटरीक्लब सारख्या संस्थांनी खेडी दत्तक घ्यावीत असा एक विचार प्रवाह आहे. असं खेडं दत्तक घेऊन त्याचं मायेनं संगोपन करून त्याला बाळसेदार करून सोडण्याचं काम तेहेरानमधील नजमा नजाफीनं केलंय्. श्रीमंत कुटुंबात जन्मलेली ही नजमा खरं म्हणजे श्रीमंत पतीची राणी होऊन वाळयाच्या पंख्यानं वारा घेत, मधुर सुवासिक अत्तरं लावत बसायची. पण त्या ऐवजी तिनं परदेशी जाऊन सोशल वर्कचा कोर्स केला आणि पर्शियामध्ये येऊन उच्चवर्गीय जीवन जगण्याऐवजी शिक्षिका बनली. पण तिच्या डोळस दृष्टीस दिसलं की शिक्षण हे फक्त चिठ्ठयापिठ्ठयांच्या शाळेनंच संपत नाहीय्. खेड्यातल्या प्रौढ लोकांनाही शिक्षणाची जास्त गरज आहे. त्या शिक्षणाच्या कल्पनांची परकीयांकडून उसनवारी करण्याची जरूर नाही. कारण त्या कल्पना पर्शियाच्या वातावरणाला, परिस्थितीला लागू पडतीलच असं नाही. इराणमधील गोरगरीबही ज्यात सामावले जातील अशी शिक्षण पद्धती हवी. प्रगती आणि गरिबांचं जीवनमान उंचावणं यासाठी देशाची संस्कृति आणि जुन्या रूढी मोडूनच काढल्या पाहिजेत असंच काही नाही, हे तिला कळून आलं. उच्च इराणी संस्कृति जपूनही रहाणीमान, सॅनिटेशन, बालसंगोपन, साक्षरता व सुधारित आहार पद्धती याची पायरी उंचावता येईल. आणि या विचारानं तिनं खेड्यात पाऊल टाकलं. कारण खेडी सुधारल्या शिवाय देशाची प्रगति नेहेमीच शून्य असते हे तिला उमगलं होतं. अस्वच्छता, रोगराई, अंधश्रद्धेनं बरबटलेल्या खेड्यात त्यातलीच एक होऊन रहाण्याशिवाय तिला गत्यंतर नव्हतं. त्याशिवाय तिला खेडुतांचा विश्वास मिळाला नसता. पहिल्या दिवशी सरबंदन खेड्याच्या मोटरस्टॅंडवरच्या हॉटेलात चहा पिता पिता ती आदर्श खेड्याचं स्वप्न पहात होती. पण प्रत्यक्षात तिला फार अडचणींचे डोंगर पार करावे लागले. एका पत्र्याच्या खोलीत बाडबिस्तरा टाकला. तिचे खरे शत्रू खेड्यातले लोक नव्हते तर अज्ञान व भूक, अंधश्रद्धा आणि मुख्य म्हणजे भीति हेच होते. सार्वजनिक संडास स्वच्छ ठेवणं आणि दुरुस्त करणं हे तिचं पहिलं काम. मुलाला दूध पाजत, सतत घाणेरड्या माशा वारत असलेली एक बाई नजमानं दिलेला डी डी टीचा फवारा वापरायला तयार नव्हती. पण या माशा कशा रोगप्रसारक आहेत हे कानीकपाळी ओरडून सांगितल्यावर अनिच्छेनं ती बाई फवारा वापरायला तयार झाली. तसंच मरणोन्मुख मुलाला एका पक्षाचं ताजं रक्त पाजत असलेली बाई बघून तिला शाळा काढण्याआधी दवाखाना सुरू करण्याची गरज भासू लागली. ती पुस्तकं वाचून औषधं देई. प्रथमोपचार करी, इंजेक्शनंही देई. पण गर्दी इतकी अलोट होई की दोन महिन्यांनंतर तिला समजून आलं की ती एकटी दवाखाना चालवू शकणार नाही. तिथे डॉक्टरची गरज आहे. हर प्रयत्नांनी आठवड्यातून एकदा येण्यास एक डॉक्टर तयार झाला. वर्षातून एकदा पिकल्या फळावरोवर येणारा मुलांचा आजार अस्वच्छ पाण्यामुळे येतो हे तिला कळलं. पुन्हा 'पाणी उकळून प्या' हा मंत्र त्यांच्या गळी उतरवायला नजमाचं निम्मं रक्त आटलं. आता मात्र तिच्यावर त्या खेडुतांचा संपूर्ण विश्वास बसला. आणि तिनं शिक्षणाच्या प्रांतात चंचुप्रवेश केला. मुलांची शाळा काढली, त्याचबरोबर आयांनाही शिक्षण द्यायला सुरुवात केली. तसंच स्वतःला मदतनीस म्हणून दोन तीन मुली तयार केल्या. मुलींनी एकदा घराचं दार प्रायव्हसीसाठी लावल्यावर तिनं घराचं दारच काढून टाकलं. लोकांच्या तोंडावर दार लावण्यापेक्षा दारच नसलेलं वाईट नाही. यावेळेपर्यंत तिला दुसऱ्या देशाची हेर समजेपर्यंत इराण सरकारची मजल गेली होती. क्लासमध्ये एकमेकीच्या पेन्सिली, रबरं चोरणाऱ्या बाया पाहिल्या की ती तासन् तास उदास होई. पण मग विचार येई की त्यांच्याजवळ असतं तर त्यांनी चोरलं नसतं. शिक्षकांसाठी प्रशिक्षण केंद्र काढायचं, वसतीगृहासकट, अशा तिच्या योजना चालू होत्या. सारबंदन आदर्श खेडं होण्याच्या मार्गावर होतं. तेवढ्यात आणखी दोन खेड्यांनी तिला हाक मारली. 'ओ' द्यायलाच हवी होती. पुन्हा श्रीगणेशापासून सुरुवात. तिला दिसत होतं की सारबंदनच्या लोकात आता आत्मविश्वास आला

होता. तेथे तिची गरज नव्हती. पण दुसऱ्या खेड्यांना तिची गरज होती. तिकडे नजमानं धाव घेतली.

अशी ही नजमा. भारतामध्ये अशीच अनंत खेडी आहेत. ती सुधारणेसाठी हाक मारताहेत. निवडणुकी लढवायचं सोडून त्या हाकेला ओ देण्यासाठी, लोक-सेवेचं हे आव्हान स्वीकारण्यासाठी भारतीय स्त्री पुढे येईल का ?

पथिक—

निर्जन वाळवंटातून जाणारे लमानी लोकांचे तांडे पाहून
मला दिसतो—
शनिच्या मंदिरासमोरील भिकाऱ्यांचा समूह
डोळ्यांच्या आरशात पडलेले प्रतिबिंब,
चौकट फोडून बाहेर येते.
हृदय कळवळून टाकणाऱ्या त्यांच्या हाका,
आर्ततेची वीण गुंफित गुंफित,
लांबवर पसरतच जातात,
लोखंडी पुलाखालून जाणाऱ्यांच्या नजरेला
दाद न देता पसरलेले बाहू
अनवाण्या पायाने फिरणारे हाडामासांचे सापळे म्हणत असतात
फुलांच्या शय्येवर लोळण्याची स्वप्ने
जळजळीत निखाऱ्यातून वाट काढता काढता
केव्हाच नष्ट झाली आहेत.
आता त्याची कांही एक गरज नाही.
आम्हीच जर असे नसतो तर......
आकाशातला चंद्र आजूबाजूचे असंख्य तारे,
तिथे जायचे काम आमचे नाही.
आमच्या कर्माची फळे आम्ही भोगतच आहोत.
दैव असो वा नसो त्याचे कर्तव्य आम्हाला नाही
आम्ही शोधतो आहो दोनच भाकरीचे तुकडे देणाऱ्यांचे हात
अधिक देण्याची हिंमत माझ्याजवळ नसते
दोन पावल्या टिकवून मी माघारी परततो
भेदक नजरेतील निखारे साठवीत साठवीत.
दूरवर जाणारा बिंदूचा तो ठिपका
कांही क्षणातच नाहीसा झालेला असतो
मी पहातच राहतो
विचारवलयाच्या आवर्तात फिरत फिरत.

—अरुणा व. पवार

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त (२७ जानेवारी १९७६ ते १५ मार्च १९७६)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन

१.१ कार्यकारी मंडळाची चवदावी सभा दि. ६ फेब्रु. ७६ ला अचलपूर (जि. अमरावती) येथे झाली. त्या सभेत संमेलनाकरिता आलेल्या ठरावावर चर्चा होऊन ते विषय नियामक समितीकडे पाठविण्याचे ठरले.

२. विदर्भ साहित्य संघाचे विदर्भ साहित्य संमेलन

२.१ बत्तिसावे विदर्भ साहित्य संमेलन अचलपूर (जि. अमरावती) येथे दि. ६, ७ व ८ फेब्रुवारी १९७६ ला आय्. ई. एस्. बॉईज हायस्कूल परतवाडा येथे उभारलेल्या भव्य मंडपात प्रा. डॉ. भास्कर तथा मधुकर रघुनाथ आष्टीकर यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत उत्साहाने व यशस्वी रीतीने संपन्न झाले. मा. श्री. मधुकरराव चौधरी, अर्थ व सांस्कृतिक कार्य–मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांच्या शुभ हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन झाले. स्वागताध्यक्ष श्री. न. शे. उपाख्य भैय्यासाहेब देशमुख आमदार (म. रा.) आणि कार्याध्यक्ष श्री. ल. वि. उपाख्य बापूसाहेब देशमुख हे होते. डॉ. आष्टीकर यांचे संपूर्ण अध्यक्षीय भाषण युगवाणी डिसें. ७५ – जाने. ७६ या ‘श्री ज्ञानेश्वर’ विशेषांकात प्रसिद्ध करण्यात आले आहे.

२.२ शुक्रवार दि. ६–२–७६ ला ४ वाजता माननीय श्री मधुकरराव चौधरी यांनी संमेलनाचे उद्‌घाटन केले. या प्रसंगी कविभूषण श्री. अण्णासाहेब खापर्डे, ग्रंथालयभूषण श्री. तात्यासाहेब पितळे व श्री. तारे यांचा सत्कार करण्यात आला. या साहित्य संमेलनाची “स्मरणिका” आणि ‘युगवाणी’ चा ‘श्री ज्ञानेश्वर विशेषांक’ यांचे प्रकाशनहि माननीय श्री. मधुकरराव चौधरी यांनी केले. स्वागताध्यक्ष श्री. भैय्यासाहेब देशमुख यांच्या भाषणानंतर संमेलनाध्यक्ष डॉ. आष्टीकर यांचे भाषण झाले. त्याच दिवशी रात्रौ ९ वाजता डॉ. श्रीमती शकुंतला पळसोकर यांचे सुश्राव्य गायन झाले.

२.३ शनिवार दि. ७–२–७६ ला सकाळी ९ वाजता ‘महात्मा चक्रधर आणि त्यांचे कार्य’ या विषयावर परिसंवाद झाला. अध्यक्षस्थानी महानुभाव वाङ्मयाचे विद्वान संशोधक डॉ. वि. भि. कोलते होते. त्यांनी महानुभाव वाङ्मयाचे मार्मिक विश्लेषण करून चक्रधरस्वामीच्या लीलाचरित्रात मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे प्रतिबिंब कसे उमटले आहे हे दर्शविले. परिसंवादात प्रा. मनुताई नातु, प्रा. यशवंत मनोहर, श्री. तु. न. नागापुरे यांनी भाग घेतला. दुपारी ३ वाजता विषयनियामक समितीची बैठक झाली. नंतर संमेलनाध्यक्ष डॉ. आष्टीकर यांनी निम्नलिखित पुस्तकांचे प्रकाशन केले

१) ‘भावतरंग’– (लेखक श्री. दामले),

२) 'फसव्या गुरूची उत्तम चर्या' हा श्री. गुलाबराव महाराजांचा डॉ. कृ. मा. घटाटे यांनी संपादित केलेला ग्रंथ.

३) 'श्रीपाद कृष्ण कोल्हटकर साहित्य आणि संप्रदाय'
– लेखक श्री. मोरेश्वर रत्नाकर करंदीकर

४) 'बाल कविता' – लेखक श्री. पालघरे

त्यानंतर अचलपूर परिसरातील नवोदित कवींचे कविसंमेलन आणि कथाकथन झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी श्री. बाबा मोहोड होते. नागपूरच्या सुप्रसिद्ध लेखिका डॉ. प्रा. सौ. शकुंतला खोत यांचे अध्यक्षतेखाली महिलासंमेलन झाले. त्यात 'साहित्यातील स्त्रीदर्शन' या विषयावर उद्बोधक चर्चा झाली. चर्चेत प्रा. सौ. वसुधा घुरडे, कु. मंदा रजपूत, श्रीमती शकुन्तला महाजन यांनी भाग घेतला.

२.४ रात्री ९ वाजता श्री. आ. रा. देशपांडे उर्फ कवी अनिल यांचे अध्यक्षतेखाली कविसंमेलनाचा कार्यक्रम झाला. प्रथम कविभूषण श्री. अण्णासाहेब खापर्डे यांनी आपल्या कविता म्हटल्या. प्राचार्य राम शेवाळकर यांच्या खुमासदार निवेदनाने कवि-संमेलनात रंग भरला.

२.५ रविवार दि. ८ ला सकाळी 'वैदर्भीय संतकवी, व्यक्ति आणि वाङ्मय' या विषयावर परिसंवाद झाला. त्यात प्रा. पद्माकर काणे, सर्वश्री बाबा मोहोड, भ. प्र. मोहरील, देविदास सोटे, लक्ष्मण पापळकर यांनी भाग घेतला. अध्यक्षस्थानी डॉ. ना. वि. करवेलकर होते. त्याचवेळी अन्यत्र डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांचे अध्यक्षतेखाली 'अध्यापन शाखा' संमेलन झाले. त्यांत प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन अशा तीनही स्तरावरील अध्यापकांनी भाग घेतला. सर्वश्री तारे, पांडे, कस्तुरे, रुद्रावतार, प्रा. भी. रा. जहागीरदार व प्रा. शरच्चंद्र टोंगो यांनी आपले विचार प्रकट केले. श्री. आ. रा. देशपांडे व डॉ. आष्टीकर यांनीहि या चर्चेत भाग घेतला.

२.६ यानंतर, 'बालवाङ्मय : निर्मिती आणि कार्य' यावर प्रा. शरच्चंद्र टोंगो यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. त्यांत सर्वश्री दिनकर देशपांडे, प्रभाकर पुराणिक आणि शंकर कऱ्हाडे यांनी भाग घेतला.

२.७ दुपारच्या सत्रात सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. वा. कृ. चोरघडे यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथनाचा कार्यक्रम झाला. त्यात सर्वश्री वाजीराव पाटील, डॉ. आष्टीकर, सुभाष सावरकर यांनी भाग घेतला. प्रा. चोरघडे ह्यांनीहि आपल्या कथाकथनाने कार्यक्रमाचा शेवट केला.

२.८ संमेलनातील सारेच कार्यक्रम सुव्यवस्थित आणि भरगच्च असेच झाले. या साऱ्या कार्यक्रमांना श्रोत्यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

२.९ सायंकाळी खुल्या अधिवेशनास प्रारंभ झाला. त्या अधिवेशनात खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. १ : (दुखवट्याचा ठराव) हे साहित्य संमेलन न्यायमूर्ति के. तु. मंगलमूर्ति, प्रा. श्री. ना. बनहट्टी, सर्वश्री वि. घ. देशपांडे, दे. अं. उपाख्य बाबासाहेब नाईक, पं. शंकरराव सप्रे, पां. चि. करकरे, वसंतराव देसाई, विष्णुपंत भागवत, चं. वि. बावडेकर, शांताराम आठवले, थिरकवा, दामुअण्णा मालवणकर या दिवंगत कार्यकर्त्यांना, साहित्यश्रेष्ठांना आणि कलावंताना श्रद्धांजली अर्पण करते.

—अध्यक्षांकडून

अनुक्रमणिका

ठराव क्र. २ : कोकणी बोलीला एक स्वतंत्र वाङ्मयीन भाषा म्हणून दिलेल्या मान्यतेचा पुनर्विचार करण्यात यावा, असा निर्णय साहित्य अकादमीच्या कार्यकारिणीने घेतला आहे. याबद्दल हे संमेलन समाधान व्यक्त करते. पुढे होणाऱ्या साधारण सभेत हा निर्णय मान्य करून त्याच सभेने या प्रश्नाचा विचार करण्यासाठी मराठी भाषेशी संबंधित अशा मान्यवर ८ भाषातज्ज्ञांची एक नवी समिती नेमून व संबंधित साहित्य संस्थांची निवेदने मागवून अत्यंत विचारपूर्वक निर्णय घ्यावा अशी या संमेलनाची मागणी आहे.

सूचक—डॉ. वि. बा. प्रभुदेसाई

अनुमोदक—प्रा. भी. रा. जहागीरदार

ठराव क्र. ३ विदर्भाच्या सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने अमरावती येथे आकाशवाणी केन्द्र स्थापित होणे आवश्यक आहे. तरी अमरावतीला आकाशवाणी केन्द्र अविलंब स्थापित करण्यात यावे अशी विनंती शासनाला हे संमेलन करीत आहे.

सूचक—ॲ. श्रीकांत अनगळ

अनुमोदक—श्री. कृ. वा. तारे

ठराव क्र. ४ : बालकांच्या सृजनात्मक वृत्तीला चालना देण्यासाठी व त्यांच्याकडून साहित्य निर्मिती करून घेण्यासाठी बालकांची कृतिसत्रे भरविण्यात यावी आणि त्यांची योजना करण्यासाठी त्वरित पावले उचलावीत अशी विनंती हे संमेलन सर्व साहित्यिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि संबंधित शासकीय संस्थांना करीत आहे.

—अध्यक्षांकडून

ठराव क्र. ५ : माधानचे श्री. संत गुलाबराव महाराज यांनी परमार्थ क्षेत्राप्रमाणेच साहित्य क्षेत्रातहि मोलाचे लेखन केले आहे. साहित्य शास्त्रावरही त्यांनी लेख लिहिले आहेत. म्हणून हे संमेलन, साहित्य व शिक्षणप्रेमी शासनाला व विशेषतः नागपूर विद्यापीठाला अशी विनंती करते की नागपूर विद्यापीठाने श्री. गुलाबराव महाराजांच्या लेखनाचा आपल्या अभ्यासक्रमांत समावेश करावा.

सूचक—श्री. बाबा मोहोड

प्रा. सुरेश देशपांडे

सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी अचलपूर शहर व कॅंप येथील मंडळींनी दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद दिले व कार्यकर्त्यांचे आभार मानले. नंतर संमेलनाध्यक्ष डॉ. आष्टीकर यांनी समारोपाचे भाषण केले.

२.१० रात्री ९ वाजता स्थानीय कलाकारांनी श्री. मो. दा. देशमुख लिखित 'घराण्याचा मानदंड' हा उत्कृष्ट नाट्यप्रयोग सादर करून संमेलनाची सांगता केली.

३. परीक्षा समिती

३.१ प्रस्तुत वर्षी पुढीलप्रमाणे परीक्षार्थी संख्येत वाढ झाली आहे.

शासकीय परीक्षार्थी – १४१ विद्यालयीन परीक्षार्थी – २१२६ महाविद्यालयीन परीक्षार्थी – ६८० एकूण परीक्षार्थी – २९४७

१९७४–७५ पेक्षा परीक्षार्थी संख्या ७०६ ने वाढली असून उत्पन्न सुमारे रु. १२,००० हून अधिक आहे. गतवर्षीपेक्षा सुमारे ३,००० हून ते अधिक आहे. प्रस्तुत वर्षापासून विविध परीक्षात सर्वप्रथम येणाऱ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली आहेत.

अनुक्रमणिका

पारितोषक – प्राप्तकर्ते

परीक्षा	ऑगस्ट १९७५	जानेवारी १९७६	रक्कम
विद्यालयीन			
१. मराठी प्रवेश –	कु. मृणालिनी सरकार कामगार विद्यानिकेतन, चंद्रपूर	श्री. वि. के. वासनिक सिंधी हिंदी हायस्कूल नागपूर	५–००
२. मराठी परिचय –	कु. श्रद्धा स. झा – जनता महाविद्यालय ऑफ एज्युकेशन चंद्रपूर.	कु. नजमुन्निसा खां – जनता कॉलेज कॉलेज ऑफ एज्युकेशन, चंद्रपूर.	५–००
३. मराठी बोध –	श्री. दि. भि. वांदोडकर – अ. ले. ऑफ परपेच्युअल सौकर हायस्कूल, कुठ्ठाळीगोवा.	कु. रेणु रीझवाणी – सिंध नॅशनल हायस्कूल, उल्हासनगर	५–००
४. मराठी प्रबोध–	श्री. जफर सिद्धीकी श्री. सैयद मोयिनोद्दीन – म्यु. उर्दु प्रा. शाळा अमरावती क्र. २	श्री. जमील अहमद जब्बार म्यु. उर्दु प्रा. शाळा क्र. ४ अमरावती	५–००
५. मराठी प्रारंभ –	श्री. अ. द. मेंढे भणसाळी बुनियादी विद्या मंदिर, टाकळी	श्री. साबिरखां पठाण – एल बी. हायस्कूल, कोंढाळी	५–००
६. साहित्य विनीत –	कु. लीला र. बुटले कर्मवीर महाविद्यालय, मूल.	श्री. शंकर वाकुडकर – जामदार हायस्कूल, नागपूर (कै. ना. कृ. दिवाणजी पारितोषक)	१५–००
७. साहित्य परिचित –		श्री. माधव ना. बैतुले – सी. पी. ॲण्ड बेरार हायस्कूल, नागपूर – २	५–००
३.२ महाविद्यालयीन परीक्षा			
१. साहित्य प्रबोध	श्री. दि. अ. गिरप – अ. ले. ऑफ परपेच्युअल सौकर हायस्कूल,कुठ्ठाळी गोवा.	कु. कुन्दा ग. आदमने सी. पी. ॲण्ड बेरार महाविद्यालय, नागपूर	५–००
२. भाषा स्नातक	श्री. अब्दल कैयुम शेख इस्माईल – म्यु. उर्दु प्रा. शाळा क्र. २ अमरावती.	श्री. मोहम्मद शमीम मोहम्मद उस्मान – म्यु. उर्दु प्रा. शाळा क्र. ४ अमरावती.	१०–००
३. साहित्य स्नातक	श्री. वि. ना. इंगळे – भारतीय भाषाध्ययन मंदिर, नागपूर.	श्री. र. ना. कांबळे – यशवंत महाविद्यालय, वर्धा.	१०–००

४. साहित्य पारंगत		श्री. रा. चि. वैरागडे भारतीय भाषाध्ययन मंदिर, नागपूर. (– डॉ. कै. वा. ग. सिंगणापूरकर स्वर्णपदक)	४०–००

३.३ शासकीय परीक्षा

१. मराठी प्रवीण	कु. कमल एन. गुप्ता केंद्र – भारतीय भाषाध्ययन मंदिर, नागपूर.	डॉ. श्रीमती जमीला इकबाल भारतीय भाषाध्ययन मंदिर, नागपूर.	१५–००
२. मराठी प्राज्ञ	श्री. वि रा. कोहिरकर नळगंगापूर केंद्र – भारतीय भाषाध्ययन मंदिर, नागपूर.	श्री व्ही. आर बाळकृष्ण भंडारा. भारतीय भाषाध्ययन मंदिर, नागपूर.	२५–००

४. विदर्भ साहित्य संघाची नाटच समिती

४.१ कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा

विदर्भ साहित्य संघातर्फे, सोमवार, मंगळवार, बुधवार, दिनांक १६, १७, १८ फेब्रुवारी ७६ रोजी आयोजित कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धेत नागपुरातील एकूण १० नाटचसंस्थांनी भाग घेतला. या स्पर्धेत सुभाष मंडळ, नागपूर या संस्थेने सादर केलेल्या 'भूक अमर आहे' या एकांकिकेला प्रथम क्रमांक देण्यात आला आणि नवप्रभात कलामंदिर या संस्थेने सादर केलेल्या "दि कन्स्ट्रक्शन" या एकांकिकेला द्वितीय क्रमांक देण्यात आला.

तसेच वैयक्तिक अभिनयाबद्दल :

पुरुष भूमिका : प्रथम क्रमांक – ज्ञानेश्वर धुमाळ यांना "राजाचा खेळ" या नाटकातील भूमिकेबद्दल, व द्वितीय क्रमांक – अरुण गणोरकर यांना "क्यू" या नाटकातील भूमिकेबद्दल.

स्त्री भूमिका : प्रथम क्रमांक – कु. शिरीष वेळेकर यांना "दि कन्स्ट्रक्शन" या नाटकातील भूमिकेबद्दल व द्वितीय क्रमांक – कु. आरती गर्गे हिला "शांतता अभ्यास चालू आहे" या नाटकातील भूमिकेबद्दल.

या स्पर्धेसाठी सर्वश्री भाऊ समर्थ आणि प्रा. अनंत अडावदकर यांनी परीक्षकाचे काम केले.

विदर्भ साहित्य संघाच्या नाटचसमितीने आयोजित केलेल्या आंतर—महाविद्यालयीन नाटचस्पर्धेत विश्वेश्वरैया रिजनल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या संस्थेने सादर केलेल्या "नयन तुझे जादुगार" नाटकास प्रथम क्रमांक देण्यात आला व 'खोलकुटे ढाल' देण्यात आली.

या स्पर्धेत द्वितीय क्रमांक : विधी महाविद्यालयाने सादर केलेल्या 'पै पै, आणि पै' या नाटकास देण्यात आला.

वैयक्तिक अभिनयाचे पारितोषिक

प्रथम क्रमांक पुरुष भूमिका – नयन तुझे जादुगार नाटकात – (शेखर) श्री. पुरुषोत्तम आगवण.

स्त्री भूमिका : नयन तुझे जादुगार नाटकात – (मावशी) रोहिणी कौशिककर.

अभिनयाची गुणवत्ता प्रशस्तिपत्रे

द्वितीय क्रमांक :

पुरुष : पै, पै आणि पै नाटकात जोशीभटजी – श्री. अशोक अलोणकर
स्त्री : नयन तुझे जादुगार नाटकात – संध्या कठाळे

तृतीय क्रमांक :

पुरुष 'तीन दांडेकर एक मालन' नाटकात झंपू दांडेकर – श्री. माधव भुस्कुटे
स्त्री : 'पै, पै आणि पै' नाटकात – आनंदीबाई – शीला कामत

परीक्षक म्हणून सर्वश्री राजा पाठक, आनंद जोग आणि प्रा. ज. रा. फणसळकर यांनी काम केले.

४.३ बाल नाट्य स्पर्धा दि. ६ आणि ८ मार्च १९७६ ला आयोजित करण्यांत आली.

प्रथम क्रमांक :

आला आला कठपुतली वाला : प्रबुद्ध थिएटर, इंदोरा

द्वितीय क्रमांक :

चिमणा बांधतो बंगला : कला तरंग

तृतीय क्रमांक :

येरे येरे राक्षसा : नीलसागर नाट्य संस्था

वैयक्तिक अभिनय :

प्रथम क्रमांक : मुलगा – सतीशकुमार शिंगाडे – गुलाब – आला आला कठपुतलीवाला
मुलगी – कु. हर्षा सोहनी : लक्ष्मी चिमणी – चिमणा बांधतो बंगला

द्वितीय क्रमांक : मुलगा – रविंद्र अंमळनेरी – सोमू – येरे येरे राक्षसा
मुलगी – मंगला फुलझेले – चांदणी – आला आला कठपुतलीवाला

परीक्षक म्हणून श्री. प्रभाकर पुराणिक, श्री. विठ्ठल बिसन, सौ. मालती निमखेडकर यांनी काम केले.

५. सन्माननीयांच्या भेटी

५.१ श्रीमती डॉ. चित्रा नाईक, संचालक शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, यांनी दि. १३–२–७६ ला संघाला भेट दिली. सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी प्रास्ताविक भाषण करून वि. सा. संघाच्या कार्याचा त्यांना परिचय करून दिला. डॉ. आष्टीकर यांनी त्यांचे पुष्पमाला अर्पण करून स्वागत केले. महाराष्ट्रातील अन्य विभागांना ज्या तत्त्वावर वार्षिक अनुदान (मेन्टेनन्स ग्रँट) मिळते त्याच तत्त्वावर वि. सा. संघालाहि अनुदान मिळावे असे त्यांनी प्रतिपादन केले. शक्य ते सहकार्य मिळेल असे डॉ. चित्रा नाईक ह्यांनी आपल्या भाषणात आश्वासन दिले. नंतर त्यांना संघाचे सर्व विभाग दाखविण्यात आले.

५.२ दि. २०–२–७६ ला सायंकाळी ६ वाजता शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या विद्यमाने भरविलेल्या 'नवसाक्षरासासाठी साहित्य निर्मिती' शिबिरात भाग घेतलेल्या साहित्यिकांनी संघास भेट दिली. त्यात सर्वश्री शंकर पाटील, पुणे, उद्धव शेळके, मुंबई, मधु

जामकर, परळी, बाबा मोहोड, अमरावती, शरच्चंद्र टोंगो, यवतमाळ, शैलजा राजे, पुणे, शैला लोहिया, आंबेजोगाई, देवीदास सोटे, वर्धा, मधुकर केचे, अमरावती, दत्ता भगत, दातेगावकर, कोतपल्ले आदि उपस्थित होते. प्रा. या. मु. पाठक, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. उर्ध्वरेषे, श्री. रमेश गुप्ता, श्री. मनोहर पंधे ही नागपूरस्थ मंडळीहि उपस्थित होती. सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी प्रास्ताविक भाषणात वि. सा. संघाच्या कार्याची माहिती दिली. डॉ. आष्टीकर यांनी आलेल्या पाहुण्यांचा परिचय करून दिला व श्री. गोपाळराव पाठक यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी श्री. शंकर पाटील, प्रा. शरश्चंद्र टोंगो, श्रीमती शैलजा राजे यांनी आपले विचार प्रकट केले.

५.३ दि. २९–२–७६ ला श्री. कृ. द. पुराणिक, ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी संघाला भेट दिली. श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे कार्य त्यांना समजावून देण्यात आले. अध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे, ग्रंथालयाचे आमंत्रक श्री. ग. स. देशपांडे, श्री. चंद्रकांत कुळकर्णी यावेळी उपस्थित होते. सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी याप्रसंगी, ग्रंथालयाला मिळणारे अनुदान वाढवून त्यात एक सेवक व अंशकालीन ग्रंथपालाची सोय करावी अशी विनंती ग्रंथालय संचालकांना केली.

५.४ १४–३–७६ सुप्रसिद्ध निर्माते, दिग्दर्शक व कलाकार श्री. शाहीर दादा कोंडके यांनी संघाला भेट दिली. संघाध्यक्षांनी त्यांचे व त्यांच्यासह आलेल्या चित्रपट कलाकारांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांनी आपल्या अत्यंत विनोदी शैलीत मधून मधून गाणी म्हणून दाखवून आपले चित्रपटसृष्टीतले अनुभव सांगितले.

६. स्मृतिदिन

६.१ ३० जानेवारी १९७६ ला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून हुतात्मा दिन साजरा करण्यात आला.

७. शाखावृत्त

७.१ विदर्भ साहित्य संघाच्या **गोंदिया शाखेतर्फे** खालील कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

१९–१०–७५ "दी गोवा हिंदु असोसिएशन" तर्फे श्री. वि. वा. शिरवाडकर लिखित 'नटसम्राट' नाटकाचा प्रयोग झाला. या प्रसंगी असोसिएशनने शाखेला १०१ रु. ची देणगी दिली.

२५–१०–७५ नागपूरचे दलित साहित्याचे व्यासंगी श्री. ताराचंद खांडेकर यांचे 'दलित साहित्याची प्रेरणा' या विषयावर व्याख्यान झाले.

२६–१०–७५ श्री. भाऊसाहेब कुळकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी त्यांनी शाखेला 'भवभूती रंगमंदिरा'करिता साडेतीन हजाराची देणगी दिली.

१९–२–७६ डॉ. भाऊ मांडवकर यांनी शाखेला भेट दिली.

२७–२–७६ प्राचार्य राम शेवाळकर यांचे 'लोकरामायण' या विषयावर व्याख्यान.

२८–२–७६ प्रा. राम शेवाळकर यांचे 'वाल्मिकी रामायण' या विषयावर व्याख्यान.

२९–२–७६ प्रा. राम शेवाळकर यांचे 'रामो राजमणि व लक्ष्मण' या विषयावर व्याख्यान.

इतर शाखांचे वृत्त हाती आले नाही.

अभिनयाचा गुणवत्ता प्रशस्तिपत्रे

द्वितीय क्रमांक :

पुरुष : पै, पै आणि पै नाटकात जोशीभटजी – श्री. अशोक अलोणकर
स्त्री : नयन तुझे जादुगार नाटकात – संध्या कठाळे

तृतीय क्रमांक :

पुरुष : 'तीन दांडेकर एक मालन' नाटकात झंपू दांडेकर – श्री. माधव भुस्कुटे
स्त्री : 'पै, पै आणि पै' नाटकात – आनंदीबाई – शैला कामत

परीक्षक म्हणून सर्वश्री राजा पाठक, आनंद जोग आणि प्रा. ज. रा. फणसळकर यांनी काम केले.

४.३ बाल नाटच स्पर्धा दि. ६ आणि ८ मार्च १९७६ ला आयोजित करण्यांत आली.

प्रथम क्रमांक :

आला आला कठपुतली वाला : प्रबुद्ध थिएटर, इंदोरा

द्वितीय क्रमांक :

चिमणा बांधतो बंगला : कला तरंग

तृतीय क्रमांक :

येरे येरे राक्षसा : नीलसागर नाटच संस्था

वैयक्तिक अभिनय :

प्रथम क्रमांक : मुलगा – सतीशकुमार शिगाडे – गुलाब – आला आला कठपुतलीवाला
मुलगी – कु. हर्षा सोहनी : लक्ष्मी चिमणी – चिमणा बांधतो बंगला

द्वितीय क्रमांक : मुलगा – रविंद्र अंमळनेरी – सोमू – येरे येरे राक्षसा
मुलगी – मंगला फुलझेले – चांदणी – आला आला कठपुतलीवाला

परीक्षक म्हणून श्री. प्रभाकर पुराणिक, श्री. विठ्ठल बिसन, सौ. मालती निमखेडकर यांनी काम केले.

५. सन्माननीयांच्या भेटी

५.१ श्रीमती डॉ. चित्रा नाईक, संचालक शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, यांनी दि. १३–२–७६ ला संघाला भेट दिली. सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी प्रास्ताविक भाषण करून वि. सा. संघाच्या कार्याचा त्यांना परिचय करून दिला. डॉ. आष्टीकर यांनी त्यांचे पुष्पमाला अर्पण करून स्वागत केले. महाराष्ट्रातील अन्य विभागांना ज्या तत्त्वावर वार्षिक अनुदान (मेन्टेनन्स ग्रँट) मिळते त्याच तत्त्वावर वि. सा. संघालाहि अनुदान मिळावे असे त्यांनी प्रतिपादन केले. शक्य ते सहकार्य मिळेल असे डॉ. चित्रा नाईक ह्यांनी आपल्या भाषणात आश्वासन दिले. नंतर त्यांना संघाचे सर्व विभाग दाखविण्यात आले.

५.२ दि. २०–२–७६ ला सायंकाळी ६ वाजता शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या विद्यमाने भरविलेल्या 'नवसाक्षरासासाठी साहित्य निर्मिती' शिबिरात भाग घेतलेल्या साहित्यिकांनी संघास भेट दिली. त्यात सर्वश्री शंकर पाटील, पुणे, उद्धव शेळके, मुंबई, मधु

जामकर, परळी, बाबा मोहोड, अमरावती, शरच्चंद्र टोंगो, यवतमाळ, शैलजा राजे, पुणे, शैला लोहिया, आंबेजोगाई, देवीदास सोटे, वर्धा, मधुकर केचे, अमरावती, दत्ता भगत, दातेगावकर, कोतपल्ले आदि उपस्थित होते. प्रा. या. मु. पाठक, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. उर्ध्वरेषे, श्री. रमेश गुप्ता, श्री. मनोहर पंघे ही नागपूरस्थ मंडळीहि उपस्थित होती. सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी प्रास्ताविक भाषणात वि. सा. संघाच्या कार्याची माहिती दिली. डॉ. आष्टीकर यांनी आलेल्या पाहुण्यांचा परिचय करून दिला व श्री. गोपाळराव पाठक यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी श्री. शंकर पाटील, प्रा. शरश्चंद्र टोंगो, श्रीमती शैलजा राजे यांनी आपले विचार प्रकट केले.

५.३ दि. २९–२–७६ ला श्री. कृ. द. पुराणिक, ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी संघाला भेट दिली. श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे कार्य त्यांना समजावून देण्यात आले. अध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे, ग्रंथालयाचे आमंत्रक श्री. ग. स. देशपांडे, श्री. चंद्रकांत कुळकर्णी यावेळी उपस्थित होते. सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी याप्रसंगी, ग्रंथालयाला मिळणारे अनुदान वाढवून त्यात एक सेवक व अंशकालीन ग्रंथपालाची सोय करावी अशी विनंती ग्रंथालय संचालकांना केली.

५.४ १४–३–७६ सुप्रसिद्ध निर्माते, दिग्दर्शक व कलाकार श्री. शाहीर दादा कोंडके यांनी संघाला भेट दिली. संघाध्यक्षांनी त्यांचे व त्यांच्यासह आलेल्या चित्रपट कलाकारांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांनी आपल्या अत्यंत विनोदी शैलीत मधून मधून गाणी म्हणून दाखवून आपले चित्रपटसृष्टीतले अनुभव सांगितले.

६. स्मृतिदिन

६.१ ३० जानेवारी १९७६ ला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून हुतात्मा दिन साजरा करण्यात आला.

७. शाखावृत्त

७.१ विदर्भ साहित्य संघाच्या **गोंदिया शाखेतर्फे** खालील कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

१९–१०–७५ "दी गोवा हिंदु असोसिएशन" तर्फे श्री. वि. वा. शिरवाडकर लिखित 'नटसम्राट' नाटकाचा प्रयोग झाला. या प्रसंगी असोसिएशनने शाखेला १०१ रु. ची देणगी दिली.

२५–१०–७५ नागपूरचे दलित साहित्याचे व्यासंगी श्री. ताराचंद खांडेकर यांचे 'दलित साहित्याची प्रेरणा' या विषयावर व्याख्यान झाले.

२६–१०–७५ श्री. भाऊसाहेब कुळकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी त्यांनी शाखेला 'भवभूती रंगमंदिरा' करिता साडेतीन हजाराची देणगी दिली.

१९–२–७६ डॉ. भाऊ मांडवकर यांनी शाखेला भेट दिली.

२७–२–७६ प्राचार्य राम शेवाळकर यांचे 'लोकरामायण' या विषयावर व्याख्यान.

२८–२–७६ प्रा. राम शेवाळकर यांचे 'वाल्मिकी रामायण' या विषयावर व्याख्यान.

२९–२–७६ प्रा. राम शेवाळकर यांचे 'रामो राजमणि व लक्ष्मण' या विषयावर व्याख्यान.

इतर शाखांचे वृत्त हाती आले नाही.

साभार पोच

(२७-१-७६ ते १५-३-७६ पर्यंत 'युगवाणी'ला भेटीदाखल आलेल्या पुस्तकांची पोच खाली देत आहोत.)

मॅजेस्टिक बुक स्टॉल गिरगाव, मुंबई ४

१. आरण्यक – रत्नाकर मतकरी, पृष्ठे १३०, मूल्य रु. ९

२. आठ एकांकिका – रमेश पवार, पृष्ठे १२८ मूल्य रु. ९

३. माती आणि मूर्ती – सरोजिनी वैद्य, पृष्ठे १०४ मूल्य रु. १७.५०

४. दही हंडी – रमेश मंत्री, पृष्ठे १४४, मूल्य रु. १२.५०

५. अर्वाचीन मराठी सारस्वतकार – व. दि. कुळकर्णी, पृष्ठे १५४+२; मूल्य १२.५०.

६. अभयारण्यातून फेरफटका – बाबुराव सावे, पृष्ठे-८८, मूल्य रु. ५.

७. बाप बिलंदर बेटा कलंदर – प्रा. मधुकर तोरडमल, पृष्ठे ९५, मूल्य रु. ७.३०.

८. राम नगरी – राम नगरकर, पृष्ठे ८८, मूल्य रु. ५.

मॅजेस्टिक प्रकाशन, ३१५ प्रसाद चेंबर्स, मुंबई ४

९. नोकरीसाठी मुलाखती कशा घ्याव्या – पु. शं. पतके, पृष्ठे ५६+४, मूल्य रु. ३.

१०. सम्राट चंद्रगुप्त – ग. वि. साळवी, पृष्ठे ११७ + २, मूल्य रु. ५.

११. डाकूंची टोळी आणि वालवीर – लीलावती भागवत, पृष्ठे १०७, मूल्य रु. ५.

१२. शाळेतील भुताटकी – शैलजा राजे, पृष्ठे ३६, मूल्य रु. ५.

१३. क्रिकेट आणि क्रिकेट – रवींद्र पाटकर, पृष्ठे ९२, मूल्य रु. ५.

१४. अजब गजब मंडळ – आशा भाजेकर, पृष्ठे २+ १०६, मूल्य रु. ५.

१५. पुरुष – कृ. रा. सावंत, पृष्ठे ८७, मूल्य रु. ५.

१६. दीपमाळेचे रहस्य – भा. रा. भागवत, पृष्ठे १४४, मूल्य रु. ७.

इतर प्रकाशने

१७. कोसळ – दादा गोरे, प्रकाशक : दादा गोरे, चौराहा, औरंगाबाद; पृष्ठे ९०, मूल्य रु. १०.

१८ मराठी संतांची हिंदी कविता – डॉ. शं. गो. राजवाडे, प्रकाशक : हिंदु संस्कृति मंदिर, धंतोली, नागपूर १२, पृष्ठे ९२ मूल्य रु. ५.

१९. संदेश आणि स्वाक्षरी – सं. डॉ. ल. वा. पडोळे, प्रकाशक श्री. क्रांतिकुमार पडोळे, पूजा प्रकाशन, पडोळे निवास, धंतोली, नागपूर १२; पृष्ठे १७२, मूल्य रु. ७५.

२०. संसारी सुरुंग कांचनाचा – प्रा. राम प्रकाश घोडे, राजीव प्रकाशन, ५९ लक्ष्मीनगर, नागपूर; पृष्ठे ९६, मूल्य रु. ५.

२१. पाउले – गोविंद कुळकर्णी, प्रकाशक : विजय पाडळकर, 'भाग्यश्री' गणेशनगर, नांदेड; पृष्ठे ६३, मूल्य रु. ८.

२२. चकवा – बंकट पाटील, प्रकाशक दादा गोरे, चौराहा, औरंगाबाद; पृष्ठे ९० मूल्य रु. १०.

२३. भारतीय ऐक्याचा आधार त्रित्सु भरतवंश – द. र. जोग, प्रकाशक : द. र. जोग, कोठी रोड, महाल, नागपूर; पृष्ठे ३२, मूल्य रु. २.

२४. पळाई ढिवरीन आणि इतर बालगीते – डॉ. ल. वा. पडोळे, पूजा प्रकाशन, धंतोली नागपूर १२; पृष्ठे ३६, मूल्य रु. ५.

२५. झळई – कृष्णा चौधरी, नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर १२; पृष्ठे ४८ मूल्य रु. ३.

२६. एका पिढीचे आत्मकथन – संपादक रेगे, वा. ल. कुळकर्णी, रा. भि. जोशी, गं. ब. ग्रामोपाध्ये, मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन; पृष्ठे ३४९ मूल्य रु. २५.

२७. जे घडू नये – आशा भाजेकर, प्रकाशक : वि. ग. पुरचुरे, मेहता भवन, २ रा मजला, राजा राममोहन राय मार्ग, गिरगांव, मुंबई ४. पृष्ठे १०० मूल्य दिले नाही.

२८. दैवी चिनगारियाँ – विठ्ठलराव हरिभाऊ उल्हे, प्रकाशक उल्हे, मालटेकडी मार्ग, अमरावती; पृष्ठे २८ मूल्य रु. १.

२९. अरण्यरुदन आणि पालखीची गाणी – दिलीप धोंडो कुळकर्णी, प्रकाशक : रमेश धोंडो कुळकर्णी, ३२३ रंकाळ वेस, कोल्हापूर; पृष्ठे ४०+८, मूल्य रु. ५

३०. आकाश मोती – देवानंद गोरडे, प्रकाशक : ह. वि. दातार, अभिनव साहित्य परिषद, अंजनगाव सूर्जी, जि. अमरावती; पृष्ठे ५९ मूल्य रु. ८.

३१. अवलाद – दादा गोरे, प्रकाशक : दादा गोरे, चौराहा औरंगाबाद; पृष्ठे ९० मूल्य रु. १०.

३२. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर : साहित्य आणि संप्रदाय – मोरेश्वर रत्नाकर करंदीकर, श्रीवत्स प्रकाशन वणी (यवतमाळ), पृष्ठे ८ + १४६, मूल्य रु. १२.

३३. *Typography of Devnagari, Vol. I, II & III* – *Bapurao S. Naik, Published by Director of Languages, Sachivalaya, Bombay 32; Pages 324, 666 & 113 respectively.*

△△△

‘युगवाणी’ मासिकासंबंधी माहिती

१. *प्रकाशन स्थळ*	विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर १२.
२. *प्रसिद्धीचा नियतकाल*	मासिक निघतात परंतु जोड अंक.
३. *मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता*	श्या. श्री. बनहट्टी, भारतीय, श्रीनिवास मुद्रणालय, सुविचार प्रकाशन इमारत, धनतोली, नागपूर–१२.
४. *प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता*	गो. स. देहाडराय, भारतीय, सरचिटणीस, वि. सा. संघ, झांशी राणी चौक, नागपूर–१२.
५. *संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता*	डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर, भारतीय, वि. सा. संघ, झांशी राणी चौक, नागपूर १२.
६. *वृत्तपत्राची मालकी*	विदर्भ साहित्य संघ, नागपूर १२.

मी, गोपाळ सदाशिव देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ जाहीर करतो की वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

गो. स. देहाडराय,
प्रकाशक
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर १२.

प्रकाशक : *गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर १२*
मुद्रक : *श्या. श्री. बनहट्टी, श्रीनिवास मुद्रणालय, सुविचार प्रकाशन इमारत, धनतोली, नागपूर १२*

संपादकीय

'युगवाणी' विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र; पर्यायाने विदर्भातील साहित्यिकांचेच ते मुखपत्र. वैदर्भीय साहित्यिकांचे लिखाण त्यात प्रमाणाने अधिकच असले तर नवल नाही. नव्हे ते तसे राखले जात आहे. विशेषतः नवे वैदर्भीय 'साहित्यिक अंकुर' जपण्याचा प्रयत्न करीत आहोत. कुठल्याहि 'व्यावसायिक पद्धतींचा' किंवा 'फॅशनेबल शैलींचा' वापर करून 'युगवाणी' काढणे वरील प्रयत्नांत बसणार नाही. – ते आम्हाला अशक्य आहे असे नाही पण उचित नाही – कारण विदर्भ साहित्य संघाची काही ध्येयधोरणे असायलाच पाहिजेत, अन्यथा 'विदर्भाचा' म्हणून एक साहित्य संघ असणार नाही.

ह्याच धोरणानें हा महिला विशेषाङ्क काढलेला आहे. मुखपृष्ठावर पवनारच्या आश्रमपरिसरात सापडलेल्या वाकाटककालीन शिल्पाचे, भगवती गंगेचे छायाचित्र दिलेले आहे.


'ज्ञानेश्वर विशेषाङ्का'चे अभूतपूर्व स्वागत झाले. महाराष्ट्रातून अनेकांची आम्हाला प्रशस्तीपत्रे आली. "क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते।" ह्या न्यायानें आम्हाला श्रमाचे चीज झाले म्हणून हुरूप आला. रसिकांनी कौतुक केले, ज्ञानेश्वर विशेषांकाचे, —ह्या महिला विशेषांकाचेहि ते तसेच करोत, ही आशा.

संपादक

दुरुस्ती — या अंकात नजरचुकीने पृ. ३०८ व ३११ असे पृष्ठांवर क्रमांक पडले आहेत, ते ४०८ व ४११ असे पाहिजेत. पृ. ४१२ स्तंभ २ – लेखातील खालून ६ वी ओळ 'जयाचा' ऐवजी 'जयाची' पाहिजे. पृ. ४१४ – 'मी' कविता – शेवटची ओळ – यात 'माफे' ऐवजी 'माझे' पाहिजे.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संमेलन, अधिवेशन बत्तिसावे, अचलपूर




स्वागताध्यक्ष श्री. भैय्यासाहेब देशमुख भाषण करीत असताना




विदर्भ साहित्य संघाचे सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय
आभाराचे भाषण करीत असताना

विदर्भ साहित्य संमेलन, अधिवेशन बत्तिसावे, अचलपूर



संमेलनाचे उद्‌घाटक, माननीय श्री. मधुकरराव चौधरी, त्यावेळचे अर्थमंत्री, युगवाणीच्या 'ज्ञानेश्वर विशेषांका'चे प्रकाशन करताना.



संमेलनाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर अध्यक्षीय भाषण करीत असताना

युगवाणी [Yugwani] Regd. No. 1174 M H.

वाकाटक नृपति द्वितीय पृथिवीषेण याची मांढळ उत्खननात मिळालेली राजमुद्रा. या पूर्वी त्याची राजमुद्रा उपलब्ध झालेली नव्हती.



राजमुद्रेचे वाचन

नरेन्द्रसेनसत्सूनोः
भर्तुर्वाकाटकश्रियः
पृथिवि(वी)षेन(ण)नृपतेः(ते)–
र्जिजगीषोर्ज्जय शासन[म्]

[या संबंधी डॉ. अजय मित्र शास्त्री यांचा लेख याच अंकात पृ. ५१ वर पहा.]

युगवाणी

एप्रिल – मे १९७६ चैत्र – वैशाख शके १८९८

[वार्षिक साधारण सभेची सूचना कार्यवृत्ताच्या पृ. ५ वर पहा.]

नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्व विभागाने अलीकडेच नागपूर जवळील मांढळ येथे केलेल्या उत्खननात सापडलेल्या वाकाटककालीन शिल्पकृती.



२. दुर्गा



१. ब्रह्मा

[आणखी छायाचित्रे मलपृष्ठ ३ वर पहा.]

